महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)
छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र
School Leadership Academy (MIEPA-SLA)

INTER SLA SEMINAR ON SCHOOL LEADERSHIP DEVELOPMENT

Organized by MIEPA-SLA, Maharashtra in collaboration with NCSL, NIEPA, New Delhi

Date : 02nd to 4th January, 2026, Place : PACE Center, Nandrabad, Tq. Khultabad, Dist. Chh.Sambhajinagar

INTER SLA SEMINAR REPORT 2025-26









Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA), Chhatrapati Sambhajingar

School Leadership Academy, Maharashtra

INTER-SLA SEMINAR ON SCHOOL LEADERSHIP DEVELOPMENT

02 nd to 4 th January 2026

PACE Center, Nandrabad, Tq.Khultabad, Dist.Chhatrapati Sambhajinagar.

—Organized by—

MIEPA-SLA, Chhatrapati Sambhajinagar.

In collaboration with NCSL-NIEPA,New Delhi.

Inter-SLA Regional Seminar on

School Leadership Development

Inter-SLA राज्यस्तरीय चर्चासत्र

दिनांक: २, ३ व ४ जानेवारी २०२६

स्थळ: पेस सेंटर, नांद्राबाद, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजी नगर
आयोजक: महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था (MIEPA)

पार्श्वभूमी

शालेय नेतृत्व हे शैक्षणिक गुणवत्तेचे, संस्थात्मक संस्कृतीचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्रबिंदू आहे. बदलत्या शैक्षणिक धोरणांच्या (NEP 2020), तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराच्या आणि 21व्या शतकातील कौशल्यांच्या पार्श्वभूमीवर शालेय नेतृत्वाची भूमिका अधिक व्यापक व परिणामकारक बनली आहे. या चर्चासत्रामधून महाराष्ट्रातील आणि सहभागी राज्य-मध्यप्रदेश, राजस्थान, गोवा येथील मुख्याध्यापक, संशोधक आणि उच्च शिक्षण विभागातील प्रपाठक, शालेय नेतृत्वकर्ते, प्रशासक, अभ्यासक यांच्यात शालेय नेतृत्वाच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने संवाद व अनुभवांची देवाणघेवाण साधणे अपेक्षित आहे.

Inter-SLA राज्यस्तरीय चर्चासत्राची उद्दिष्टे

1. शालेय नेतृत्वाच्या आधुनिक संकल्पना व उत्तम पद्धतींचा अभ्यास करणे
2. NEP 2020 अनुषंगाने शालेय प्रमुखांची भूमिका स्पष्ट करणे
3. नेतृत्व विकासासाठी शालेय नियोजन व अंमलबजावणीवर चर्चा करणे
4. तंत्रज्ञान, नवोपक्रम व समावेशक शिक्षणातील नेतृत्वाचा प्रभाव समजून घेणे
5. शालेय नेतृत्वासाठी नेटवर्किंग व सहयोगाची संधी निर्माण करणे
6. शालेय शिक्षण व उच्च शिक्षणातील शालेय नेतृत्वाच्या प्रक्रियेचा समन्वय शोधणे.
7. संशोधनाच्या प्रक्रियेतून शालेय नेतृत्वाच्या अभ्यासाचा मागोवा घेणे.

सहभागी प्रतिसादक (Target Participants)

1. मुख्याध्यापक / प्राचार्य (शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा,अनुदानित शाळा)
2. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील दोन मुख्याध्यापक ज्यातील एक शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था तसेच एक अनुदानित शाळा मुख्याध्यापक
3. राजस्थान,मध्य प्रदेश.गोवा येथील प्रत्येकी तीन मुख्याध्यापक
4. राजस्थान,मध्य प्रदेश.गोवा येथील शालेय नेतृत्व अकादमीचे प्रत्येकी एक नोडल अधिकारी
5. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागातील प्राध्यापक व संशोधक

मुख्याध्यापकांसाठी आणि संशोधकांसाठी सादरीकरणाचे विषय

1. अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील तंत्रज्ञान
2. शालेय नेतृत्व आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण
3. अध्ययन क्षमता सुधारण्यासाठी अध्यापनशास्त्रीय नेतृत्व
4. शाळेत नाविन्यपूर्ण संस्कृती निर्माण करणे
5. शाळा आणि समुदाय आंतर संबंध सक्षमीकरण
6. उत्तम शालेय प्रशासन
7. लिंग समभावासाठी सक्षम शालेय नेतृत्व
8. समता, विविधता आणि समावेशन यासाठी शालेय नेतृत्व

वरील विषयानुसार मुख्याध्यापकाना सादरीकरण करण्यासाठी प्रत्येकी १० मिनिटे अवधी देण्यात आला, त्यासाठी व्हिडिओ, PPT, पोस्टर द्वारे सादरीकरण करणेबाबत कळविण्यात आले.

सदर चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शालेय शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच मिपा कोअर ग्रुप सदस्य यांच्या विविध समित्या तयार करण्यात आल्या ब जबाबदारी देण्यात आली. त्यानुसार ऑनलाईन बैठकीच्या माध्यमातून चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी नियोजन करण्यात आले. आयोजन समिती,समन्वय समिती,संपर्क व नोंदणी समिती,भोजन व्यवस्था,VIP व इतर निवास व्यवस्था, अहवाल लेखन समिती,अतिथी स्वागत,सूत्रसंचालन,सभागृह व व्यासपीठ समिती,फोटोग्राफी चित्रीकरण व प्रसिद्धी समिती, अर्थ व लेख समिती, सादरीकरण व मुल्यांकन समिती या प्रमाणे समित्या स्थापन होऊन

कामकाज करण्यात आले. राज्य विभाग आणि जिल्हा स्तरावरील विविध वृत्तपत्रे,यातून या कार्यक्रमाबाबत पब्लिसिटी करण्यात आली.

या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमास मा. मंत्री महोदय श्री दादाजी भुसे साहेब यांना मा. संचालक मिपा यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन निमंत्रण देण्यात आले,तसेच राज्य मंत्री महोदय,मा.प्रधान सचिव,मा.आयुक्त शिक्षण,मा.राज्य प्रकल्प संचालक तसेच सर्व संचालक महोदय, तसेच मा. कुलगुरू निपा नवी दिल्ली यांना विशेष अतिथी आणि प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले तसेच NCSL निपा च्या सहयोगी प्राध्यापक यानाही मार्गदर्शक म्हणून पत्राद्वारे तसेच दूरध्वनी द्वारे या कार्यशाळेस निमंत्रित करण्यात आले.



शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय चर्चासत्र निमित्त माननीय नामदार दादाजी भुसे साहेब,मंत्री, शालेय शिक्षण यांना उद्घाटन कार्यक्रमासाठी निमंत्रण देतांना मिपा-SLA संचालक श्री.प्रकाश मुकुंद



Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA), Chhatrapati Sambhajingar

School Leadership Academy, Maharashtra

Inter-SLA Regional Seminar on

School Leadership Development

Theme: Leadership Pathways for School Improvement

Date: 02nd to 4th January, 2026

Venue: Pace Centre, Nandrabad, Tq.Khultabad, Dist.Maharashtra

Concept Note and Information Brochure

Organised by

School Leadership Academy (MIEPA-SLA), Maharashtra In collaboration with NCSL-NIEPA, New Delhi

Introduction and Background

The SIEMAT Maharashtra is called as MIEPA i.e Maharashtra Institute of Educational Planning and Administration. It is the apex state level institution of educational planning and administration and is actively engaged in educational research, capacity building and academic leadership programs. Its core activities include capacity building for educational planners and administrators, research in educational planning and administration, conduct various activities for dissemination of the latest knowledge and information through its publication and presentation to seminars and workshop, organization of seminars, workshop and short term courses in educational planning and administration and providing a forum for exchange of views and experiences between practicing Maharashtra Educational Services Class - A, Class-B, Class-C officers.

MIEPA is an autonomous institute registered under society's registration Act XX1 of 1860 and Bombay Public Trust Act of 1950 in January 1995. MIEPA was established at Aurangabad vide G.R.SED.NO.PRE-1093/6807 PRASH I - 3 dated 7th May 1994 and is located in the heart of the historical Aurangabad city just one k.m. away from Central Bus Stand. The Campus Covers 5.39 acres and it is situated near the Bhadkal Gate. The Memorandum of Association and Rules for MIEPA were approved by the Govt. of Maharashtra vide G.R.NO.SED. NO. PRE /1094/ (7902) PRASHI-3 dated 20/10/1994. MIEPA is the SIEMAT for Maharashtra. The institute is engaged in organization of capacity building programs for school headmasters, bit, district, region and state level officers working in the Education Department.

Status of the institute has been escalated and the institute is declared as School Leadership Academy (SLA) vide Government letter dated 5th January 2017.

The major role and functions envisaged for SIEMAT/alternate structure in the state Roles and Functions of MIEPA -

MIEPA will act as School Leadership Academy in which the leadership trainings and Leadership programs for School Heads/Principals/Supervisory Officials of School Education Department.

Objectives of the Seminar

1. To study modern concepts and best practices of School Leadership.
2. To elaborate the roles and responsibilities of School Leaders in alignment with the National Education Policy 2020.
3. To deliberate on school planning and implementation strategies for effective Leadership Development.
4. To understand the impact of leadership in technological innovation and inclusive education.
5. To facilitate networking and collaborative opportunities for strengthening School Leadership.
6. To coordinate of school leadership processes between School Education and Higher Education.
7. To study the School Leadership through the research process.

Themes for Presentation

1. The seminar will focus on the overarching theme:
   Technology in teaching-learning process
2. School Leadership and Student Learning
3. Pedagogical Leadership for Improving Student Learning and SLOs
4. Building a culture of Innovation in a school
5. Empowering Communities and strengthening school-community relations
6. Leading School administration
7. Leadership for Gender Inclusivity in Schools
8. Leadership for Equity, Diversity and Inclusion

Participants / Target Groups

The seminar will bring together a diverse group of participants, including:

- School Heads and Principals from Government and Aided Schools (Primary to Higher Secondary) two from each district (35) of Maharashtra.
- School Heads and Principals from Rajasthan, Madhya Pradesh, Gujrat, Goa, Chhattisgarh, Diu-Daman, Dadra and Nagar Haveli three from each state.
- Nodal officers from Rajasthan, Madhya Pradesh, Gujrat, Goa, Chhattisgarh, DiuDaman, Dadra and Nagar Haveli one from each state.
- Teacher Educators from B.Ed., Colleges.
- Researchers and Associate Professor from Open University.
- Assistant Professor from College of Management Studies. Chairperson to analyse the presentations
- Senior Lecturers from DIET faculties.
- Associate Professors from B.Ed Colleges.
- Officials from MIEPA-SLA & Education Department.
- Representatives from NCSL-NIEPA.

A total of about 100 delegates are expected to participate, including 95 school heads presenting case studies and selected 05 researchers presenting empirical papers.

Expected Outcomes

The seminar is expected to achieve the following outcomes:

1. A comprehensive documentation of best leadership practices from schools across India.
2. Strengthened inter-state collaboration among SLAs for ongoing professional dialogue and joint initiatives.
3. Enhanced understanding of contextually relevant leadership models in the Indian school context.
4. Development of policy recommendations for school leadership development. Programme Duration, Date and Venue

- Duration: Three Days
- Date: 2nd to 4th January, 2026.
- Venue: Pace Centre, Nandrabad, Tq.Khultabad, Dist.Chhatrapati Sambhajinagar.

The Inter SLA Seminar will include keynote addresses, paper presentations, thematic sessions and feedback sessions.

Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA),
Chhatrapati School Leadership Academy

Inter-SLA Regional Seminar on School Leadership Development
Schedule of Seminar

Date - 02nd January 2026 - Day 1		
Time	**Particulars**	**Name/Chairperson**
09.00 AM to 10.00 AM	Registration	-
10.00 AM to 1.30 PM	Inaugural Session	Hon'ble Shri.Dadaji Bhuse Minister, School Education & Sports Department Maharashtra
		Hon'ble Dr.Pankaj Bhoyar State Minister, School Education & Sports Department Maharashtra
		Prof.Shashikala Wanjari,Vice Chancellor, NIEPA,New Delhi Keynote Address "भारतीय ज्ञान परंपरा : विद्यालय नेतृत्व की संभावनाए"
		Shri.Ranjit Sing Deol Principal Secretary, School Education & Sport Department, Mantralay, Mumbai.
		Shri.Sachindra Pratap Sing Education Commissioner, Maharashtra.
		Shri.Sanjay Yadav State Project Director, MPSP, Mumbai.
		Shri.Rahul Rekhawar Director, SCERT, Maharashtra, Pune.
		Dr.Charusmita Malik Assistant Professor NCSL,NIEPA,New Delhi
		All Dignitaries of School Education Department, Maharashtra
1.30 PM to 2.30 PM	Lunch Break	
2.30 PM to 4.00 PM	Session —1 (Group A) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Manjusha Kshirsagar
		Subject : Empowering Communities and strengthening school-community relations
		Satyavan Kushaba Lokhade
		Surekha vitthal Patil
		Sachin Ramdas Khillare
		Nilesh Digambarrao Deshmukh
		Pradip shantaram jadhav
		Prakash Sudam Lambole
		Purushotam Vitthalrao Bawane
		Kapil Sahadev Kamble

		Rajasthan : Swarup Sudhar
	Session —1 (Group B) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Sunita Rathod
		Subject : Empowering Communities and strengthening school-community relations
		Anil Haribhau Bhede
		Dr.Santosh Murlidhar Gaikwad (I/C)
		Sachin Kalyansing Tatu
		Sopan Bajirao Kale
		Bhise Digambar Ekanatrao
		Bhausaheb Bhaginath Pawar
		Dinesh Dilip Salunke
		Rajasthan : Snehlata Patel
		Rajasthan : Somraj Meena
4.00 PM to 4.30 PM	Hi Tea Break	
4.30 PM to 5.30 PM	Session —2 (Group A) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Manjusha Kshirsagar
		Subject : Building a culture of Innovation in a school
		Seema Rajesh Wathurkar
		Santosh Dattarao Londhe
		Vilas Bapurao Takale
		Mohan Rangrao Natve
		Ahire Prakash Jyotiram
		Reseracher : Dr.Padma Jadhav
	Session —2 (Group B) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Sunita Rathod
		Subject : Building a culture of Innovation in a school
		Rajendra Lakhanlal Sangode
		Gargi Sanjay Chaturvedi
		Dr.Sandhya Milind Khedekar
		Shantaram Bharat Toranmal
		Reseracher : Dr.Vishakha Bhalerao
Date - 03rd January 2026 - Day 2		
10.00 AM to 11.00 AM	Session —3 (Group A) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Bharati Maher
		Subject : Leading School administration
		Dadaso Narasgonda Patil
		Santosh vasantrao sapkal
		Ravindra Ratnakar Yamsalwar
		Sunil Somanath Bhangare
		Madhypradesh : Ashwini Sharma
	Session —3 (Group B) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Ashok Kamble
		Subject : Leading School administration
		Pawar Sandeep Bhagwan

		Ramdas Sakharam Thite
		Prajakta Prakash kadam
		Vaishali Niteen Thoke
		Madhypradesh : Ram Bharose Uikey
11.00 AM to 11.15 AM	Tea Break	
11.15 AM to 1.30 PM	Session —4 (Group A) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Bharati Maher
		Subject : School Leadership and Student Learning
		Shrikant Gatayya katelwar
		Sumant Dattaram Dalvi
		Jalilkhan Dildarkhan Pathan
		Balaji Pandurang Turewale
		Kotgire Sanjay laxmanrao
		Dr.Vandana Dillip Badwaik
		Vikas Narayan Parab
		Sushama Ramesh Bhamare
		Digambar Bhagwan Ghodke
		Anil Kaniram Chavhan
		Gavit Vaishali Deviprasad
		Dhruvas Mamraj Rathod
		Reseracher : Dr.Subhash Sonune
		Madhypradesh : Neha Dubey
	Session —4 (Group B) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Ashok Kamble
		Subject : School Leadership and Student Learning
		Prashant Katkar
		Dhayatadak Namdeo Tatyaba
		Kishor Marotrao Chaware
		Lata Ramesh Patil
		Nannaware Nandkumar Ramrao
		Dinesh jaychand mhadgut
		Satish madhukarrao parsewar
		Vilas Shamrao Pingale
		Santosh palnjya Meghawale
		Satish madhukarrao parsewar
		Marad naresh devalya
		Jagdish Bapu Indalkar
		Reseracher : Dr.Dipak Wayal
		Reseracher : Dr.Zakiuddin Sohel
1.30 PM to 2.30 PM	Lunch Break	
2.30 PM to 4.00 PM		Chairperson : Dr.Bharati Maher
		Subject : Technology in teaching-learning process

	Session —5 (Group A) Theme wise Presentations	Dipak Hiraman Deore
		Balaji Jayaji muddamwar
		Dr.Prabhakar Dhondiram Panchal
		Shyam Dattatray Machale
		K. M. Naik
		Goa : Sarveda Gaonkar
		Chhattigrah : Principal/Headmaster
		Chairperson : Dr.Ashok Kamble
		Subject : Pedagogical Leadership for Improving Student Learning and SLOs
		Maruti Sataba Rajgole
		Rahul Motising Bramhan
	Session —5 (Group B) Theme wise Presentations	Subject : Leadership for Equity, Diversity and Inclusion
		Raut Pramod Ramesh
		Vitthal Dudhappa Kamble
		Goa : Hemant Kamat
		Goa : Ujwala Potekar
4.00 PM to 4.30 PM	Hi Tea Break	
4.30 PM to 5.00 PM	MIEPA Presentation	Director MIEPA-SLA Maharashtra
5.00 PM to 6.00 PM	Session —6 (Group A) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Vishal Tayde
		Subject : School Leadership and Student Learning
		Ashok Devkar
		RAMESH MOTIRAM RATHOD
	Session —6 (Group B) Theme wise Presentations	Chairperson : Dr.Ravi Jadhav
		Subject : Leading School administration
		Mangal Prakash Jagtap
		Ramkrushna Badvaik
		Lokanand Navkhare
Date - 0 4 th January 2026 - Day 3		
10.00 AM to 11.00 AM	NCSL, NIEPA Presentation	Dr.Charusmita Malik - Guidance on School Leadership & Contineous Professional Development
11.00 AM to 11.15 AM	Tea Break	
11.15 AM to 1.30 PM	Feedback Session	Feedback Link Filling & Feedback of All Presentations & Discussion regarding School Leadership Aspects in various areas
1.30 PM to 2.30 PM	Lunch Break	
2.30 PM to 4.00 PM	Feedback Session	Feedback of All Presentations & Discussion regarding School Leadership Aspects in various areas
4.00 PM to 4.30 PM	Hi Tea Break	
4.00 PM to 6.00 PM	Valedictory Session	Closing Ceremony - Certificate & Momento Distribution




Invitation Card for Dignitaries (निमंत्रण पत्रिका)



Rolling Standee Banner (जाहिरात फलक)



Wall Banner (भिंतीवरील फलक)



शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत राज्यस्तरीय चर्चासत्र INTER SLA सेमिनार

दिनांक 02 ते 4 डिसेंबर 2026 - इतिवृत्त

स्थळ :- प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, (PACE) नांद्राबाद, ता.खुलताबाद
जि.छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा-SLA) छत्रपती संभाजीनगर या राज्यस्तरीय संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयातील मुख्याध्यापक (प्रति जिल्हा-2 प्रमाणे) तसेच राजस्थान, मध्यप्रदेश, गोवा या राज्यातील निवडक मुख्याध्यापक आणि त्या राज्यातील शालेय नेतृत्व अकादमीचे नोडल अधिकारी यांच्यासाठी तीन दिवसीय शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत राज्यस्तरीय चर्चा सत्र - INTER SLA सेमिनार,प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र,(PACE)नांद्राबाद, तालुका खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर येथे दि. 02 ते 04 जोनवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. हे चर्चासत्र मा.ना. दादाजी भूसे, मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य व मा. शिक्षण आयुक्त, शिक्षण आयुक्त् पुणे यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रास निवडक मुख्याध्यापक व राज्यस्थान मध्यप्रदेश, गोवा या राज्यातील निवडक मुख्याध्यापक, निपा व मिपा या राष्ट्रीय व राज्यस्तरीय संस्थेतील प्रमुख व अधिकारी यांचेसह छत्रपती संभाजीनगर येथील सर्व वरिष्ठ कार्यालयाचे प्रमुख व अधिकारी कर्मचारी तसेच खालील प्रमाणे मान्यवर उपस्थित होते.



राज्यस्तरीय चर्चासत्र - INTER SLA सेमिनारच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित मान्यवर

1. मा.डॉ. शशीकला वंजारी, मा. कुलगुरु, NIEPA नवी दिल्ली. तथा NCSL HEAD
2. मा. श्री. कृष्णकुमार पाटील, शिक्षण संचालक, योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
3. श्री.अनिल साबळे, अध्यक्ष, माध्य. व. उच्च माध्य. विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
4. मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली.
5. श्रीम. भावना राजनोर, उपसंचालक, MPSP मुंबई
6. श्री. प्रकाश मुकुंद, संचालक, मिपा संस्था, छत्रपती संभाजीनगर.
7. डॉ. शैलजा दराडे, संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर,
8. श्री. कैलास दातखीळ, विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर.
9. डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर.
10. श्रीम. अश्विनी लाठकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.छत्रपती संभाजीनगर,
11. श्रीम. जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.छत्रपती संभाजीनगर.
12. श्री योगेश सोनवणे, विशेष कार्यअधिकारी शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
13. श्री. अरुण शिंदे, शिक्षणाधिकारी (योजना), जि.प.छत्रपती संभाजीनगर.

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत राज्यस्तरीय चर्चासत्र - INTER SLA सेमिनारच्या उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्यगीत गायनाने झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत महानगर पालिका शाळेतील मुला- मुलींच्या सिम्फनी बँड पथकाच्या सुमधुर वादनाने झाली. या बँड पथकातील मुला-मुलींच्या सुमधुर, प्रेरणादायी वादनाने व गायनाने उपस्थित सर्व मान्यवर भारावुन गेले, खरोखरच मन प्रसन्न व उल्हासदायी झाल्याचे उपस्थितांनी व्यक्त झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. कार्यशाळेच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे हिमरू शाल, स्मृती चिन्ह व पुष्प देवून स्वागत करण्यात आले.



उद्घाटन समारोह सुरुवात महाराष्ट्र राज्यगीत गायनाने झाली सहभागी -महानगर पालिका शाळेतील मुला- मुलींच्या सिम्फनी बँड पथकाचे विद्यार्थी



दीपप्रज्वलन - हस्ते मा.कुलगुरू, निपा, नवी दिल्ली आणि सर्व मान्यवर



संचालक मिपा यांचे प्रास्ताविक

मा.श्री.प्रकाश मुकुंद, संचालक, मिपा संस्था, छत्रपती संभाजीनगर

मा.संचालक यांनी आपल्या प्रास्ताविकात या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चा सत्र/ कार्यशाळा आयोजनाचा उदेश व आवश्यकता या अनुषंगाने सांगीतले की, आताच आपण महाराष्ट्राचे राज्यगीत गायले,त्यात दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा,या उक्तीप्रमाणे आम्हाला अत्यंत अभिमान आहे,दिल्लीच्या शिक्षणाचे तख्त म्हणजेच नेतृत्व मा. वंजारी मॅडम करत आहेत.विदर्भाच्या भूमीत

नागपूर,भंडारा सारख्या ठिकाणी काम करून देशातील पहिलं महिलांचं विद्यापीठ SNDT जे महर्षी कर्वे यांनी स्थापन केले, त्या विद्यापीठात कुलगुरू म्हणून काम केलेल्या महिला देशाच्या शिक्षण प्रक्रियेत दिशादर्शक असणार्या निपा नवी दिल्लीच्या कुलगुरू आपल्यामध्ये उपस्थित आहेत ही आपल्यासाठी अत्यंत गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे.त्यांच्या सोबत असलेल्या NCSL निपा च्या डॉ चारूस्मिता मलिक मॅडम,मी त्यांना विचारले,क्या आप समझ पा रहे हो मराठी ? तर त्या म्हणाल्या,देवनागरी लिपी है,तो मराठी समझ पाते है.एकमेकांच्या भाषा समजून घेणे आणि त्यातूनच भारतातील सर्व घटकांना एकत्रित आणणे हाच शिक्षण प्रक्रियेचा उद्देश आहे.

उपस्थित सर्व मान्यवर आणि मुख्याध्यापक वृंद,ही भूमी सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांची आहे,ज्यामुळे उपस्थितांमध्ये महिला अधिकारी मुख्याध्यापक यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.आपण सर्व मुख्याध्यापक छोट्या गावात मोठे काम करत आहात,देशात निपा आणि राज्यात मिपा आहे.आमचे लक्ष्य निपा सारखी वाटचाल करण्याचे आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, छत्रपती संभाजीनगर या संस्थेची स्थापना 1994 मध्ये तत्कालीन मान्यवर मंत्री महोदय, सचिव, संचालक, व वरिष्ठ प्रशासकीय अधिका-यांच्या प्रदिर्घ अनुभव, दुरदृष्टीपणा व शालेय नेतृत्वाची गरज असलेल्या ध्यासातून निर्मीती केलेली आहे, त्यांचे मी आभार मानतो. आपण नेहमी शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास CPD बाबत बोलत असतांना What about CPD OF School Leaders? ज्यात मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, उपसंचालक, राज्यस्तरीय अधिकारी, मंत्रालयीन अधिकारी, सर्वांनाच CPD ची गरज आहे. बदल सतत होत आहेत, शिक्षणाच्या संरचना, PEDAGOGY, स्वरूप, धोरणे बदलतात. हे सर्व बदलांचे प्रवाह शालेय नेतृत्वापर्यंत पोचले नाहीत तर त्याचा कामावर परिणाम होतो.म्हणूनच मिपा अधिका-यांच्या CPD साठी कटिबद्ध आहे.

निपा येथील अनेक कार्यशाळांमध्ये उपस्थित राहून मला CPD करण्याची संधी मिळाली.मिपाकडे आताच स्तर प्रकल्प अंतर्गत निवासी होस्टेल चे बांधकाम पूर्णत्वास येत आहे. मिपाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, शालेय शिक्षण विभागाचे मा.सचिव,मा.राज्य प्रकल्प संचालक,मा.आयुक्त आहेत त्यांच्याकडे आम्ही या बाबी मांडल्या आहेत. आजची कार्यशाळा मा.ना.दादाजी भूसे, मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या तसेच मा.सचिव,मा.राज्य प्रकल्प संचालक आणि मा. शिक्षण आयुक्त, यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली असून या कार्यशाळेस मान्यवर कामाच्या व्यस्ततेमुळे येऊ शकले नाहीत परंतु त्यांचेही या संस्थेच्या वतीने हार्दिक आभार व्यक्त करतो.

तसेच आजच्या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्रास उद्घाटक म्हणून लाभलेल्या NIEPA नवी दिल्ली विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरु मा.डॉ.शशिकला वंजारी मॅडम, या प्रमुख पाहुणे व उदघाटक म्हणुन लाभल्या आहेत त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करतो व आभार मानतो. तसेच या कार्यशाळेस उपस्थित मान्यवर मा.श्री.कृष्णकुमार पाटील, शिक्षण संचालक, योजना महाराष्ट्र राज्य, पुणे. श्री.अनिल साबळे, अध्यक्ष, माध्य. व. उच्च माध्य. विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर, मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL-NIEPA नवी दिल्ली, श्रीम.भावना राजनोर, उपसंचालक, MPSP मुंबई तसेच छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्व क्षेत्रीय व जिल्हास्तरीय प्रमुख हे उपस्थित आहेत त्यांचे ही अभिनंदन,व स्वागत संचालक मिपा यांनी केले.तसेच सर्व उपस्थित मुख्याध्यापक यांनी पुढील तीन दिवस शाळेच्या यशोगाथा सादर करून आपल्या अनुभवांचे आदानप्रदान करावे त्यातून समृद्ध होऊन अनुभवाचा आणि ज्ञानाचा वारसा घेऊन पुढे जाऊ अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था ही मागील 30 वर्षापासून शैक्षणिक नेतृत्व विकासाचे केंद्र म्हणुन नावारुपाला आलेली संस्था आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले अनेक अधिकारी महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयाचे नेतृत्व करित आहेत. अभिमानाने सांगतात माझे पहिले प्रशासकीय प्रशिक्षण मिपा या संस्थेत झाले असून माझ्या सेवेसाठी ते अत्यंत उपयुक्त, प्रभावी ठरले आहे. तसेच वेळोवेळी शैक्षणिक नियोजन व प्रशासन बदलाचा प्रवाह अधिकारी व प्रत्यक्ष शैक्षणिक प्रशासन यांचेपर्यंत पोहचविण्याचे काम यशदा या संस्थेच्या धर्तीवर करण्याचा प्रयत्न करित आहोत.

तसेच आजच्या या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चा सत्र / कार्यशाळा आयोजनाचा उद्देश असा आहे की, शालेय शिक्षण हे प्राथमिक, माध्यमिक, उच्च व कौशल्य शिक्षण यांच्यात समन्वय समतोल ठेवुन शालेय नेतृत्वाचा विकास कसा होईल् यासाठी देशाच्या विविध राज्यातून व महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयातून विविध उपक्रम, कौशल्य याचा वापर करुन व्हीडीओ निर्मीतीतून, पीपीटी, व कृति संशोधन इत्यादीच्या माध्यमातून येथे उपस्थित असलेले प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मान्यवर मुख्याध्यापक आपल्या शाळेची यशोगाथा सादर करणार आहेत.

यात अत्यंत दुर्गम, आदिवासी, भौगोलिक दृष्ट्या अवघड क्षेत्रातील, डोंगराळ भागातील व शहरातील शाळांचे मुख्याध्यापक शालेय नेतृत्वाचे विविध पैलू येथे सादर करणार आहेत. यात शालेय नेतृव विकास, क्षमता संवर्धन व शालेय शिक्षण याबाबत चर्चा होणार आहे तसेच उच्च शिक्षण विभागातील संशोधक शैक्षणिक नेतृत्व या अनुषंगाने आपले संशोधन पेपर सादर करणार आहेत ज्यातून या दोन्ही शिक्षणातील समन्वय साधण्यासाठी चर्चेची संधी उपलब्ध होणार आहे. त्यातून NEP 2020 नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

राबविताना या चर्चा,उपयुक्त कृती,प्रयोग,संशोधन निश्चितच मार्गर्शक ठरेल असा विश्वास मिपा संचालक श्री मुकुंद यांनी व्यक्त केला.

यानंतर मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली. यांनी उपस्थितांशी संवाद साधला.



मा.डॉ.चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक, NCSL, NIEPA नवी दिल्ली.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था यांनी आम्हाला या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्र / कार्यशाळा आयोजनास निमंत्रीत करुन गौरव आणि सन्मान केला त्याबदल धन्यवाद. NIEPA नवी दिल्ली अंतर्गत NCSL राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना 2012 झाली असून आज पर्यंत कमीत कमी 5 लक्ष विद्यालय नेतृत्व करणा-या मुख्याध्यापक यांना सक्षम करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. या अनुषंगाने शालेय नेतृत्व संकल्पने संदर्भात योग्य साहित्य सामग्री तयार केली असून सदरचे कार्य विस्तारपुर्वक क्षमतेने देशातील विविध राज्यात व केंद्रशासित प्रदेशात चार घटकांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. तसेच भारत सरकारच्या सहकार्यातून निष्ठा, यशश्री, पीएमश्री, राईझींग इंडीया इत्यादी व केंद्र सरकारच्या मंत्रालयासमावेत विद्यालय नेतृत्व विकासासाठी सामग्री निर्माण करणे व क्षमता संवर्धनाचे काम असे कार्य केले आहे. आज राष्ट्रीय विद्यालयाची ओळख आपल्या माध्यमातून दिसून येत आहे. आपण

ग्रामीण क्षेत्र आणि शहरी क्षेत्रातील आहात. आपण जे महान कार्य करीत आहात हे राष्ट्र निर्मितीचे कार्य आहे. हे कार्य आपल्याला पुढे घेवुन जावयाचे आहे. यासाठी आपणास विनंती करते की, शाळा व महाविद्यालयीन शिक्षण याचा समन्वय साधून शिक्षण प्रक्रिया सक्षम व प्रभावी करता येईल यासाठी तीन दिवसीय कार्यशाळेत आपल्या विविध उपक्रमातून कल्पना सादर करणार आहात या कल्पना,प्रत्यक्ष कृती यांची आपण एकमेकांना देवाण घेवाण करणार आहात व यातून उत्तम मार्गदर्शक विचार व कृती प्राप्त होतील असे सांगुन सर्वाना शुभेच्छा दिल्या.

यानंतर कार्यक्रमाच्या उद्घाटक मा.डॉ. शशीकला वंजारी, मा. कुलगुरु, NIEPA **नवी दिल्ली. यांनी भारतीय ज्ञान परंपरा : विद्यालय नेतृत्व की संभावनाए या विषयावर विस्तुत मार्गदर्शन केले**.

महाराष्ट्राच्या मातृभूमित संताच्या भूमीत महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था त्यांच्या टिमने यांनी शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चा सत्र / कार्यशाळेसाठी मला प्रमुख पाहुणे / उदघाटक म्हणुन निमंत्रीत करून, माहेरपणाची आठवण करुन गौरव आणि सन्मान केला त्याबदल महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी तसेच या ठिकाणी उपस्थित श्री.अनिल साबळे, अध्यक्ष, माध्य. व. उच्च माध्य. विभागीय मंडळ, श्रीम. भावना राजनोर, उपसंचालक, MPSP मुंबई, श्री. प्रकाश मुकुंद, संचालक, मिपा संस्था, डॉ. शैलजा दराडे, संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, श्री. कैलास दातखीळ, विभागीय शिक्षण उपसंचालक, डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, व श्री योगेश सोनवणे, विशेष कार्यअधिकारी शालेय शिक्षण विभाग, यांचे धन्यवाद देते व सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देते, मी NIEPA नवी दिल्ली या संस्थेचा कार्यभार घेतल्यानंतर मिपा या संस्थेशी परिचीत झाले आहे, मिपा ही राज्यस्तरावरची अत्यंत महत्वाची शैक्षणिक नेतृत्व विकासासाठी भूमिका बजावणारी संस्था असल्याचे त्यांनी सिद्ध केले आहे, कारण येथील प्रशिक्षण, चर्चा सत्र इत्यादी अगदी अभ्यासपुर्ण, प्रत्येक कंटेट ब्राऊझर मध्ये मिळतात साधन व्यक्ती कधी रिपीट होणार नाहीत विहित वेळेत शिस्तीत सर्व उपक्रम संपन्न होतात. मिपा संस्थेतील प्रशिक्षणातून खुप कांही शिकण्यासाठी आहे कारण या ठिकाणी मा.साबळे साहेबांशी चर्चा करताना म्हणाले की माझे सुध्दा येथे प्रशिक्षण झाले आहे.



प्रमुख पाहुणे / उदघाटक मा.डॉ. शशीकला वंजारी, मा. कुलगुरु, NIEPA नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन

आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 स्विकारले आहे.आपल्या शाळांमध्ये जे काम चालते त्या शाळा नेतृत्व विकास उपक्रमासाठी भारत सरकार अनुदान देते. यासाठी भारत सरकारने देशभरात NIEPA च्या जवळपास 30 शालेय नेतृत्व विकास ॲकेडमीची स्थापना करण्यात आलेल्या आहेत. दिल्ली मध्ये NCERT च्या परिसरातच NIEPA आहे, त्यामुळे लोकांचा समज असा होतो की, NIEPA ही संस्था NCERT च्या अंतर्गत आहे, परंतु तसे नाही. NIEPA ही संस्था स्वतंत्र असून आमची स्वत:ची वेगळी ओळख व कार्य आहे, आणि ती आम्ही घेवुन वाटचाल करित आहोत. NIEPA या संस्थेची प्रमुख म्हणुन व ज्या महाराष्ट्राने मला शिकवले संस्कार देवून वाढविले त्याचे प्रतिबिंब प्रतिनिधीत्व स्वरुपात कार्य करित असून आपल्या राज्याप्रती व आपल्याप्रती आदरच आहे.

आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे फाउंडेशन लेव्हल पासून स्विकारले आहे, या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने थोडेसे संभ्रम काय आहे, धोरण आपल्याला काय सांगते, राष्ट्रीय धोरण निती काय आहे, हे आपल्या सर्वाना माहिती आहे. आपण कोठारी आयोग स्विकारला होता त्याचे एक घोष वाक्य होते 'भारताचे भविष्य हे मुलांच्या हाती आहे किंवा भारताचे भविष्य मुले घडवणार'. आता आपण प्रत्येक मुलास जाणीव करुन झाली पाहिजे की मी भारतीय आहे. आपल्या समोर सुंदर सुरात बँडपथकाने जय-जय महाराष्ट्र माझा हे

राज्यगीत गायले, हे किती स्फुर्तीदायक होते हे आपण सर्वांनी अनुभवले आहे, असेच प्रत्येकाने व प्रत्येक राज्याने राज्याच्या बाहेर जावून माझा भारत राष्ट्र महान म्हणुन गीत गायले पाहिजे. आपल्याला माहित आहे शाळेच्या पुस्तकात प्रार्थना आहे. भारत माझा देश आहे, आम्ही सर्व भारतीय आहोत, विविधतेने नटलेल्या संस्कृतीचा मला अभिमान आहे हे सर्व राज्यात वेगवेगळया भाषेत गायले जाते. आपण हे का गातो तर भारताची स्वत:ची विविधतेतून एकता ही एक वेगळी ओळख आहे.

आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रातून सन 2025 मध्ये एक बातमी होती की, आर्थिक महासत्ता म्हणुन जगात आम्ही चौथ्या क्रमांकावर होतो, फोटो होता अमेरेकेचे राष्टाध्यक्ष मा. ट्रंम्प, जर्मनीचे राष्टाध्यक्ष मा. जिनपिंग व भारताचे पंतप्रधान मा. मोदीजीचा होता हे आपल्याला पहाताना आंनद होत आहे. तेंव्हा एक लक्षात घेतले पाहिजे की या देशातील प्रत्येक राज्यातील शेवटचा घटक व व्यक्तीचे योगदान यात आहे, ही प्रगती सर्वाच्या प्रयत्नामुळे करु शकलो. प्रतिज्ञा म्हणण्याचा व म्हणुन घेण्याचा हेतू असा होता की, आपल्या भारत देशाची सर्व मुलांना ओळख झाली पाहिजे. आपण कांही वेळा टिपीकल होतो, सांगायचे झाले तर आपण भारत आणि इंडीया असे दोन सर्कल मध्ये विभागतो व आपल्या सोयीनुसार दोन सर्कल मध्ये वावरतो, पहातो असे का होते. उदा. मी इंग्लीश मध्ये बोललो तर माझा प्रभाव पडेल व लोक मला जास्त शिकलेला आहे असे समजतील परंतु तुमच्या बोलण्यात, भाषणात असलेले विचार व ज्ञान जास्त महत्वाचे आहे.

आजही मुले शिक्षणासाठी बाहेर जात-येत आहेत. देशाप्रती असलेला आदरभाव अनुषंगाने सांगते, उदा- 1895 मध्ये आचार्य प्रफुलचंद्र देव, भारतीय होते त्या काळात शास्त्र म्हणुन नायट्रेटवर संशोधन केले व त्या काळात स्कॉलरशिप मिळवून स्कॉटलॅड विद्यापीठात शिक्षण घेतले. त्यांनी हिंदू रसायनशास्त्र हे पुस्तक लिहिले त्यांना हिंदू रसायनशास्त्राचे फादर असे म्हणतात. ते जेव्हा शिक्षण घेवुन भारतात आले तेव्हा येथील नामांकित संस्थानिकांकडून बोलवण्यात आले, तेव्हा ते म्हणाले की, मी बाहेर देशात शिकुन आलो म्हणजे इंग्रजीत बोलेन असा समज असेल तर सोडून दया, मी विचार हिंदीतच मांडणार हे मान्य असेल तरच मी येईन सांगीतले, या गोष्टीला इतिहासात स्थान दिले नाही, दस्ताऐवज हटवले असावे असे दिसून येते. परंतु यातून त्याकाळातही त्यांची राष्ट्रभक्ती व देशप्रेम, स्वाभीमान दिसून येतो.



तसेच 1916 मध्ये रविंद्रनाथ टागोर, यांची आज एकशे सोळा वर्षापुर्वीची गोष्ट आहे. ते जपानमध्ये गेले, आपल्यापैकी जाणत असाल तेथील एका शाळेत त्यांना विचार मांडण्यासाठी बोलवण्यात आले तेव्हा तेथील मुलांनी व तेथील सामाजिक लोकांनी त्यांचे भाषण, विचार ऐकण्याला स्पष्ट नकार दिला होता, व त्यांनी अनेक कारणे दिली होती, परकीय माणूस, जो देश त्याची ओळख वा स्वतंत्र नाही त्यांचा तो नागरीक आहे इत्यादी. यातून तेथील मुलांची, लोकांची राष्ट्रभक्ती व देशप्रेम, स्वाभीमान दिसून येते. या ऊलट आपण काय करित आहोत, आपण फार सरळ आणि सहिष्णु आहोत, आपल्या छत्रपती शिवाजी राजांना चोर लुटेरे म्हणून निघून गेले तरी आपण ऐकून घेतो, सहन करतो हे बरोबर नाही. आपली जागतीक लेव्हल वर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची शुरपणाची, नेतृवाची एक वेगळी ओळख आहे. आता कुठेतरी औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर झाले ही आपली ओळख निर्माण केली आहे, यातून हे दिसून येते की होय आम्हाला आमची ओळख पाहिजे. म्हणुन 1913 मध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी लिहिले होते WHERE THE MIND IS WITHOUT FEAR, THE HEAD IS HIGH ज्यांच्या मनात भीती नाही त्यांचा माथा उंचा रहे, असे त्यांनी का लिहिले त्याचे कारण असे होते की, जेव्हा आपण पारतंत्र्यात होतो,आपल्याला स्वातंत्र्य नव्हते. यातून एक लक्षात येते की, स्वातंत्र्यवीर भगतसिंग यांना ज्या कॅम्पसमध्ये आमची इमारत आहे तथील तळ घरात ब्रिटीशानी त्यांना तेथे ठेवले होते, त्यांचे व्यक्तीत्व पहा ते जेलमध्ये असताना सुध्दा त्यांनी डायरी लिहिली व त्या डायरीचे प्रत्येक पान आपणास प्रेरणा देत आहे. विचार करा आपण एक शिक्षक आहोत, भगतसिंग निर्माण करु शकतो का, एक शिवाजी मी शाळेतून घडवु शकतो का, जेव्हा आपण लिडर म्हणुन ओळख सांगतो, आपण माझे सर्व सहकारी आहात, याचा जेव्हा आपण विचार करतो तेंव्हा असे लक्षात येते की, आम्ही तर असे कांही करत नाही आहोत. भारतीय नेतृत्वाचा विचार करताना आपण असा विचार करत नाही छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सरदार वल्लभाई पटेल आमचे लिडर होते. श्री

राधाकृष्णन आपले शैक्षणिक नेतृव होते, हे मुलांना माहिती पाहिजे. भारत महान होता एक काळ सोन्याची चिडीया, धुर निघत होता असा उल्लेख आहे याचा अर्थ काय होता, आपल्या देशाला परकीयांनी लूटून गरीब केले. आपल्याकडे संपत्ती, वेद होते, विद्वत्ता होती हे आपण सांगीतले पाहिजे. आपल्याकडे शिक्षणशास्त्राचा अभ्यास करणारे लोक भरपूर आहेत, पेडॉगौजी मेथड, प्रश्नोत्तर पध्दती शिकवतो आपण कोणाचे नाव घेतो, ऑरिस्टॉल, सॉक्रेटीस, रुसो यांचे घेतो. जेव्हा आपण भारतीय शिक्षण पध्दती, ज्ञान परंपरेचा विचार करु तेव्हा आपल्याला आपली पध्दती द्यावयाची आहे. सॉक्रेटीसची पध्दती जी आहे ती आपल्याकडे पुर्वीपासून संस्कृत मध्ये गुरुकुल पध्दती आहे ते संवाद स्वरुपात होते, हे आपणास कोणी सांगीतलेच नाही. हे आयकेएस- म्हणजेच भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व आपल्या मुलांना समजले पाहिजे की, भारत देश महान आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आपण स्विकारले असून 2022 प्रायमरी फाउंडेशन स्टेजवर आयसी एसएफआय आहेत ते पेडॉगौजीकल स्ट्रक्चर बदल यात 5+3+3+4 असा आहे. 20 व्या शतकाच्या सुरुवातीला स्वामी विवेकानंदानी शिक्षणाची व्याख्या दिली ती, मानवाच्या सुप्त शक्तीचा अविष्कार म्हणजे शिक्षण होय जे की आपल्या उपनिषदात नमूद आहे. आता हे सिध्द केले आहे, शिक्षणातून बालकाच्या वर्तनात सुधारणा झाल्या ते बाहयवर्तनातून दिसते तेव्हा त्या बालकाचा विकास झाला असे समजले जाते, आणि म्हणुन पंचकोष विकासावर भर देण्यात आला. पंचकोष भारतीय ज्ञान आहे किंवा नाही हा क्रीटीसिझमचा भाग होवू शकतो. मला आपल्याला सांगायचं आहे, भारतीय ज्ञान परंपरेचा विचार करु तेव्हा केवळ अंधश्रध्दा म्हणुन बघायच नाही तर वैज्ञानिक दृष्टी देवुन सिध्द करावयाचे आहे. गैरसमज डोक्यातून काढून टाका आयकेएसचे इंम्पोर्टन्स आपल्या पाठयक्रमात किंवा अध्यापन पध्दतीमध्ये समोवश करु तेव्हा त्याच्या मागचे लॉजिक काय आहे म्हणुन भारत सर्कल आणि इंडीया सर्कल जेव्हा कांही नाही समजते की, आपण एक सर्कलमधून दुस-या सर्कलमध्ये आपल्या सोईनुसार जातो.

कोविड काळात आमची एकत्र कुटूंब पध्दती चांगली होती म्हणून आम्ही वाचलो असे म्हणतो. आमच्या जवळ मुलगा, सुन, राहतात हे आमचे संस्कार आहेत. आज आता परदेशातील लोक भारतीय ज्ञान परंपरा शिकण्यासाठी आतुर आहेत कारण ते म्हणतात, आम्ही पैसे ज्ञान देवू, सगळ देवु परंतू आपली परिवार व्यवस्था संस्कार देवू शकत नाही, भारतीय एकत्रित कुटूंब व्यवस्था ही अतिउच्च व वैभवशाली परंपरा आहे. म्हणुन पंचकोष विकासाकडे आला तर अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश, आनंदमय कोश जे आत्म्याला वेढलेले असतात त्यातून व्यक्तीचा विकास होतो, यावर भारतीय ज्ञान प्रणाली भर देते.

भारतीय परंपरा आणि नेतृत्व यात मी जी भुमिका बजावत आहे यात तुमचा रोल महत्वाचा आहे, यात तुम्ही शालेय व्यवस्था बघताय, शालेय नेतृत्व करित आहात. आताच एक मॅडम म्हणाल्या मनपाची शाळा आहे पण तेथे कोठेतरी पण आला मनपाच्या शाळेतील मुले इतक छान गीत संचलन करतात, का करतात त्यांना कोणी तरी भेटले, प्रेरणा देत आहे. गुजरातमध्ये मुले शाळेत येत नव्हते, त्यासाठी घरोघरी जावुन प्रचार प्रसार केला, जेथे झाड, शेड दिसेल तिथे मुलांना घेवुन शिकवले, असे करता - करता त्याची शाळा मोठी

झाली त्या शिक्षकाचे नाव राकेश पटेल होते. त्याची दखल घेवुन त्याला राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे, तो आमच्या सोबत फाउंडेशन स्टेजला सोबत होता. मित्रांनो तुम्हीच काम करत आहात, तुमच्यापैकी कोणीतरी राष्ट्रपती अवार्ड घेतय.

राष्ट्रीय एज्युकेशन पॉलिसीचे पहिले वाक्य आहे **शिक्षण मुलभूत आहे, शिक्षण** काय करु शकते, शिक्षण आकार देवु शकते, घडवु शकते हे आपणास ज्ञात आहेच. आपण भाषण हॉनेस्टीवर दिले, आणि शाळेत / संस्थेत गेल्यानंतर डिसहॉनेस्टीच वर्तनात सुरु, नंतर हॉनेस्टीची चर्चा नाही, विचार ही नाही, तर काय होईल, आपण समजू शकतो. भाषण देणे आणि किर्तन करणे, आपण जगतो त्यात मुल्य आहेत की नाही, ती दिसतात की नाही, प्रत्यक्ष वावरताना वर्तनातून दिसतात का, आपल्या वर्गात कमीत 40 ते 50 विद्यार्थी असतात शंभर डोळे-कान आपल्याला पहात-ऐकत असतात त्यामुळे ते समजतील की मॅडम फक्त भाषणच चांगले देतात असे समजतील. म्हणुन आपण प्रत्येक गोष्ट शालेय नेतृत्व सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने उत्तमरित्या सांभाळली तर नक्कीच मुले चांगली घडतील उच्च शिक्षणाकडे येणा-या प्रत्येक मुलाचा पाया भक्कम असेल. आपण राष्ट्रीय धोरणाच्या आराखडयात जागतिक शैक्षणिक वैज्ञानिक धोरणासह भारतीय परंपरा, ज्ञान, नैतिक मुल्य यांचा समावेश केला आहे.

आपला भारत देश ज्ञानेश्वराच्या परंपरांचा आहे आणि असे अनेक संतांची शिकवण अनुभलेले हे राज्य आहे. ज्ञानेश्वरांनी पसायदान कितव्या वर्षी लिहिले तुम्हाला माहिती आहे. सुर्याला, तुळशीला पाणी देणे आमचे मुल्य आहे, ते अंतर्मूल्य आहे का सुर्याला, तुळशीला पाणी घातले जाते, कोणी जर विचारले ही कोणती परंपरा आहे तर ही आमची भारतीय परंपरा व पध्दती आहे हे वैज्ञानिक दृष्टीने पटवून दिले पाहिजे. अन्नमय कोश बाबत काय सांगीतले आहे, मुलाला कसे जेवण हवे आहे, अशाच प्रकारे आम्ही चार कोश सांभाळले तर पाचवा आनंदमय कोश आपोआप विकसीत होईल. आपण झोप येत नाही म्हणुन फेसबुक भरपुर पाहिले, वापरले आता ते नको आहे, आणि आपणास नको आहे. म्हणजेच आपली दिनचर्या बदलली, आज आमची दिनचर्याच आमचा आधार होवु शकते. आमच्या दिनचर्येमधुनही कांही चांगले शिकू शकतो. आपण यातून काय घेतले पाहिजे, एक चांगले नेतृत्व, चांगले प्रशासक, चांगले अधिकारी, चांगले शिक्षक, चांगला नेता होऊ शकता, पण आपण मुळातच शिक्षक आहोत आपण चांगले शिक्षकच झाले पाहिजे असेच अपेक्षीत आहे. ज्याच्याकडे शालेय नेतृत्व आहे, ते भविष्याचे निर्माते आहेत. आपण मला बोलावून सन्मान दिला त्याबद्दल धन्यवाद आणि या चर्चासत्राच्या उत्तम अंमलबजावणीसाठी शुभेच्छा.

यानंतर मा.श्री.कृष्णकुमार पाटील, संचालक, योजना शिक्षण संचालनालय, पुणे यांनी उपस्थितांना शालेय शिक्षण विभागातील विविध योजना व त्यांची अंमलबजावणी बाबत मार्गदर्शन केले.



मा.श्री.कृष्णकुमार पाटील, संचालक, योजना शिक्षण संचालनालय, पुणे

विविध राज्यातील निवडक मुख्याध्यापक यांची निवड या तीन दिवसीय शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चा सत्र / कार्यशाळेसाठी या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे मी शासनाच्या वतीने स्वागत करतो अभिनंदन करतो की, एक काळ प्रौढ शिक्षण - आजचे निरंतर शिक्षण याला एक वेगळेच महत्व होते, प्रौढ शिक्षणाधिकारी हे पद दोन्ही शिक्षणाधिकारी यांचे पेक्षा कमी वजन असलेले पद होते 1977 -78 ते 1992 पर्यंत होते आता काम कमी झाले, अति तेथे माती असे होते की असे झाले असे वाटते.


उल्हास साक्षरता कार्यक्रमावर मध्यंतरी काही लोकांनी बहिष्कार घातला होता तो अगदीच सोपा सरळ कार्यक्रम असल्याचे सांगितले आईच्या पोटात बाळ असेल तर त्रास होतोच. या कार्यक्रमाकडे सहज सुलभतेने बघा ज्यांना शिकायचं त्यांच्यामध्ये इच्छाशक्ती निर्माण झाली पाहिजे हे महत्त्वाचे आहे. आपण शाळेत काम करताना मल्टी टास्किंग लेव्हलवर काम करायला पाहिजे.

इतर राज्यातून आलेले सर्व शिक्षक बांधवांना माहीतच आहे की प्रौढ शिक्षणातून साक्षरता अभियानाची कामे एकसारखेपणाने अनेक राज्यांमध्ये राबविली जात आहेत. आपल्याला शाळेच्या कामासोबतच ही कामे सुद्धा करावयाची आहेत हे सगळ्यांना ज्ञात आहेत आणि ते करणे आपले कर्तव्यच आहे तो ही एक शालेय

नेतृत्वाचा एक भाग आहे. पंधरा वर्षावरील मुलही साक्षर झालेच पाहिजे त्यासाठी अभियान राबवायचे आहे. आपल्याकडे जे उल्हास ॲप आहे ते डाऊनलोड करून आपण आपले काम केले पाहिजे असे मी या ठिकाणी आव्हान करतो व ठरवून दिलेल्या वेळोवेळीच्या परीक्षा घेण्यात याव्यात.केंद्रीय मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख,विस्तार अधिकारी गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी आपल्या शाळेला भेटी देऊन उल्हास कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घ्यावा. तसेच राज्य शासनाकडून राजीव गांधी विमा योजना एनएमएमएस मराठी भाषा फाउंडेशन, संस्कृत भाषा संवर्धन इत्यादी योजनांना केंद्र, राज्य शासनाकडून वेळोवेळी निधी देण्यात येत आहे. या ठिकाणी उपस्थित राज्यातील विविध जिल्हयातून आलेल्या मुख्याध्यापकांनी निरंतर शिक्षण अंतर्गत योजनांकडे लक्ष देवुन विद्यार्थी लाभाच्या योजनाचा लाभ करुन देण्यात यावा असे मा. संचालक यांनी सूचीत केले व या कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर निपा नवी दिल्लीच्या कुलगुरू मा. शशिकला वंजारी यांच्या शुभ हस्ते मिपा संस्थेच्या वेबसाईटचे अनावरण करण्यात आले,

www.miepa.ac.in



यानंतर डॉ. ज्योती कुलकर्णी, नोडल अधिकारी मिपा संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी या पुढील तीन दिवस वेळापत्रकानुसार करावयाची अमलबजावणी बाबत संवाद साधला.



डॉ. ज्योती कुलकर्णी, नोडल अधिकारी मिपा संस्था,

या कार्यशाळेला मुर्तस्वरुप व आयोजनासाठी मुख्य जबाबदारी असलेल्या या कार्यक्रम व चर्चासत्राच्या सुत्रसंचालक यांनी सांगीतले की, आजच्या प्रथम सत्राचा कार्यक्रम येथे संपन्न होत आहे.

दुस-या सत्रात अ - टीम, ब- टीम, अशा दोन टीममध्ये या ठिकाणी उपस्थित मान्यवर मुख्याध्यापकांचे आणि संशोधकांचे शालेय नेतृत्व विकास अनुषंगाने सादरीकरण होणार असुन या अ- टिमचे सादरीकरण डॉ. मंजुषा क्षीरसागर, वरिष्ठ अधिव्याख्याता, DIET छत्रपती संभाजीनगर, डॉ विशाल तायडे प्राध्यापक प्रादेशिक विद्या प्राधिकरण व डॉ. भारती महेर, प्राध्यापक, श्रीनाथ अध्यापक महाविद्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, ब- टिम चे सादरीकरण डॉ.सुनिता राठोड,वरिष्ठ अधिव्याख्याता DIET छत्रपती संभाजीनगर, डॉ.रवी जाधव, वरिष्ठ अधिव्याख्याता DIET छत्रपती संभाजीनगर डॉ.दीपक वायाळ, प्राध्यापक, NESS वाडिया कौलेज ऑफ कॉमर्स पुणे या चेअरपर्सन / परिक्षकांसमोर सादर होतील त्यांच्या सूचनांचे पालन करुन आपले सादरीकरण दिलेल्या विहित वेळेत सादर करावेत असे सूचीत केले व आज दिनांक 2 जानेवारी 2025 रोजीचा उद्घाटन समारोह संपन्न झाल्याचे घोषित केले व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

उद्घाटन कार्यक्रम यु - ट्यूब लिंक

https://youtu.be/pKnoAVoZsY0?si=a4Ui6zCT6JkndfA-



सर्व मान्यवर आणि सहभागी मुख्याध्यापक व संशोधक

मुख्याध्यापक व संशोधक शाळा यशोगाथा सादरीकरण -

उद्घाटन कार्यक्रम झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील तसेच गोवा,मध्यप्रदेश आणि राजस्थान राज्यातील मुख्याध्यापकांचे शाळा यशोगाथा सादरीकरण तसेच उच्च शिक्षण विभागातील संशोधक यांचे सादरीकरण दोन गटात शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकारी /चेअर पर्सन यांच्या मार्गदर्शनामध्ये घेण्यात आले. प्रत्येक सादरीकरण झाल्यानंतर त्यावर थोडक्यात चर्चा घेण्यात आली.वेळापत्रकानुसार सर्व सादरीकरण घेण्यात आले,त्यात सहभागी सदस्यांनी PPT, VIDEO, POSTER यातून आपल्या शाळांच्या यशोगाथा गटात सादर केल्या त्यावर चर्चा संपन्न झाली.

अ - टीम (दि.02.01.2026)

1) श्री.सत्यवान खुशाबा लोखंडे, जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, ता.खेड, जि.पुणे



उल्लेखनिय यश :- सन 2024 वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत राज्यस्तरीय प्रथम क्रमांक आला तसेच सन 2024 वर्षी लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम लोकनृत्य स्पर्धा विभाग स्तरावर प्रथम क्रमांक आला. सन 2019 अध्यक्ष चषक प्रथम क्रमांक, सन 2018 अध्यक्ष चक्षक द्वितीय क्रमांक मिळाला.

शाळेतील उल्लेखनीय बाबी :- 1) **शैक्षणिक गुणवत्ता** -नियमित व गुणवत्तापूर्ण अध्यापन,आय.सी.टी आधारित शिक्षण व स्मार्ट क्लास अध्ययन निष्पती वाढ व सतत चाचण्या 2)**शिक्षक वर्गाची कार्यतत्परता**- प्रशिक्षित व सर्जनशीशल शिक्षक,डिजीटल व ई-लर्निंग साहित्य निर्मिती,विज्ञान प्रकल्प व मेळाव्यात सक्रिय

सहभाग 3) **उपक्रम-** वाचन प्रेरणा,ओळख ज्ञानेश्वरीची,आनंददायी शनिवार,खान अकॅडमी ऑनलाईन प्लॅटफॉम,स्पर्धा परीक्षा तयारी व मार्गदर्शन,कोडींग,छंद वर्ग,विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प स्पर्धा,पर्यावरण संवर्धन व सामाजिक उपक्रम. 4)**परिसर व सुविधा-** स्वच्छ व हिरवागार परिसर,स्मार्ट क्लास,संगणक कक्ष, वाचनालय, प्रयोगशाळा, सुरक्षित पाणी, स्वच्छतागृहे व खेळाची साधने. 5) **लोकसहभाग व सीएसआर योगदान** - स्थानिक ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थ्यांवा सक्रिय सहभाग, विविध नामांकित कंपन्या व संस्थांच्या सीएसआर निधीतून शाळेला सुविधा,३६ सुसज्ज वर्गखोल्या उभारल्या, आधुनिक क्रीडांगण व मुलांसाठी खेळ सामग्री उपलब्ध, विज्ञान, संगणक, गणित, भाषा अशा विविध प्रयोगशाळांची स्थापना, भव्य सांस्कृतिक सभागृह कला, सांस्कृतिक कार्यक्रम व बैठकींसाठी,परिपाठ मैदान-सकाळी प्रार्थना, व्यायाम व विशेष उपक्रमांसाठी, वृक्ष लागवड उपक्रम हिरवागार व पर्यावरणपूरक शाळा परिसर, शाळेच्या सौंदर्यीकरणासाठी स्थानिक स्तरावर देणग्या व योगदान, सीएसआर अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट क्लास, संगणक, प्रोजेक्टर व शिक्षण साहित्य. 6) **विद्यार्थी विकास-** शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, कला व विज्ञान प्रगती प्रज्ञाशोध, जवाहर नवोदय, ५वी शिष्यवृत्ती, NMMS, सारथी शिष्यवृत्ती मध्ये घवघवीत यश वक्तृत्व, चित्रकला, विज्ञान प्रकल्पांत उत्कृष्ट कामगिरी आत्मविश्वास, नेतृत्वगुण व मूल्याधिष्ठित शिक्षण. 7) **स्पर्धा परीक्षा तयारी** - विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती व प्रवेश परीक्षांची मार्गदर्शनपूर्वक तयारी, प्रज्ञाशोध, जवाहर नवोदय, ५वी 8वी शिष्यवृती, NMMS, सारथी शिष्यवृती, मंथन परीक्षा तयारी,प्रश्नसंच, सराव परीक्षा व मॉक टेस्टचे आयोजन,विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणे,जिल्हा व राज्य पातळीवरील परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन. 8) **कोडिंग उपक्रम-** विद्यार्थ्यांना Scratch, ब्लॉक प्रोग्रेमिंग व प्राथमिक कोडिंगचे प्रशिक्षण, लहानगे प्रोग्रॅमर उपक्रमांतर्गत गणितीय व भौमितिक आकृत्या तयार करणे, STEM आधारित शिक्षण व सर्जनशीलतेला प्रोत्साहन, भविष्यातील तंत्रज्ञानाची ओळख व डिजिटल साक्षरता वाढविणे, 10) **डिजिटल स्कूल** - शाळेत स्मार्ट क्लासरूम उपलब्ध,प्रोजेक्टर, LED टीव्ही, टॅब, संगणक यांच्या साहाय्याने अध्यापन, ई-कंटेंट, व्हिडिओ लेक्चर्स, यूट्यूब चॅनेल, ॲप्स यांचा वापर, विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरता देण्यासाठी संगणक प्रशिक्षण, ऑनलाइन परीक्षा, QR कोड आधारित पाठ्यपुस्तकांचा वापर, Google Classroom / LMS सारख्या साधनांचा वापर, Tab Room tab साह्याने अध्ययन अध्यापन.

2) श्रीमती. सुरेखा विठ्ठल पाटील,जि.प.प्राथमिक शाळा,उपखेड,ता.चाळीसगाव,जि.जळगाव



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा (टप्पा एक) अंतर्गत विभागस्तरीय द्वितीय क्रमांक, बाला उपक्रमात जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक,जिल्हास्तरीय परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक

शाळेतील उल्लेखनीय बाबी :- 1) BALA-Building As Learning Aid P-Personality, L-Learning Skill, U-Understanding of Basics, S-Sports उपक्रम शाळेत राबविण्यात येत आहे 2) लोकसहभागातून बाला उपक्रमांतर्गत रंगकाम तसेच समुदाय सहभागातून रु.10 लाख रोख रक्कम प्राप्त झाली,समुदाय सहभाग वस्तूस्वरुपात एल.इ.डी संच,कॉम्पुटर, प्रिंटर, पियानो, परसबाग विकसन, आदर्श विद्यार्थीनी प्रोत्साहन शिष्यवृत्ती 3) समुदायामार्फत सी.एस.आर फंड अंतर्गत आय.सी.आय.सी.आय फाउंडेशन मार्फत सोलर पॅनल, रेन वॉटर हार्वेस्टींग, आर.ओ वॉटर प्युरिफायर, जैन एरिगेशन मार्फत ड्रीप व स्प्रिंकलर.

नाविण्यपूर्ण उपक्रम - 1)भिऊ नको शाळा तुझ्या पाठीशी आहे 2) आरोग्यम धनसंपदा 3) सुपर-30 4) ब्रेन जीन ॲक्टीव्हीटी 5) बाला प्लस.

समुदायामार्फत व्यावसायिक शिक्षण - 1) शेती 2) सुतारकाम 3)मूर्तीकला 4) शिवणकाम

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर - 1) प्रत्येक वर्गात एल.ई.डी स्मार्ट टी.व्ही 2) इंटरॲक्टीव्ह पॅनल 3) टॅब-22 4) अटल टिकरींग लॅब् 5) प्रोजेक्टर 6)सी.सी.टी.व्ही कॅमेरा 7) वाय-फाय इंटरनेट कनिटीव्हीटी

3) **श्री.सचिन रामदास खिल्लारे,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,लालवाडी तांडा,जि.जालना**



शाळा आणि समुदाय आंतरसंबध सक्षमीकरण

शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) जालना जिल्ह्यातील पहिली आणि एकमेव आय.एस.ओ नामांकन प्राप्त शाळा 2) विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक व नैतिक विकास साधण्यात येतो 3) पालक आणि नागरिकांचा शिक्षणात सहभाग 4) शाळा- समुदाय विश्वास व जबाबदारी वाढविणे 5) शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी 6) निधीचा पारदर्शक व योग्य वापर 7) सी.एस.आर /एन.जी.ओ यांची मदत 8) कृतीतून शिक्षण 9) साप्ताहिक सराव चाचणी 10) अक्षरांचे मोती उपक्रम 11) श्रमसंस्कार 12) सी.एस.आर फंडातून शाळा खोली, स्वच्छतागृह, ऑफीस असे 11 लक्ष रुपयाचे बांधकाम 13) लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज बैठक व्यवस्था 14) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात तालुक्यात प्रथम क्रमांक

4) **श्री.निलेश दिगंबरराव देशमुख, मदन महाराज विद्यालय व कमलदीप कनिष्ठ महाविद्यालय, ता.नांदगाव (खंडे) अमरावती**



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) लोकसहभाग घेण्यासाठी पुढाकार घेण्यात आला 2) परसबाग,ओपन जिम,संगणक कक्ष सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्यात आले 3) माजी विद्यार्थी मेळाव्यांचे आयोजन 4) समुदाय सक्षमीकरण 5) मातृसन्मान दिन 6) स्थानिक संस्थाचा सहभाग व सहयोग 7) शिक्षक विद्यार्थी आरोग्य तपासणी 8) शिक्षण संसाधन संस्कार यांची देवाणघेवाण 9) संस्कृती व मुल्यांचे जतन 10) मातृभाषेतून शिक्षण व संस्कृति व मुल्यांचे जतन 11) विज्ञान गणित मेळावे,व्यवसाय मार्गदर्शन,संस्कार वर्ग, डिजीटल साक्षरता,क्रीडा स्पर्धा 12) गुणवत्ता विकास,वक्तृत्व स्पर्धा,शिक्षकांचा सत्कार 13)पालकांचा सहभाग, पायाभूत सुविधा सुधारणा,सामाजिक-सांस्कृतिक विकास 14) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक

5) श्री.प्रदीप शांताराम जाधव, जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा,भोके आंबेकरवाडी, ता.जि,रत्नागिरी



शाळेतील उल्लेखनीय बाबी - शाळा आणि समुदाय आंतरसंबध सक्षमीकरण

1) माजी विद्यार्थी,पालक,ग्रामस्थ यांची सभा 2)इयत्तावार पालक ग्रुप,शालेय व्यवस्थापन ग्रुप,महिला मंडळ ग्रुप 3)वस्तुरुप व भौतिक स्वरुपात शैक्षणिक उठाव सुमारे रु.15 लाख, स्वतंत्र स्वच्छतागृह रु.5 लाख,संपूर्ण शाळेला लादी रु.5 लाख, संपूर्ण शाळेल डिजिटल पेंटिंग रु.2 लाख 50 हजार,शाळा प्रवेश रु.1 लाख 60 हजार,प्रत्येक वर्गात संगणक व स्मार्ट टिव्ही,प्रत्येक वर्गात वॉटर फिल्टर सुविधा,सी.सी.टी.व्ही सुविधा 5) शाळेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला 6) आय.एस.ओ नामांकन प्राप्त शाळा 7) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात रत्नागिरी जिल्ह्यातून दुसरा क्रमांक 8) रत्नागिरी जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार सन 2023-24 9) स्वच्छ हरित विद्यालय रत्नागिरी जिल्ह्यात दुसरा क्रमांक सन 2025-26 10) नासा/इस्त्रो तालुका/जिल्हास्तर निवड/शिष्यवृत्ती परीक्षा यश.

नाविण्यपूर्ण उपक्रम - 1) किल्ला बनविणे 2) कसरत 3) आदर्श विद्यार्थी पुरस्कार 4) वाढदिवस साजरा करणे 5) पालक सहभाग 6) पाककला कृति स्पर्धा 7) गांडूळ खत निर्मिती 8) सी.पी.आर.ट्रेनिंग 9) मासिक पाळी व्यवस्थापन किशोर वयीन मुलींना मार्गदर्शन.

6) श्री.प्रकाश सुदाम लांबोळे,जिल्हा परिषद शाळा,ठाणेपाडा,ता.जि.नंदुरबार



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1)ग्रामसभा 2) शाळा विकास समिती स्थापन करण्यात आली 3) माझी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला 4) परसबाग मिर्मिती 5) वेगवेगळ्या माध्यमातून शाळेस आर्थिक मदत 6) ग्रामस्थांकडून शाळेस संगणक भेट देण्यात आले 7) अभ्यासाचा भोंगा व गृहभेटी हा नवीन उपक्रम सुरु करण्यात आला 8) विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. 9) आई-वडीलांचे पाद्यपूजन कार्यक्रमाचे आयोजन 10) इयत्तेनुसार मॉर्निंग स्टडी ग्रुप बनवण्यात आले 11) ग्रामस्थांच्या आर्थिक मदतीतून प्रयोगशाळा व सुसज्ज ग्रथालय निर्माण करण्यात आले 12) खुली अभ्यासिका निर्मिती 13) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा विभागस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त 14) प्लास्टीक मुक्त शाळा तसेच गांडुळ खत निर्मिती करण्यात येते व शालेय आवारात ऑक्सीजन पार्कजी निमिर्ती करण्यात आली आहे 15)शालेय आवारात विविध झाडांची लागवड केली असून 252 झाडांचे क्युआर जनरेट केले असून एका क्लिक वर झाडाबाबत सर्व माहिती मिळते 16)शाळेमध्ये सोलर पॅनल बसवण्यात आल्यामुळे शाळेचे विजबिल शुन्यावर आले असनू नेटमिटरींग मुळे शाळेस एक उत्पनाचे स्त्रोत तयार झाले आहे.

7) श्री.पुरुषोत्तम विठ्ठलराव बावने, उच्च प्राथमिक शाळा,खापरी,ता.समुद्रपुर,जि.वर्धा



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत सलग दोन वर्ष जिल्हयातून द्वितीय क्रमांक प्राप्त 2) SQAAF बाह्य मुल्यमापनात 97.24% गुण मिळाले 3) सायन्स प्रदर्शन मध्ये जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त 4)चित्रकला स्पर्धेत तेरा विदयार्थी प्रविष्ट 5) आमदार महोदयांनी शाळा दत्तक घेतली 6) पंचक्रोशीतील शाळा, शिक्षक, गावकरी आणि विद्यार्थी यांची शाळा पाहण्यासाठी भेटी 7) शाळेची पटसंख्या 42 वरून 70 वर गेली असून पाच गावचे विदयार्थी दाखल झाले 8)अबॅकस राष्ट्रीय लेव्हलच्या परीक्षेमध्ये 1800 विद्यार्थ्यातून प्रथम तर, प्रथम दहा मध्ये चार विदयार्थी खापरीचे 9) बीटीएस परीक्षा मध्ये तेरा उत्तीर्ण 10) दोन वर्षात एकूण एक कोटी सहा लाख रुपयाची शाळेची कामे केली.

8) श्री.कपील सहदेव कांबळे, जिल्हा परिषद मॉडेल स्कुल सिद्धेवाडी,ता.मिरज,जि.सांगली



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1)ग्रामसभा 2) शाळा विकास समिती स्थापन करण्यात आली 3) माझी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला 4) परसबाग मिर्मिती 5) वेगवेगळ्या माध्यमातून शाळेस आर्थिक मदत 6) ग्रामस्थांकडून शाळेस संगणक भेट देण्यात आले 7) अभ्यासाचा भोंगा व गृहभेटी हा नवीन उपक्रम सुरु करण्यात आला 8) विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. 9) आई-वडीलांचे पाद्यपूजन कार्यक्रमाचे आयोजन 10) इयत्तेनुसार मॉर्निंग स्टडी ग्रुप बनवण्यात आले 11) ग्रामस्थांच्या आर्थिक मदतीतून प्रयोगशाळा व सुसज्ज ग्रथालय निर्माण करण्यात आले 12) खुली अभ्यासिका निर्मिती 13) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा विभागस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त 14) प्लास्टीक मुक्त शाळा तसेच गांडुळ खत निर्मिती करण्यात येते व शालेय आवारात ऑक्सीजन पार्कजी निमिर्ती करण्यात आली आहे 15) शालेय आवारात विविध झाडांची लागवड केली असून 252 झाडांचे क्युआर जनरेट केले असून एका क्लिक वर झाडाबाबत सर्व माहिती मिळते 16) शाळेमध्ये सोलर पॅनल बसवण्यात आल्यामुळे शाळेचे विजबिल शुन्यावर आले असनू नेटमिटरींग मुळे शाळेस एक उत्पनाचे स्त्रोत तयार झाले आहे.

9) श्री.स्वरुप सुथर,पीएमश्री राजकीय उच्च प्राथमिक विद्यालय,श्री मोहनगढ,जि.जैसलमेर



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) सन 2023-24 मध्ये तीन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले 2) फिल्ड व्हिजिट अंतर्गत जैसलमेर जिल्ह्यातील पर्यावरण संबंधित पर्यटण स्थळांना भेट 3) ग्रीन स्कुल 4) सामुदायिक गतिशिलता अंतर्गत एसएमसी/पीटीए बैठकीचे आयोजन,मातृशक्ति संमेलनाचे आयोजन,मेगा पीटीएम चे आयोजन 5) 21 व्या शतकातील कौशल्य अंतर्गत अतिथि व्याख्यान,नुक्कड नाटक, रोल प्ले,विज्ञान,गणित मेळाव्याचे आयोजन 6) पीएमश्री विद्यालयाची वार्षिक कार्य योजना 7)स्वांतत्र दिन निमित्त नागरिकता कौशल्य कार्यक्रम 7) राजस्थान दिवसाच्या निमित्त राजस्थानी दिवसानिमित्त राजस्थानी वेशभूषा प्रतियोगिता का आयोजन 8) नुक्कड नाटकाचे आयोजन 9) जल संरक्षण व शिक्षणात जागरुकता संबंधि कार्यक्रमाचे आयोजन 10) वार्षिकोत्सव व खेळ दिवसाचे आयोजन 11)वृक्षारोपन अभियान 12) नागरिकता कौशल्य अंतर्गत भारतीय सेनेत शौर्य चक्र व सेना मेडल विजेत्यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला 13) पौर्णिमेच्या दिवशी मातृ सन्मेलनाचे आयोजन 14) तिरंगा यात्रा कार्यक्रम 15) पुस्तकालय दिवस 16) शाळेमध्ये सोलर पॅनल बसवण्यात आल्यामुळे शाळेचे विजबिल शुन्यावर आले.

10) **श्रीमती. सीमा राजेश वाठूरकर,अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, शेळद,ता.बाळापूर, जि.अकोला**



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत स्वयंसिध्दा प्रशिक्षण देण्यात आले 100 टक्के विद्यार्थीनींनी प्रशिक्षण घेतले असून विद्यार्थींनी दररोज व्यायाम व कराटे सराव करतात 2) सन 2022-23 पासून विद्यार्थीनींना एम.एस.सी.आय.टी प्रशिक्षण देण्यात आले 3) सुट्यांमध्ये मनोरेजन उपक्रम घेण्यात आले जसे की योगा,कराटे,ध्यान,आना-पान,टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू,वाचन,लेखन,कविता निर्मिती, करमणुकीतून अभ्यास संकल्पना 4) फलक लेखन उपक्रमामुळे विद्यार्थीनींचे हस्ताक्षर सुधारणा व लेखन कौशल्य विकास,प्रत्येक विद्यार्थीनीला विषयलेखन व आकृती यामुळे विद्यार्थीनीच्या आत्मविश्वास व नीटनेटकेपणात वाढ झाली. 5) संविधान कलम पाठांतर उपक्रम 6) करिअर मार्गदर्शन व क्षेत्रभेटी 7) बालविपश्यना शिबीर 8) विद्यार्थीनींची नवोदय विद्यालयात निवड 9) क्रीडा स्पर्धेत विद्यार्थीनींची राज्यस्तरावर निवड 10) घर घर सविधान उपक्रम.

11) **श्री.संतोश दताराव लोंढे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ढोलउमरी,ता.जि.हिंगोली**



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) सुपर 20 उपक्रम राबविण्यात आला त्यात प्रामुक्याने s-study with understanding, u-unity of nation, p-public participation, e-education with entertainment, r-responsibility for education research, 20-20 activity यात माझी शाळा माझी जबाबदरी,मिशन स्पर्धा परीक्षा,सांस्कृतिक पंरपरा जतन,जीवन कौशल्य ओळख, मूल्य संवर्धनात्मक उपक्रम, डिझाईन फॉर चेंज, सवंगडी बनला विषयमित्र, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मितीत सहभाग,कृतीयुक्त कार्यशाळा आयोजन, आगळावेगळा शेवटचा तास, टच टू ग्लोबल वर्ल्ड, न्युट्रिशन गार्डन, कलात्मक विकास, चन कट्टा तथा ग्रंथालय मित्र, सामाजिक उत्तरदायित्व 2) माता-पालक यांच्या नियमित बैठका 3) शैक्षणिक साहित्य वाटप 4)पालक सहभाग 5) शाळा रंगरंगोटी 6) स्वागत कमान निर्मिती 7)श्रमदान 8)वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन 9) टच टु ग्लोबल वर्ल्ड 10) लोकसहभागातून अद्यावत संगणक व स्मार्ट टिव्ही 11) प्रयोगाचा शनिवार 12) शैक्षणिक साहित्य निर्मिती 13) भाषा गणित व विज्ञान प्रयोगशाळा 14) महापुरुष जयंती सोहळे 15) बोलक्या भिंती

12) श्री.विलास बापुराव टकले,राजुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कर्जत, ता.अंबड, जि.जालना



शाळेतील उल्लेखनीय बाबी -

1) इ.10 वी व 12 वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या घरी व गावात जाऊन पालकासह सत्कार करण्यात येतो 2) गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण 3) वर्तमानपत्र वाचन उपक्रम 4) मी कसा घडलो उपक्रम 5) अभ्यासिका 6) उत्कृष्ठ विद्यार्थी निवड उपक्रम 7) गणित व विज्ञान मेळावे 8) पर्यावरण पूरक राष्ट्रीय कार्य 9) अध्ययन क्षमता सुधारण्यासाठी मराठी,गणित,इंग्रजी विषयाचे उपचारात्मक वर्ग नियमित घेतले जाते 10) वर्गनिहाय माता पालक मेळावे 11) सन 2023-24 मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तर प्रथम पुरस्कार प्राप्त.

13) **श्री. मोहन रंगराव नटवे,महाराष्ट्र विद्यालय,निलंगा,ता.निलंगा,जि.लातूर**



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) सन 2023-24 मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा जिल्हास्तर द्वितीय पुरस्कार प्राप्त तसेच सन 2023-24 मध्ये जिल्हास्तर प्रथम पुरस्कार प्राप्त.माझी दुरदृष्टी, शाळा डिजिटलाईज करणे, गुणवत्तेच्या बाबतीत शाळेला उंच शिखरावर नेणे, कौशल्य आधारित शिक्षणावर भर, समाज व पालकांचा सहभाग वाढविणे, शाळेची स्वत:ची डिजिटल लायब्रेरी आणि कोचिंग क्लब सुरु करणे, परस बागेची माध्यमातून सकर पोषक आहार उपलब्ध करून देणे.

14) **श्री.प्रकाश ज्योतीराम अहिरे:- रा.जी.प शाळा हेदवली तालुका कर्जत जि.रायगड.**



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन 2) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 3)प्रवेशोत्सव 4) पालक सभा 5) तंज्ज्ञाचे करिअर मार्गदर्शन 6)वृक्षारोपण 7) चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन


ब - टीम (दि.02.01.2026)

1) अनिल हरिभाऊ भेडे, मुख्याध्यापक, उच्च प्राथमिक शाळा चनकापूर, जि. नागपूर



आदर्श शाळा म्हणून निवड झालेली आहे. यासाठी सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य मिळालेले आहे. या शाळेत येणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. शाळेत एकूण 542 विद्यार्थी संख्या आहे. शाळेत प्राथमिक सुविधा नव्हत्या. शिक्षकांनी आर्थिक सहकार्य केले. आमची शाळा ISO प्रमाणित करण्यात आली. ग्रामीण भागातील पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे. या शाळेसाठी खाजगी संस्थांनी 14 वर्ग खोल्या बांधून दिल्या. कोणत्या ना कोणत्या माध्यमातून मदत केलेली आहे जसे की बॅग वाटप,सायकल वाटप. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत विभागातून शाळेचा दुसरा क्रमांक मिळवला आहे. तसेच आणखी उत्तरोत्तर ही शाळा अशीच प्रगती करत राहील.

2) **डॉ. संतोष मुरलीधर गायकवाड, जि. प. हायस्कूल ॲन्ड ज्यु. कॉलेज, एलोरा, जि. अकोला**




आम्ही Vision & Objectives बनवले आहेत. शिक्षकांना खूप काही करावे वाटत होते परंतू शिक्षकांकडे रिसोर्स नव्हते. आमच्या शाळेने मागील पाच वर्षात विकास केला आहे. CSR फंडातून 15 लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. शेतकऱ्यांची मुले या शाळेत शिक्षण घेत आहेत. प्रथम आम्ही माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेतला व त्यांना आपण शाळेसाठी काय केले पाहिजे यावर चर्चा केली. एका माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी पाच लक्ष पन्नास हजार रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. स्मार्ट शाळा तयार केली आहे. डिजीटल शाळा तयार केली आहे. लॅगवेज किटचा वापर केला. माझी विद्यार्थी इंग्रजीमधून संभाषण करतात. ICT लॅब आहे. लॅबला आम्ही रिसोर्स सेंटर नाव दिले आहे. गार्डन तयार केली आहे. आमचे काही विद्यार्थी बार्टी येथे UPSC साठी पात्र झालेले आहेत.

३) श्री. सचिन कल्याणसिंग ताटू, उच्चश्रेणी मुख्याध्यापक जि. प. कें. उच्च प्राथमिक शाळा, चांडोळ, ता.जि.बुलढाणा




माझ्या शाळेचे बांधकाम 1960चे आहे. माझ्या शाळेची अवस्था खूप दयनीय झालेली होती. 250 शाळेची पटसंख्या होती.2020 मध्ये मी या शाळेची कमान हातात घेतली. गावातील सर्व समुदाय एकत्र केला. गावात माजी शासकीय कर्मचारी आहेत जे या शाळेचे विद्यार्थी आहेत. त्याचा संघ स्थापन केला त्यानंतर त्या शाळेच्या सुविधा लोकवग्रणीतून 10 लाख रक्कम खर्च करुन आजची शाळा उभी केली. मी माझ्या स्वत:च्या मुलीचा शाळेत प्रवेश घेतला आणि एकाच वर्षात 150 विद्यार्थ्यांचा प्रवेश केला. आजचा शाळेचा पट 403 आहे. चार वर्षातून हा पट माझे सहकारी यांचे मदतीने टिकून आहे. सर्व कामे मी स्वत: करतो शिक्षक सकाळी 10.30 येऊन आपले अध्यापनाचे काम करतात इतर UDISE, Online व इतर अवांतर कामे शिक्षक करत नाहीत. सर्व कामे मी स्वत: करतो. गावात गल्ली अभ्यासगट स्थापन केले. असे एकूण 40 गट तयार झाले आहेत. चार वर्षापासून हा उपक्रम चालू आहे.संध्याकाळी 7.00 वाजता सर्व गट अभ्यासाला बसतात. आनंदमेळावा साजरा केला जातो यामध्ये 100 दुकाने थाटली होती. लोकसहभागातून 4 गुंठे वर शाळेची परसबाग तयार केली आहे त्यासाठी ठिबकसिंचन केले आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा यामध्ये माझ्या शाळेचा तालुक्यातून पहिला क्रमांकाचे तीन लक्ष रुपयाचे बक्षीस मिळाले.दुसऱ्या टप्प्यात जिल्हयातून तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

4) श्री. सोपान बाजीराव काळे, प्राचार्य, श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे उच्च माध्यमिक विद्यालय, नेवासा, जि. अहिल्यानगर



शाळा चालविण्यासाठी समुदायाची आवश्यकता असते. माझी शाळा निवासी आहे. गावाची लोकसंख्या 700 आहे तर विंद्यार्थी संख्या आम्ही शाळेसोबतच वसतीगृह चालू करण्याचा विचार केला. पहिल्या वर्षी 31-32 मुलांनी प्रवेश घेतला. जो पर्यंत मुलांना आपण काही देत नाही तोपर्यंत पालक आपले होत नाहीत. मुलांचे वर्गीकरण केले. मुलांना पुस्तकापुरते मर्यादेत ठेवले नाही समाज काय आहे, शिक्षण काय आहे यामध्ये सर्व काही असते. आर्थिक सामाजिक, बौद्धिक विकास शिक्षणामुळे होतो. कोणास संगीताची आवड आहे, कोणाला सैन्यात जायला आवडते. माझी मुले दरवर्षी सैन्यामध्ये जास्त भरती होतात. इयत्ता 1 ली ते 12 वी चे वर्ग येथे चालतात. एका वर्गात 10-12 तुकडया आहेत. एकूण 92 वर्ग चालतात. शाळेच्या 40 मीनीबस आहेत. काही पालकांनी स्वत: मीनी बस घेतल्या. या विद्यालयात 130 स्टाफ आहे. 30 एकराचा तलाव आहे. त्यामध्ये मासे सोडले त्यापासून वर्षाकाठी 1.5 कोटी उत्पन्न मिळाले. नारळाची बाग तयार केली 30 हजार नारळाची झाडे आहेत. हॉर्स रायडींग, कुस्ती, कबड्डी , व्हॉलीबॉल, नेमबाजी यासाठी मुलांकडून तयारी केरुन घेतली जाते.सर्व भौतिक सुविधा आहेत. शाळेला भेट देण्यासाठी सहली येतात. आमच्या एकाही कर्मचाऱ्याचा मुलगा दुसऱ्या शाळेत शिकण्यासाठी जात नाही. पालकांचा विश्वास संपादन करायचा असेल तर समाजाची नाळ ओळखता आली पाहिजे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत तालुक्यातून शाळेला पहिला क्रमांक मिळाला आहे.

5) श्री. दिगंबर एकनाथराव भिसे, मुख्याध्यापक, पीएमश्री जि. प. प्रा. शा व माध्यमिक विद्यालय, इरळद, ता. मानवत, जि. परभणी



मी 2022 पासून मुख्याध्यापक म्हणून या शाळेवर काम पाहत आहे. आमच्या शाळेसाठी 51 लक्ष रुपये लोकसहभाग मिळाला आहे. गावाची लोकसंख्या 1500 आहे. एकूण 551 विद्यार्थी आहेत. यासाठी शाळेची गुणवत्ता व लोकसहभाग व शिस्त महत्वाची आहे. ही शाळा तालुक्याच्या ठिकाणापासून दूधना नदीच्या काठावर दूर आहे. एक एकर 20 गुंठे जमीन खरेदी केली. मानवत व सेलू तालुक्यातून विद्यार्थी या शाळेत येतात. स्पर्धा परीक्षेत एकूण144 विद्यार्थी टॉप आलेले आहेत. SHPR चा जिल्हयातील उत्कृष्ट पुरस्कार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतिशा माथुर यांनी दिलेला आहे.

स्वत: सरपंच तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे कर्मचारी येथे काम करतात. शाळा व्यवस्थापन समितीची बैठक रात्री 8.00 ते 10.00 या वेळेत घेतली जाते. MIT कॉलेजची सलग्नता मिळाली आहे. मा. नंदकुमार साहेब यांची शाळेला भेट झालेली आहे. विविध मान्यवरांनी भेटी दिलेल्या आहेत. परभणी जिल्हयातील अनेक शाळा या शाळेतून प्रेरणा घेऊन जातात. दिल्लीची टीम रात्र अभ्यास गटाला भेट देऊन गेली आहे. महाराष्ट्रातील पहिली शाळा आहे की ज्या जिल्हा परिषदेच्या शाळेला 2019 च्या शासन निर्णयानुसार सेल्फ फायनान्सचा दर्जा दिला आहे व इयत्ता 9 वी व 10 वी ची मान्यता दिली. दोन वर्षापूवी पीएमश्री शाळेचा दर्जा मिळाला. चार उत्कृष्ट लॅब प्रशासनाकडून मिळालेल्या आहेत. 55 लक्ष रुपयांची Futuaristic Classroom मिळाली आहे. त्यामुळे इयत्ता 1 ली ते 10 वी चा अभ्यासक्रम अत्यंत चांगल्या प्रकारे शिकविता येतो. ए.पी. जे अब्दुल कलाम युनिव्हर्सल सायंस सेंटर, विज्ञानकेंद्र आहे. हया सर्व सुविधा खेडेगावात उपलब्ध आहेत. शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचेमुळे हे यश दिसत आहे. या शाळेतील सहा ते सात शिक्षकांची पदे रिक्त आहेत. आदर्श शाळेचा दर्जा मिळाला.

6) श्री.भाऊसाहेब भागीनाथ पवार, सहशिक्षक, जि.प व उच्च प्राथमिक शाळा, वरवंडी तांडा, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

ही शाळा लिंबाच्या झाडाखाली भरत होती. ही शाळा 27 घरांच्या तांडयावर भरली जाते. ऊस तोड मुलांची शाळा आहे. दहा ते बारा वर्षापुवी पट संख्या 20-25 होती. त्यानंतर समाजाच्या गावाच्या सहभागातून शाळेचा पट 399 आहे. शाळा इयत्ता 1 ली ते 10 वीपर्यंत आहे. 20 ते 25 किमी परिसरातील मुले तीन स्कुलबसमधून शाळेत येतात. गुणवत्तेच्या बाबतीत मागील काळात इयत्ता 8 वी तील एकूण 33 विद्यार्थी NMMS शिष्यवृत्ती धारक झाले होते.इयत्ता 5 वी ते 8 वी चे 16 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक आहेत. आजचा विषय आहे शाळा समज आंतर संबंध सक्षमीकरण हा आहे. गावातील 5 भावांनी मिळून 1 एकर जमीन शाळेला दान दिलेली आहे. गावातील लोक श्रमदान करतात. तत्कालिन पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी शाळेला भेट दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी संत सेवालाल महाराज जयंती निमीत्त शाळेला भेट दिली आहे. महाराष्ट्र शासनाचे शिक्षण सल्लागार श्री. सिध्देश वरकड साहेब यांनी शाळेला भेट दिली आहे. पालक व विद्यार्थ्यांनी जवळपास 15 लक्ष रुपये उपलब्ध करुन दिला आहे. माझी शाळा सुंदर शाळा जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक मिळाले आहे. मध्य प्रदेशमध्ये राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा झालेल्या होत्या या स्पर्धेत जवळपास 16 राज्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत जवळपास 10 गदायुध्द स्पर्धेमध्ये पदके आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत.


7) श्री. दिनेश दिलीप साळुंखे, मुख्याध्यापक,आप्पासो माध्यमिक विद्यालय, विखरण, ता.जि.नंदूरबार



सुरुवातीला ही शाळा भाडयाच्या खोलीमध्ये भरत होती. नंदूरबार हा आदिवासी जिल्हा आहे. खाजगी अध्यापनाची ही माध्यमिक शाळा आहे. 100 टक्के गाव आदिवासी, 100 टक्के विद्यार्थी आदिवासी दैनंदिन कामकाजामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढेल याची दक्षता घेतली. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी एकत्रीतपणे काम करणे गरजेचे आहे.गुणवत्ता पुर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्याचा ध्यास घेतला आणि जास्तीत जास्त विद्यार्थी कसे पात्र होतील यासाठी घडयाळी तासिका सोडून जादा काम केले.यासाठी सर्व पालक, विद्यार्थी, शिक्षक सहकारी यांनी प्रयत्न केले.

2006 मध्ये तापी नदीला पूर आला होता. यावेळी गावातील गावकऱ्यांची राहण्याची व जेवणाची सोय याच शाळेत केली होती. यामुळे पालकांना शाळेविषयी आस्था निर्माण झाली. कोरोना काळात गावाच्या परिसरातील मंदीरात अध्यापनाचे वर्ग सुरु केले. शिक्षकांनी हिंदी, इंग्रजी, मराठी यांची प्रश्न पुस्तिका बनविली ती मुल्यांकनासाठी वापरली. त्यावेळी 60 लोक दगावली होती. त्यावेळी लसीकरणासाठी कॅम्प घेतला व शासनाकडून शल्यचिकीत्सकामार्फत कोरोना लस मिळाली. नंतर पुढील काळात दुसराही डोस मिळाला. त्यामुळे संपूर्ण गाव कोरोना मुक्त झाले. प्रत्येक वर्गामध्ये 43 इंची टीव्ही आहे. दोनलक्षरुपयांचे RO मशीन बसवले. मागील काळात शाळेला 15 लक्ष निधी प्राप्त झाला. सुंदर स्वच्छता गृह आहेत. शाळेचे कामाचे नियोजन केले आहे. जिल्हयातील पहिली तंबाखूमुक्त माध्यमिक शाळा आहे. वनराई तयार केली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पहिल्या टप्प्यात दुसऱ्या क्रमांकावर तर दुसऱ्या टप्प्यात पहिल्या क्रमांकावर शाळा आली. संस्थेची भूमिका, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, विद्यार्थी यांची सर्वांची भूमिका सर्वात महत्वाची आहे. आमच्या शाळेचे ब्रीद राष्ट्राच्या विकासाचे शिक्षण हे आहे. इयत्ता 5 वी ते 10 वी च्या वर्गाची शाळा आहे. शाळेची सध्याची पटसंख्या 376 आहे.

8) **श्री. सिध्दाराम रायगुंडा माशाले, जि. प.प्रा. शा अंबिकानगर (बाळे), ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**



2016 मध्ये बदली या शाळेवर झाली आहे. जिल्हयाची हद्द वाढ झाल्याने ही शाळा शहरात आली त्यामुळे मनपा काहीच मदत करत नव्हती.आजूबाजूला 10 ते 12 खाजगी प्राथमिक शाळा आहेत.तसेच इंग्रजी माध्यमाच्या तीन नामांकित शाळा याच परिसरात आहेत. तरीही आम्ही शाळेचा पट व्यवस्थित टिकविलेला आहे.व्हिडीओद्वारे सादरीकरण केले, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत ही शाळा सोलापूर जिल्हातील प्रथम क्रमांकाची शाळा ठरली आहे. शाळेला 11 लक्ष रुपयांचे बक्षीस मिळाले आहे. इतर शाळेतील समस्यापेक्षा जास्त समस्या या शाळेला होत्या परंतू यावर मात करुन या शाळेची प्रगती केली. यासाठी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली आहे.

यासाठी वाबळेवाडीच्या वारे गुरुजींचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. वर्ग सजावट, बोलक्या भिंती, कौशल्य विकास,, परसबाग, स्पर्धा असे उपक्रम शाळेने राबविले, माजी विद्यार्थी, शिक्षकांचा सहभाग, लोकवर्गणी याचा फायदा झाला. सोलर पॅनल, विविध् डिजीटल क्लासरुम तयार केल्या. अवांतर वाचनाची आवड निर्माण केली आहे, संगीताची आवड विद्यार्थ्यात निर्माण केली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा याअंतर्गत जिल्हयातून शाळेने पहिला क्रमांक मिळविला आहे. शाळेचा प्रतिकुल परिस्थितीतून कमी काळात कायापालट झालेला आहे.CSR मधून 25 लक्ष रुपयांची मदत शाळेला झाली. इंग्लिश शाळेपेक्षा अधिक चांगल्या सुविधा या जिल्हा परिषदेच्या शाळेत उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.या शाळेतील सुविधा कोणत्याही शाळेत दाखवा व बक्षीस मिळवा असा फलक लावलेला आहे. यामुळे यावर्षी पहिलीला 27 विद्यार्थी नवीन दाखल झाले. पुरामध्ये या विद्यार्थ्यांचे दप्तर वाहून गेले होते अशा विद्यार्थ्यांना बॅग वाटप केले.

9) डॉ. स्नेहलता पटेल, मुख्याध्यापक,दौसा राजस्थान



महाराष्ट्रातील शाळेत सर्वजण खूप चांगल्याप्रकारे काम करत आहात. लोकवर्गणीतून मिळालेल्या रकमेतून 10 लक्ष रुपये खर्च करुन Smart Classroom तयार केली. शारिरीक, मानसिक स्वतंत्रता पाहिजे. त्याशिवाय कामे होऊ शकत नाहीत. 2017 पासून राज्यस्तरावर काम करत आहे. महाराष्ट्रात येउुन खुप शिकून जात आहे. आमचे विद्यार्थी राज्य लेवलवर क्रिकेट खेळतात, कब्बडी खेळतात. 5+ 3+ 3+ 4 अशी राजस्थानमध्ये वर्गवारी केलेली आहे. FLN नुसार प्रत्येक विद्यार्थ्याला संख्याज्ञान प्राप्त झाले पाहिजे. तिसरी वर्गापर्यंत वाचता आले पाहिजे यासाठी आमची शाळा सतत प्रयत्नशील असते .

10) राजेंद्र लखनलाल सांगोडे, पी एम श्री.जि. प. प्रा. शा.हिरडामाली ता. गोरेगाव, जि. गोंदीया



शाळेची स्थापना दिनांक 06.06.1947 रोजी झालेली आहे. वर्ग इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंत वर्ग आहेत. सर्व वर्गाची एकूण पट संख्या 560 आहे. एकूण 13 शिक्षक आहेत. शाळेमार्फत 7 शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे. येथील पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे होता. मी व आमच्या सर्व टीमने शाळेचा कायापालट केला. एलईडीटिव्ही, डिजीटल शाळा, प्रोजेक्टर,डिजीटल क्लासरुम तयार केली. पूर्व प्राथमीक शाळेची सुरुवात केली. आय सीटी लॅब तयार केली. यामध्ये 10 संगणक आहेत. आमच्या शाळेत परिसरातील 22 गावांचे विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी Interactive Board आहेत. शाळेच्या भींतीवर रंगरंगोटी केली आहे.

11) श्रीमती गार्गी संजय चतुर्वेदी, मुख्याध्यापिका, पीएमश्री उल्हासनगर मनपा हिंदी विद्यालय जि.ठाणे



शेजारच्या परिसरातील 13 किमी अंतरावरून विद्यार्थी शिकण्यासाठी शाळेत येतात. नवाचार क्या है? जीवन मे आनेवाली समस्याओं को नए और बेहतर तरिकोंसे हल करने की खुली ओर नई सोच तथा नए तरीके अपनाना. वास्तविक दुनिया की समस्याओं को हल करनेकी क्षमता विकसीत करना. नवाचार का महत्व छात्रों को विषयमे आनेवाली समस्याओं और अनजान परिस्थीतीयों से निपटने के लिए तैयार करना. गुणवान छात्रो व शिक्षकोंको निर्माण करना. 21 वी सदी के कौशलों का विकास करना और सरस्या समाधान की क्षमता बढाना. विद्यार्थीयों का सर्वांगिण विकास करना इसी विचार से हर शिक्षक,विद्यार्थी और मुख्य अध्यापक काम करते है -

12) डॉ. संध्या मिलींद खेडेकर, ए.के. महिला महाविद्यालय नाशिक



आमच्या शाळेमध्ये खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत.

Infrastructure Facilities and learning Resources Class Room (24), Laboratories (14), ICT enabled Classrooms (16) Labs (10), Digital Classroom (04), Digitalized Library) Assembly Hall AC with a Seating Capicity of 200 Persons, Conference Hall.

Infrastructure Facilites and Learning Resources Playground and Gynnasium, E-mode Unlv. Exam Centre, Shantiniketan Students Creativity Studio, WI-FI and Free Internet Facillty for Staff and Students, Amphitheatre Horegallu smrk Katta a Platform for self-expression, Canteen, Fire Fighting System, Ramp for Differently Abled

13) श्रीमती गायत्री देशपांडे, जि.प. आदर्श उच्च प्रा. शा. जळगाव मेटे, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

PPT द्वारे सादरीकरण केले. आमच्या शाळेला पर्यटनस्थळ म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. शाळेचा पट 120 विद्यार्थी आहे. गावातील पालकांनी शाळेसाठी एकूण 6 एकर जागा दान दिलेली आहे. गुणवत्ता वाढीसाठी शाळेमध्ये कौन बनेगा ज्ञानपती ही स्पर्धा घेतली जाते. वादविवाद स्पर्धा घेतल्या जातात. शाळेत विद्यार्थ्यांसाठी बचत बँक स्थापन केली आहे. या शाळेतील मुले एकाच वेळी दोन्ही हाताने लेखन करतात. स्मार्ट बोर्डचा वापर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी केला जातो. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी बोर्डाचा वापर होतो. PPT द्वारे विविध भाषा शिकवील्या जातात. Tab चा वापर विद्यार्थ्यांसाठी केला जातो. Google Meet द्वारे विद्यार्थी परीक्षा देतात. AI च्या माध्यमातून मुले गेम तयार करतात.

14) डॉ.विशाखा भालेराव, MIT ADT विद्यापीठ, पुणे



अध्ययन अध्यापन क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. आमच्या येथून जवळपास 500-700 शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. (Capasity Building Traning) शिक्षकांना अद्ययावत ज्ञान दिले पाहिजे. महाराष्ट्रात बऱ्याच शाळेला अजूनही संगणक नाही त्यामुळे तेथील मुलांना डिजीटल शिक्षण घेतांना अडचणी येत आहेत. ICT चा वापर शिक्षकांनी मोठया प्रमाणावर केला पाहिजे.

शाळा व समाज हे दोन नाहित. दुसरी गोष्ट अशी की विद्यार्थी यांचा गुणात्मक विकास कसा करता येईल यावर सादरीकरण केले आहे. मुख्याध्यापकांना आपल्या सहकाऱ्यांकडून काम करुन घेता आले पाहिजे.विद्यार्थ्यामध्ये खेळ, कला, संगीत याचा विकास झाला पाहिजे. या सर्व गोष्टी करताना विद्यार्थ्यांवर अतिरिक्त बोजा पडणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. आजचे विद्यार्थी जिज्ञासू आहेत. त्यांना मानसिक दृष्टया सुदृढ बनविले पाहिजे.

अ - टीम (दि.03.01.2026)

1) श्री. दादासो नरसोगोंडा पाटील, मुख्याध्यापक, अजितराव घोरपडे विद्यालय कळंबी, ता. मिरज, जि. सांगली



मी येथे 2008 पासून मुख्याध्यापक आहे.शाळेचे गीत सादर केले. ही शाळा 1965 पासूनची ची जूनी शाळा आहे. 2016-17 मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत कोल्हापूर विभागातून शाळेने पहिला क्रमांक पटकावला आहे. प्रभावी शालेय व्यवस्थापन असले पाहिजे.

या गावची लोकसंख्या 3000 आहे. पट संख्या 734 आहे. या संपूर्ण विद्यार्थ्यांची आधारकार्ड, जन्मप्रमाणपत्र, अपार आयडी, फोटो, स्पर्धेतील भाग, इतर प्रमाणपत्र इ. सह संपूर्ण शाळेचा अभीलेख, सर्व रेकॉर्ड एकाच QR कोडवर आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची सध्याची माहिती,मागील शाळेतील माहिती एकाच QR कोडवर उपलब्ध आहे. असा उपक्रम राबविणारी ही महाराष्ट्रातील पहिली शाळा आहे की ज्याची माहिती एकाच QR कोडवर आहे. यासाठी AI ची मदत घेतली आहे. जवळपास हा 40 जीबी डाटा आहे. विद्यार्थी संख्या वाढ होत आहे. 75 व्या वर्षी अमृत महोत्सवी कार्यक्रमानिमीत्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

2) श्री.संतोष सपकाळ, पीएमश्री. जि.प.प्रा.शा, रीसोड,जि.वाशिम



पीपीटी द्वारे सादरीकरण केले.आम्ही शाळेत विद्यार्थ्यासाठी सामुहिक सराव,योगा, घेतो. आनंददायी शनिवार,आम्ही विद्यार्थ्याचे अभ्यासगट तयार केले. लोकवर्गणीतून शाळेसाठी खूप कामे केली. करोना काळात शाळा क्वारंटाईन सेंटर होती. यामध्ये कोरोना रुग्णांना क्वारंटाईन ठेवत होते. 2022-23 मध्ये पीएमश्री शाळेचा दर्जा मिळाला आहे. पालक समाधानी झाले पाहिजेत.


व्यवस्थापन हा महत्वाचा घटक आहे. लोकवर्गणीतून बोअरवेल घेतले. 2024-25 मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. 2 मध्ये जिल्ह्यातील तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. गावामध्ये दोन पंचायतसमीती सदस्य येतात. गावाची मतदानामध्ये विभागणी झालेली आहे. गाव राजकारणी आहे. परंतू या सर्वांना सोबत घेउन काम करत आहे.

3) श्री. रविंद्र रत्नाकर यमसलवार,जि. प. प्रा. शा. शिवणीपाठ, ता. अहेरी, जि. गडचिरोली



जिल्हास्तरावरील आदर्शशिक्षक पुरस्कार मिळाला आहे.दुसऱ्या वर्षी याच शाळेतील सह शिक्षिका यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला. सर्वात छोटी शाळा आहे. सर्वाचे काम एकच आहे फक्त दिशा वेगळी आहे. व्हीडीओद्वारे सादरीकरण केले. येथे आदीवासी लोक आहेत. या शाळेतील शिक्षकांनी नवनवीन पध्दतीचा अवलंब केला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत पहिला पुरस्कार या शाळेला मिळाला. विद्यार्थ्यांनी खेळ, संगीत, कला यामध्ये आपली हुशारी दाखविली. शिक्षक, विद्यार्थी व गावकाले यांनी मिळून शाळेचा विकास केला. संपूर्ण गाव शाळेशी जोडले गेले होते. बोलक्या भींती, परसबाग, तयार केली.

4) **श्री. सुनिल सोमनाथ भांगरे, मुख्याध्यापक, धारावी काळाकिल्ला, मनपा मराठी उच्च प्राथमिक शाळा क्रमांक** 2 **धारावी, मुंबई**



कोरोना काळात 2019 मध्ये बदलीने ही शाळा मिळाली आहे. आम्ही शाळेत बालवाडी शाळा सुरु केली. त्यामध्ये दोन वर्ग चालू केले. बालवाडी शाळेसाठी स्मार्ट टिव्ही मिळवला. येथे बहुभाषीक लोक आहेत. आम्ही एप्रील महिन्यातच पहिलीच्या वर्गाचे प्रवेश घेतो. दर महिन्याला शाळेमध्ये पालक सभा घेतली जाते. पहिलीचा शाळेचा पट 60 आहे. CSR मधून संपूर्ण इमारत डीजीटल केली आहे, एसी, संगणक प्रयोगशाळा तयार केली. शाळेला परसबाग तयार केली. रोटरी क्लबची यासाठी मदत झाली.

या शाळेला विविध पुरस्कार मिळाले आहेत. तळमजल्यामध्ये वर्ग खोल्या नव्याने तयार केल्या. NGO कडून त्यामध्ये पार्टीशन करुन घेतले. ध्वनीक्षेपक बसवले, 25 सीसीटीव्ही बसवले. एसी संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा तयार केली. पालकांना शाळा दाखवतो तेव्ही पालकांनाही शाळा आवडते. टेरेसवर परसबाग तयार केली. शाळा संपल्यानंतर मुलींसाठी मेहंदी क्लास घेतले जातात. मुलांना मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण दिले जाते. मुंबई महानगर पालिकेच्या शाळेच्या चित्रकला स्पर्धेचे 15 व 20 हजार रुपयाचे बक्षीस आमच्या शाळेतील मुलींना मिळाले आहे. शिवाजी पार्कला 26 जानेवारी, 2025 रोजी संचालनासाठी मुलींचे पथक गेले होते त्या पथकाचे नेतृत्व या शाळेतील मुलीने केले.

5) अश्विन शर्मा:शासकीय एकीकृत कन्या मा. विद्यालय, महाराज बरतावसिंह शासकीय उच्च माध्यमिक विद्यालय, अझमेरा, विकासखंड सरदारपूर, जि. धार, मध्यप्रदेश



आदीवासी भागातील एक शाळा आहे.आदीवासी मुलींना घरातील कामात लावले जाते. लोकसहभागातून शाळेचा विकास केला आहे. राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. जिल्हास्तरावरील पुरस्कार मिळाला आहे. बालमेळावा घेतला जातो. लंडन मधून एक पथक शाळा भेटीसाठी आले होते. स्पेनचे काही लोक निरीक्षणासाठी आले होते. तीन मंत्र्यानी शाळेला भेट दिली आहे. डीजीटल बोर्ड,बोलक्या भींती तयार केल्या. सहलीचे आयोजन केले जाते. पालकांच्या सहभागावर विशेष लक्ष दिले जाते. देशविदेशामध्ये या शाळेच्या मुली वेगवेगळया क्षेत्रात सेवा देत आहेत.


6) श्री. श्रीकांत काटेलवार, वाळवी, जि. गडचिरोली



आमच्या गावाची 50 ते 100 घरवस्ती आहे. आदीवासी वस्ती आहे. शाळेत जायला नीट रस्ता सुद्धा नाही. शाळेत गेलो तेव्हा तेथील लोक मला ओळखही दाखवत नव्हते, पाणी सुध्दा देत नव्हते. त्यांच्या चालीरीती, भाषा मी आत्मसात केली. त्यासाठी तीन वर्ष लागले. शाळेचे महत्व पटवून दिले. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे केंद्र म्हणून तयार केले.

त्यांच्याच भाषेतून शिकविले. दगडावर लेखन केले, धूळपाटी तयार केली, पानावर,बांबूवर, खांबावर शब्द लिहिले. नवोपक्रमामध्ये या शाळेचा राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. राज्य शासनाचाही पुरस्कार मिळाला आहे. व्हीडोओद्वारे सादरीकरण केले.विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेतून शिक्षण दिले. स्थानिक बाबींचा विचार करुन गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले.किचन शेड आहे. शौचालय आहे. 24 तास लाईट आहे. इंटरनेट आहे. राष्ट्रीय स्तरावर एक प्रेरणादायी शाळा म्हणून माझी शाळा दाखवली जाते. शाळेला लोकांकडून भरभरुन मदत झाली आहे. कारण शाळेपर्यंत वस्तु घेऊन जाणे फार कठीण आहे.

7) श्री. सुमंत दत्ताराम दळवी कनेडी गट शिक्षणप्रसारक मंडळ मुंबई, जि.सिंधुदुर्ग



या शाळेचे सुंदर असे प्रेरणादायी गीत सादर केले. 23 जून 2024 माझी विद्यार्थी मेळावा घेतला होता यामध्ये 3000 माजी विद्यार्थी एकत्रीत केले होते. एकाच वेळी 50 लाखाची देणगी या शाळेसाठी दिली होती. या नवीन शाळेसाठी त्यांनी माजी विद्यार्थी स्नेहबंध इमारत नाव दिले आहे. 71 वे वर्ष शाळेला चालू आहे. 1 ली ते 12 पर्यंतचे वर्ग आहेत. ज्या प्रेरणादायी शाळा आहेत त्यांनी आपले शाळेचे स्वत: गीत तयार केले पाहिजे.सर्व शाळांनी शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घेतला पाहिजे. आम्ही शाळेसाठी आतापर्यंत 50 लाख लोकसहभाग घेतला आहे.यामध्ये व्यायामशाळा तयार केली आहे.शाळेमध्ये मुले टिकविणे अवघड आहे. नारळाचा उपयोग आम्ही पोषण आहारामध्ये करत आहोत. आम्ही फुलबाग फुलविली आहे. बॉटनीकल गार्डन तयार केली आहे. वनौषधी आहेत. वनौषधीची नर्सरी तयार करावयाची आहे. बायोगॅस प्लॅट तयार केला आहे. या बायोगॅसवर 100 विद्यार्थ्यांचे अन्न तयार केले जाते. किमान 30 लाख लोकवर्गणी घ्यावी असा आम्ही संकल्प केला आहे. स्वत:, लोकाश्रय, राजाश्रय, शासनाचा आश्रय यावर शाळा चालतात. सलग दोन वर्ष मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अंतर्गत दोन वेळा आमची शाळा पहिल्या क्रमांकावर आली आहे.

8) जे. डी. पठाण, प्राचार्य, सरस्वती विद्यालय ज्यु. कॉलेज ता. अर्जुनीमोरगाव, जि. गोंदिया



आमच्या शाळेमध्ये एकूण 65 गावांचे विद्यार्थी प्रवेश घेतात. वेळेचे कुठलेही बंधन नसते. माझी शाळा तालुक्यामध्ये नामांकित आहे. सुरवातीला 5 वर्ष टीम बनवावी लागली. जास्त काम करावे लागले. आपण स्मार्ट काम करत आहोत त्यामुळे आपण आज येथे आहोत. 1997 मध्ये आम्ही मेरीट हा शब्द दिला. आमचे विद्यार्थी राज्य, देश पातळीवर खेळ किंवा इतर क्षेत्रात जात आहेत. या शाळेत 45 शिक्षक कार्यरत आहेत. शासनाचे उपक्रम येत असतात. निकालावरुन व इतर ॲक्टीव्हीटीवरुन शाळेची गुणवत्ता ओळखली जाते. तासिका बुडायला नकोत. चारपाच प्रकारचे वेळापत्रक तयार केले आहेत. एका वर्गात 60 विद्यार्थी आहेत एकूण शाळेत 1500 विद्यार्थी आहेत. 60 पुस्तकांचा बंच तयार केला. त्यामुळे विद्यार्थी वाचन करतात. चित्रकला अप्रतीम आहे.

9) श्री. बालाजी पांडुरंग तुरेवाले, मुख्याध्यापक, पीएमश्री जि. प. प्रा. शा टाकळगाव, कामखेड ता. अहमदपूर जि. लातूर



2015 आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. शाळेची इमारत उभी केली. ग्राम प्रतिनिधी यांचे सहकार्य मिळाले. व्हीडीओ द्वारे सादरीकरण केले. स्वप्न पाहणे व त्याला सत्यात उतरवणे आवश्यक आहे. भौतिक सुविधांची कमतरता होती. प्रत्येक विद्यार्थी यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. लोकप्रतिनिधी, पालक, ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.डीजीटल शाळा तयार झाली आहे.

2023-24 पीएमश्री योजनेत शाळेचीनिवड झाली. विकासाला नवी जोड मिळाली. मुलांच्या वैवीध्यपूर्ण गरजा ओळखून त्यांचा विकासाला दिशा देण्याचे काम केले. आयसीटी लॅब, प्रोजेक्टर, स्मार्ट टिव्ही, बोर्ड मिळाले. बालमन घडविणारी शाळा आहे. येथे योग, कवायत, खेळ, स्वरंक्षणाचे धडे दिले जातात. सहल, ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या जातात.निसर्गरम्य स्थळांना भेटी दिल्या जातात. वर्कशॉप, तारांगण भेटी किशोरी मेळावे घेतले जातात. आज 384 शाळेचा पट आहे.

10) श्री. संजय लक्ष्मणराव कोटगीरे, मुख्याध्यापक, के. प्रा. शा केंद्र बेंचमुखेड,जि. नांदेड




आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक,महाराष्ट्र या राज्याच्या सीमेवर हा तालुका आहे. 1889 ची शाळेची स्थापना आहे. निजामकालिन उर्दू भाषेतील शाळा असूनही शाळेला स्वतःची इमारत नव्हती. 125 वर्ष भाडयाच्या इमारतीत शाळा भरत असे. पटसंख्या 10 होती. आज स्वत:च्या इमारतीत शाळा भरत असून शाळेचा पट 591 आहे. शिक्षक संख्या 20+2+3 अशी आहे. केवळ सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्यातून आज शाळेला 16 खोल्यांची स्वत:ची इमारत आहे. लोकसहभागातून मैदान उपलब्ध झाले आहे. 200 मीटरवर इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. तसेच इतर दोन शाळा खाजगी आहेत. आठ पैलू जोडले फक्त लोकसहभाग महत्वाचा आहे. येत्या जून महिन्यात शाळेची पट संख्या 1000 करण्याचे आमचे शाळेचे उद्दीष्ट आहे. 1 ते 8 वर्ग असून 14 तुकडया आहेत. 40 हजार रुपये किमतीचे 3 LCD प्रोजेक्टर आहेत. 5 स्मार्ट पॅनल आहेत. शाळेच्या सर्व तुकडया डिजीटल आहेत. 18 गुंठे जमीन मैदानासाठी वापरली आहे. शासनाकडून दोनच गणवेश मिळतात परंतू आम्ही 360 विद्यार्थ्यांना शाळेचा तिसरा स्पोर्ट गणवेश SMC व शिक्षक यांनी उपलब्ध करुन दिला आहे. NMMS, स्कॉलरशीप व इतर सर्व स्पर्धा परीक्षाचा अभ्यास दुपारी 4 ते 5 या वेळात घेतला जातो. एकाच वेळी 350 विद्यार्थी बसतील एवढ्या टेरेसवर भोजनकक्ष तयार केला आहे.

11) डॉ. वंदना बडवाईक, नूतन भारत विद्यालय कनिष्ठ विद्यालय, अभ्यंकरनगर, नागपूर



आजूबाजूच्या इंग्रजी शाळेला पाठविणे पालकांना मोठेपणा वाटते. माझ्याकडे शाळा आल्यानंतर इयत्ता 5 ते 10 वर्गासाठी फक्त 38 पट शाळेचा होता.आज तो 350 आहे. आम्ही विद्यार्थी नागपूर परिसरातील ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यासाठी घेउन जातो. माझ्या शाळेमध्ये माध्यमिकमध्ये तीन शिक्षक आहेत. बूट बाहेर काढले जातात. जीवनाशी निगडित शिक्षण देतो. CPR बाबत शिक्षण दिले जाते. तुळशीचे झाडे लावली आहेत. राखी तयार करुन त्यांच्याच घरी पोस्टाने पाठविली जाते. विद्यार्थी आणि शिक्षक यांनी 40 x 50 फुटाची राखी तयार केली, त्याची नोंद जागतीक स्तरावर घेतली गेली. आनंददायी शनिवारमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. शिक्षक नसतील तरी विद्यार्थी स्वत: शिकतात व शिकवितात. आमच्या शाळेची सुरुवात ओमकाराने होते गायत्री मंत्राने होते. 3 मीनीटाचा पावर योगा घेतला जातो. जनरल नॉलेज अंतर्गत प्रश्नोत्तरे घेतली जातात. संस्कृती हॅकेथॉन आयोजित केले. शाळेत दिवाळी साजरी करतो. आम्ही एका बेंचवर एक मुलगा व एक मुलगी असे बसवतो. जेवण तयार करण्याची कला शिकवतो. 15 दिवसाला प्रत्येक शिक्षकाला मुख्याध्यापक चार्ज दिला जातो. शिक्षक सक्षम तर विद्यार्थी सक्षम होणार आहे. प्रत्येक शिक्षक दर शनिवारी अनेक मूल्याधारित,वैज्ञानिक,गोष्टी मुलांना सांगतात. चार विद्यार्थी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरांवर सॉफ्ट बॉल मध्ये एशिया कपमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. 100 पेक्षा जास्त राज्य स्तरांवर आहेत. शाळेला आदर्श शाळा पुरस्कार मिळाला आहे.

12) श्री.विलास नारायण परब, मुख्याध्यापक, लीटल एंजल हायस्कुल, माटुंगा, मुंबई




आमची शाळा 65 वर्षाची जूनी आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा आहे या शाळेकडे इंग्रजी माध्यमाची शाळा म्हणून बघू नका. तुमचा व माझा विद्यार्थी सारखाच असतो. माझा घटक आहे स्कुल लीडरशीप व स्कुल लरनिंग. धारावीचे विद्यार्थी या शाळेत येतात. कन्नड ट्रस्टची शाळा आहे परंतू इंग्रजी माध्यमाची आहे. माझा विद्यार्थी कसा असावा याबाबतची माहिती विशद केली. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य त्याच बरोबर त्यांची जबाबदारी काय आहे याची त्यांना जाणीव करुन दिली जाते. सर्व जाती धर्माची मुले शाळेत शिक्षण घेत आहेत. स्कुल लिडरशीपमध्ये कामाची विभागणी केली आहे. अध्ययन व अध्यापनाचे काम सर्व शिक्षक करतात. माझ्या शाळेतील शिक्षकांना ऑनलाईनचे 25 टक्केही काम दिले जात नाही.प्रत्येक वर्ग 75 इंचच्या पॅनलने जोडलेला आहे. कुठलीही शाळा असो त्याला लोकवर्गणीतून मदत झालीच पाहिजे.नोट्स दाखविल्या जातात. खेळाचे तास घेतले जातात. मुलांना वार्म अप, मुख्य खेळ व नंतर पुल डाऊन एक्सरसायझेस करून घेतले जातात. प्रत्येक वर्गाला कराटेचा क्लास कंपलसरी आहे. माझ्या शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय भाषा दिवस साजरा करतो.त्यांच्यात मातृभाषेची आवड निर्माण व्हावी हा हेतू आहे.मल्टीपल टॅलेंट ग्रुप तयार केले आहेत. परिसरातील महत्वाच्या संस्था आहेत तिथे मुलांच्या भेटी दिल्या जातात. CWSN च्या विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेतली जाते. टॉय डोनेशन करतो.

13) श्रीमती सुषमा रमेश भामरे, मुख्याध्यापिका,जि. प. उंमरे, ता. साक्री जि. धुळे



मी माझी शाळा गावात नेली व गावाला शाळेत आणले आणि शाळेचा विकास झाला.माझ्या शाळेची स्थापना 1920 ची आहे. 2018 मध्ये जिल्हांतर्गत बदलीने येथे आली आहे. ही शाळा त्या जिल्हयातिल शिक्षकांनी मागितलेली नव्हती. PPT द्वारे सादरीकरण केले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत टप्पा क्रमांक 1 मधून 11 लक्ष रुपयांचे पहिले बक्षिस मिळाले.हा कायापालट सात वर्षातील आहे. बीएलओचे काम तसेच सर्व ऑनलाईनचे काम मुख्याध्यापक या नात्याने मीच करते.सर्व सुविधा उपलब्ध आहेत. लोकसहभागातून हा विकास झालेला आहे. वर्ग खोल्या शासनाची मदत आणि लोकसहभागातून केले. आम्ही विद्यार्थ्यावर काम केले, गुणवत्तेवर काम केले. विद्यार्थी स्वत: शिकण्यासाठी तयार झाला पाहिजे.नवीन चॅलेंज विद्यार्थी घेत असतात. दोन हातानी मुले लिहीतात. परसबाग तयार केली. राज्यावर नामांकन मिळाले. त्याचा वापर शालेय पोषण आहारात केला जातो. शाळेच्या विविध यशोगाथा आहेत.स्पर्धा परीक्षांमध्ये मुले पुढे जात आहेत. आमच्या शाळेत दोनच शिक्षक आहेत. जुनी शाळा असल्याने जनरल रजिस्टर अत्यंत खराब, जीर्ण अवस्थेत होते त्यांना आज लॅमीनेट करुन ठेवले आहेत. दोन महिने रात्रवर्ग येथे चालले. लोकांना दोन स्वयंसेवकांनी साक्षर केले. शाळेचेफेसबुक पेज, युटयुबचॅनल व इंस्टाग्राम पेज आहे याच्या माध्यमातून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा.

14) **श्रीमती वैशाली देविप्रसाद गावीत, मुख्याध्यापिका,विठोबा खंडोप्पा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पनवेल, नवी मुंबई**



व्हीडीओद्वारे सादरीकरण केले.खाजगी अनुदानित शाळा 106 वर्षाची जूनी आहे. या शाळेची स्थापना 1919 ची आहे.पुस्तकी ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांच्या कल्पकतेला वाव दिला पाहिजे.या शाळेत मुलांकडून चित्रकला व इतर कला करुन घेतल्या जातात. नेतृत्व कसे असले पाहिजे सर्वांच्या विकासाला वाव देणारे असावे. या शाळेचा 5 वी ते 12 वीचा एकूण 3651 पट आहे. 79 शिक्षक वर्ग, 11 शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण 90 कर्मचारी कार्यरत आहेत. एकूण 112 कर्मचारी मंजूर आहेत. अजूनही 22 जागा रिक्त आहेत. दरवर्षी आंम्हाला प्रवेश बंद असा बोर्ड लावावा लागतो. आमच्या संस्थेची एक नंबरची ही शाळा आहे. माजी मुख्यमंत्री मनोहरजी जोशी हे या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांकडून 70 ते 80 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झालेला आहे. आपल्या शाळेला मिळालेले बक्षिस हे आपले प्रोत्साहन आहे म्हणजे आपण आपले काम पुढे आणखी जोमाने करु शकू. आमच्या संस्थेच्या पूर्व प्राथमिक पर्यंत एकूण 92 शाखा आहेत. आमच्या संस्थेने चॅम्पीयन ट्रॉफी ठेवली आहे या पहिल्या वर्षीच पहिला मान आमच्या शाळेला मिळाला आहे.

15) श्री.दिगंबर भगवान घोडके, जि.प.प्रा.शा., साखरा,जि.वाशिम.



ही शाळा आशिया खंडातील अत्यंत उत्कृष्ट जिल्हा परिषदेची शाळा आहे. शुन्यातून विश्व निर्माण करणारे आमचे शिक्षकच आहेत. या शाळेत दोन शिक्षक आहेत. एकूण 54 विद्यार्थी होते. एक गुंठा जागा होती. गुणवत्ता पाहून जिल्हाधिकारी यांनी आमच्या शाळेला 37 एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. गुणवत्तेची दखल घेउन केंद्र शासनाने इमारत बांधकाम खर्च 2 कोटी 67 लक्ष इतका उपलब्ध करुन दिलेला आहे. या शाळेत शेजारच्या 45 गावातून विद्यार्थी स्वतः खर्चाने येतात. इयत्ता 1 ली ते 9 वी पर्यंत या शाळेत एकूण 1097 मुले शिक्षण घेत आहेत. आमच्या शाळेची मोठी परसबाग आहे. पूर्व प्राथमिकचे भारतातील सर्वात मोठे संकुल या शाळेचे आहे. यामध्ये 525 विद्यार्थी वेगवेगळया गावातून येतात. या शाळेला पालकांनी 67 लक्ष लोकवर्गणीतून निधी मिळाला आहे. शाळेसाठीच्या सर्व सुविधा ग्रामीण भागात उभ्या केलेल्या आहेत. या शाळेतून एकाच वर्षी 25 विद्यार्थी नवोदयला निवडले गेले आहेत. ISO नामांकन प्राप्त शाळा आहे. 2023-24 मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत पहिले 51 लक्ष रुपयांचे बक्षिस मिळाले आहे. हे सर्व पालक, शिक्षक, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन यांचेमुळे शक्य झाले आहे. या शाळेला दर शुक्रवारी वेगवेगळया शाळेतून शिक्षक येत असतात.शाळेला भेट देण्यासाठी सर्व मान्यवर आमंत्रीत आहात. प्रवेशासाठी दिड ते दोन कि. मी. ची रांग लागलेली असते.

16) **श्री. अनिल कनिराम चव्हाण, मुख्याध्यापक, आदर्श शाळा जि.प.प्रा.शा. बोराखेडी, मा.मोताळा, जि.बुलढाणा.**



व्हीडीओद्वारे सादरीकरण केले.शाळेसाठी क्रीडांगण आहे. शाळेत प्रवेश केल्यानंतर बाग दिसेल, शाळेच्या भिती बोलक्या आहेत. सर्व शाळेला शुध्द पाणी पिण्यासाठी RO उपलब्ध केले आहे.आम्ही शाळेसाठी परसबाग तयार केली आहे. आमच्या शाळेच्या भितीवर पर्यटनस्थळ विषयक माहिती रेखाटली आहे. आमच्या शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत राज्यावर दुसरा क्रमांक तर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे.शाळेत पोहोचलो तेव्हा माझी तक्रार करण्यात आली होती. आपल्या सारखे शिक्षण क्षेत्रात लोक आहेत म्हणून शिक्षणाला महत्व आहे. कारण तुमच्यामुळेच जिल्हा परिषदेच्या शाळेत मुले टिकून आहेत. जी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर होती त्या शाळेला आज विविध पुरस्कार मिळाले आहेत. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत दुसऱ्या क्रमांकावर शाळा आहे. महत्वाचे म्हणजे या शाळेत माझ्या सोबत दहा महिला शिक्षिका काम करत आहेत त्यांचा शाळा गुणवत्ता वाढीसाठी मोलाचा वाटा आहे.

17) ध्रुवास मामराज राठोड, आडोळ महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अनुसुचित जाती व नवबौध्द निवासी शाळा सोनगीर, ता.जि.धुळे



जो पर्यंत शाळेची गुणवत्ता वाढत नाही तो पर्यंत शाळेत विद्यार्थी संख्येत वाढ होत नाही. डिसेंबर - 2024 मध्ये माझी विशेष बदली या शाळेवर झाली.तेव्हा शाळेचा पट 64 होता.महाराष्ट्र राज्यातील सर्वोत्कृष्ट निवासी शाळा आहे. मी सुरुवातीला शाळेला भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या शेरेबुकमधील शेऱ्यांची यादी तयार केली. या शाळेमधील उणिवाची यादी तयार केली. प्रत्येक दिवसाचे नियोजन केले. कुतुहल उपक्रम राबविले ज्यामध्ये विद्यार्थी निरीक्षण क्षमतेला चालना दिली जाते. क्षेत्रभेटीसारखे उपक्रम राबविले, प्रहरी क्लब चालू केले आहेत. 7 लक्ष रुपये खर्च करुन जीम तयार केली. लोकसहभागातून वॉटर प्युरीफायर बसवले. एकूण 35 उपक्रम राबविले. अत्याधुनिक संगणक लॅब तयार केली. अमर्यादित इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. सोलारची ऑनग्रीड सिस्टीम चालू केली त्यामुळे वीजेचे बील भरावे लागत नाही. उपक्रमाची लॅब तयार केली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत जिल्हयातून पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले आहे. 32 लक्ष रुपये खर्च करुन 64 सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या एकूण 92 शाळा आहेत.आज रोजी 194 विद्यार्थी प्रवेशित आहेत.

18) **नेहा दुबे, एकीकृत शासकीय माध्यमिक विद्यालय, सिन्धी खोदरी, ता. जि. बडवानी, मध्यप्रदेश**



ही शाळा 2014 मध्ये सुरु झाली आहे. प्राथमिक शाळा आहे.कधी कधी दिव्यांग मुलांची समस्या आपल्याला समस्या म्हणून वाटत नाही हीच खेदाची गोष्ट आहे. आपले उद्दीष्ट आहे की प्रत्येक मुलाचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे. शाळेचा व्हीडीओ सादर केला. नंतर PPT द्वारे सादरीकरण केले.विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी त्यांच्या पालकांना विनंती केली जाते तसेच दिव्यांग विद्यार्थी यांचे दस्तऐवज बनविले जात नाहीत. अशा परिस्थितीत पालक परेशान असतात त्यांना वाटते की माझ्या मुलाचे भविष्य काहीच नाही. त्यांचे कागदपत्र बनविणे अत्यंत आवश्यक आहे.

सुरुवातीला शाळेत एकूण 17 विद्यार्थी होते. सध्या 2025-26 मधील 1 ली ते 8 वी चा शाळेचा पट 64 आहे. यामध्ये मुलींची संख्या अधिक आहे.विद्यार्थी यांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे. दिव्यांग विद्यार्थी यांचेसाठी स्वतंत्र शिक्षक असावा. आमच्या जिल्हयामध्ये विकलांगासाठी एकही संस्था नाही ज्यामध्ये यांचे प्रवेश घेतले जातील.विकलांग मुलांमध्ये शाळेमुळे बदल झाल्याचे त्यांचे पालकांनी सांगितले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आपण सर्व मातापिता पेक्षा श्रेष्ठ आहात ,त्यामुळे शाळा ही वर्तन बदलासाठी महत्वाची आहे.

19) श्री.दिपक हिरामण देवरे, मुख्याध्यापक, श्री स्वामी समर्थ शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ संचलित प्राथमिक विभाग, माध्यमिक विद्यालय, करंज, ता. जि. जळगाव



पीपीटी व व्हिडीओद्वारे शाळेने राबविलेल्या विविध उपक्रमाचे सादरीकरण केले.2009 मध्ये शाळेची स्थापना झाली. विनाअनुदानीत संस्था होती. शाळेची दुरावस्था होती. क्रीडांगण नव्हते, सर्वाची परिस्थिती सारखीच होती. ज्ञानरचनेनुसार अध्ययन अध्यापनावर विशेष भर दिला जातो.मुले शाळेत कसे येतील यासाठी संस्थेने मुलांसाठी बसेस सुरु केल्या.आमच्या शाळेत जवळपासच्या 20 ते 22 खेडयातील मुले शिक्षणसाठी येतात. या परिसरात 2 माध्यमिक शाळा आहेत.

सुरुवातीची विद्यार्थी संख्या 138 होती तर 2025-26 मधील विद्यार्थी इयत्ता 5 ते 10 ची संख्या 495 झाली आहे. आमच्या संस्थेच्या 18 शाळा आहेत या शाळेपैकी 18 व्या नंबरची शाळा आमची होती. आज ही संस्था पहिल्या क्रमांकावर आणली आहे. तसेच जवळच्या गावातून मुलांसाठी सायकलचे वाटप केले. ग्रामीण भागातील शाळा टिकविणे अवघड आहे. आमच्या शाळेला सायंस लॅब, संगणक लॅब,टॅब,या सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. पालकांच्या वेळोवेळी सभा घेतल्या जातात. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत नाशिक विभागातून दुसरा क्रमांक मिळाला आहे.

20) श्री बालाजी मुद्दमवार, जि. प. उच्च प्राथमिक शाळा दहिफळ, ता. नेर जि. यवतमाळ



सदर शाळेचे पीपीटीद्वारे सादरीकरण केले. अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. उल्लेखनीय बाब म्हणजे सदर शाळेतील विद्यार्थी क्युआर कोड बनवतात.आजपावेतो शाळेतील विद्यार्थ्यांनी एकूण 350 क्युआर बनविले आहेत.रंगीत क्युआर कोड देखील बनवितात. सदर शाळेत नेतृत्वाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल चालू आहे. मी सन 2023 मध्ये सदर शाळेत बदलीने रुजू झालो आहे. सुरुवातीस शैक्षणिक स्थिती खालावली होती.गुणवत्ता सुधारणे, सुविधा पुरविणे, हे आव्हान समोर होते.या सर्व बाबींवर मात करुन सोबतीचे शिक्षक व गावकरी यांचे सहकार्याने गुणवत्ता सुधारली व गावकऱ्यांचा विश्वास संपादन केला.सदर शाळेत आदिवासी व बंजारा समाजाचे विद्यार्थी आहेत. विद्यार्थी संख्या 52 वरुन 76 झाली आहे.या कार्यशाळेचा उपयोग माझ्या शाळेसाठी व शेजारच्या शाळेसाठी करता येईल असे शेवटी सांगितले.

21)डॉ. प्रभाकर पांचाळ, जि.प.प्रा.शा.एकुरगा, ता.उमरगा, जि. धाराशीव



डॉ.पांचाळ हे सेट नेट पीएचडी.असून त्यांनी आज पर्यंत 350 कार्यशाळेत सहभाग घेतल्याचे सांगितले.सदर शाळेची स्थापना 1991 ची आहे.सद्यस्थितीत या शाळेत 16 शिक्षक व 237 पट आहे.सदर शाळेत सायबर सेक्युरीटी बाबत विद्यार्थ्यांना ज्ञान दिले जाते.या शाळेने दोन कोटी रुपये लोकसहभागातून जमा केले आहेत व सर्वांगानी शाळा अद्ययावत केली.ऑनलाईन लायब्ररी आहे.शाळेत ऑनलाईन सेमीनार घेतले जातात. शाळेत CSR व शासकीय विविध योजनेचा लाभ मिळवून दिलेला आहे.

सायंस ॲण्ड ॲस्टोनॉमी लॅब, 1.20 कोटी रुपयाची उभी केली आहे. डिजीटल क्लासरुम सर्व सोयीयुक्त आहेत. दिक्षा ॲपवर 300 पेक्षा जास्त व्हिडीओ शाळेने अपलोड केलेले आहेत. इयत्ता 6 वी 7 वी चे विद्यार्थी अपार आयडीचे ऑनलाईन काम अचुक करतात. AI टेक्नॉलॉजी, ग्लोबल सर्च, जेमीनाय ॲप, विकीपीडीया, इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक कामासाठी विद्यार्थी करतात. पालकांशी संवाद झुम मिटींगद्वारे केला जातो. सदरील शाळा ही आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण केल्यामुळे विद्यार्थी हसत खेळत गुणवत्तापूर्ण शिक्षण घेतात. गुगलवर शासकीय शाळा व कार्यालयासाठी 400 जीबी पर्यंत डाटा मोफत सेव्ह करण्याबाबत मार्गदर्शन केले व ज्यांना याचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी माझ्याशी 9420290920 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे सांगितले. डॉ.पांचाळ यांनी मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये सादरीकरण केले.

22) श्री.शाम मचाले, श्रीमती शांताबाई नखाते VJNT आश्रमशाळा वालूर, जि.सेलू, परभणी



सदर शाळेचे पीपीटी व व्हिडीओ द्वारे सादरीकरण करण्यात आले. सदर शाळेची स्थापना 1996 ची आहे.भटक्या जमातीतील इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात. वालूर मध्ये एक हजार वर्षापूर्वीची चक्राकार बारव आहे.प्राथमिक व माध्यमिक विभागात प्रत्येक वर्गात 120 विद्यार्थ्यांची क्षमता आहे व उच्च माध्यमिक विभागात 80 विद्यार्थ्याची क्षमता आहे.परभणी जिल्हयात सदर शाळा नावाजलेली आहे.सदर शाळेस शासनाकडून सर्व सुविधा मिळालेल्या आहेत. अटल लॅब् मिळालेली आहे.विद्यार्थ्याची गुणवत्ता अतिशय चांगली आहे. संस्थाचालक शाळेला सर्वतोपरी मदत करतात. क्षमतेनुसार सदर प्रवर्गाचे विद्यार्थी प्रवेश पूर्ण होतात. क्षमतेच्या जास्त आलेले विद्यार्थी आम्ही परिसरातील इतर शाळेकडे पाठविले जातात.

23) **श्री.कपूर नाईक, नेवजाबाई हितकारीणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर**



सदर शाळेची स्थापना 1941 ची आहे. 40 एकर जमीन शाळेला दान मिळालेली आहे. एकूण 1618 विद्यार्थी इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शिक्षण घेतात. एकूण 84 CCTV कॅमेरे सर्व परिसरात लावलेले आहेत. माझी शाळा मुख्यमंत्री शाळेत जिल्हयात प्रथम क्रमांक आला होता. टप्पा दोन मध्ये विभागातून प्रथम क्रमांक मिळालेला आहे. एकूण 41 शिक्षक व 5 शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. शाळेत शिस्त व गुणवत्ता असून त्याच बरोबर शालेय खेळ घेतले जातात. शाळेत राबविलेले विविध उपक्रम व परिसरातील भौतिक सुविधा क्रिडांगणाची माहिती पीपीटी द्वारे देण्यात आली.

24) Serveda G.Gaonkar, H.M. पी.एम.श्री. सेकंड लेफ्टनंट जेजे राणे Govt Highschool, Kudchire Biholim, Goa

सदर शाळा ही गुणवत्ता पूर्ण आहे.

बेसीक इन्फा्रास्टक्चर तयार केले.

सदरील शाळा मुख्याध्यापक या नात्याने बेस्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

हर्बल गार्डन उत्तम केलेले आहे.

औषधी वनस्पतीयुक्त गार्डन केले आहे.

पाण्यासाठी पुनर्रभरण केले आहे.

त्यांनी राबविलेले विविध उपक्रम व शाळेची गुणवत्ता या बाबत इंग्रजीमध्ये पीपीटीद्वारे सादरीकरण केले.

25) श्री. राम मुकुंदराव वाघुंबरे, पी. एम.श्री.जि.प.माध्यमिक शाळा खोकरमोहा, ता.शिरुर (का), जि. बीड



मुख्याध्यापक यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. सदरील शाळेत परिसरातील ऊसतोड कामगार यांची मुले आहेत. विज्ञान प्रयोगशाळा आहे. सदर शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.दोन विद्यार्थी जिल्हापरिषद अंतर्गत घेतलेल्या स्पर्धेद्वारे नासा सेंटर अमेरिका येथे भेट देऊन आले आहेत. दोन विद्यार्थ्यांची इस्त्रोला शासनातर्फे भेट देऊन आलेले आहेत. त्यामुळे शाळेत वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण झालेली आहे. सदरील शाळा पी.एम.श्री.मध्ये समाविष्ट आहे.सदरील शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेले प्रत्येक वर्षातील सात ते आठ विद्यार्थी MBBS ला लागतात. शाळेच्या विविध शैक्षणिक उपक्रमामुळे गुणवत्ता चांगली आहे. RBI अंतर्गत आर्थीक साक्षरतेवर घेतलेल्या देशपातळीवरील स्पर्धेत द्वितीय क्रमांक विद्यार्थ्यांनी पटकावला आहे. मुख्याध्यापक, शिक्षक व शाळेने 15 लक्ष रुपयाचा लोकसहभाग शाळेस दिलेला आहे. 8 गुंठे क्षेत्रात परसबाग आहे. विविध स्पर्धा परिक्षेत विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकतात.

ब- टीम (दि.03.01.2026)

1) श्री.पवार संदीप भगवान,पीएमश्री,जि.प.प्राथमिक शाळा जरेवाडी,ता.पाटोदा,जि.बीड



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) स्कॉलरशिप, NMMS,नवोदय आदी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी 2) विद्यार्थ्यांचा शालेय वेळ वाया जाऊ नये यासाठी काटेकोर व प्रभावी नियोजन 3) शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्येक तास सदुपयोग होईल यासाठी पूर्वनियोजित उपक्रमांची आखणी 4) अध्यापन, सराव व उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना पर्याप्त प्रॅक्टिससाठी वेळ उपलब्ध परिणामतः विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व सर्वांगीण विकास सातत्याने वाढत आहे 5) प्रशासन योग्य पद्धतीने कार्यरत असल्याने अभ्यासक्रम व होमवर्क वेळेत पूर्ण 6)शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या संयुक्त नियोजनातून शाळा व्यवस्थापन अधिक प्रभावी 7) संघटित व सक्षम व्यवस्थापनामुळे शालेय कामकाज सुलभ व परिणामकारक 8) इयत्ता 1 ते 8 साठी पूर्वनियोजित व समन्वित अध्यापन व्यवस्था 9) संघटित व सक्षम व्यवस्थापनामुळे शालेय कामकाज सुलभ व परिणामकारक तसेच सर्व शिक्षकांकडून 100% नियोजनानुसार अध्यापन व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणीसातत्याने सुरु आहे 10) विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक व प्रशासन यांचा सक्रिय व

सामूहिक सहभाग 11) पाणी आडवा पाणी जिरवा अंतर्गत श्रमदानातून जरेवाडी शाळेने बांधलेला वनराई बंधारा


नाविण्यपूर्ण उपक्रम - 1) शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन 2)जनरल नॉलेज, सामान्य ज्ञान स्पर्धा, क्रीडा स्पर्धा व विविध स्पर्धात्मक उपक्रम 3)नवोदय, स्कॉलरशिप, मंथन इत्यादी स्पर्धा परीक्षांची इयत्ता 1 ते 8 साठी विशेष व नियमित तयारी 4) प्रत्येक विद्यार्थी प्रगत व साक्षर व्हावा (FLN) या उद्देशाने मूल्यमापन, सराव परीक्षा व मार्गदर्शन. 5)सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहल व क्षेत्रभेटींच्या माध्यमातून सर्वांगीण विकासावर भर. 6)तंत्रज्ञानाचा वापर डिजिटल हजेरी, ऑनलाइन शैक्षणिक साधने, ई-नोंदी अहवाल, स्मार्ट क्लासरूम. 7)ठळक उपक्रम इच वन टीच वन शाळेमध्ये राबवला जातो.8) शालेय स्तरावर नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन. 9) जरेवाडी शाळेतील शालेय परिपाठ विद्यार्थ्यांच्या श्रवण, वाचन व व्यक्तिमत्त्व विकासासाठी उत्कृष्ट उपक्रम.10) जनरल नॉलेज, सामान्य ज्ञान स्पर्धा, क्रीडा स्पर्धा व विविध स्पर्धात्मक उपक्रम.11) प्रत्येक विद्यार्थी प्रगत व साक्षर व्हावा (FLN) या उद्देशाने मूल्यमापन, सराव परीक्षा व मार्गदर्शन. 12) सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहल व क्षेत्रभेटींच्या माध्यमातून सर्वांगीण विकासावर भर. 13) तंत्रज्ञानाचा वापर -डिजिटल हजेरी, ऑनलाइन शैक्षणिक साधने, ई-नोंदी अहवाल, स्मार्ट 14) ठळक उपक्रम : इच वन टीच वन शाळेमध्ये राबवला जातो

प्रभावी व्यवस्थापनाच्या माध्यमातून फलनिष्पत्ती :- 1)उत्तम शालेय प्रशासनामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वृद्धिगत झाला. 2)पटसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत गेली. (२४ वरून ७५६ पर्यंत वाढ). 3)शालेय व सहशालेय उपक्रमात पालकांचाही सहभाग प्राप्त झाला. 4)आनंददायी व कृतीयुक्त शिक्षणामुळे मुलांच्या उपस्थितीमध्ये लक्षणीय वाढ झाली. (दैनंदिन उपस्थिती ९५% ते १००%). 5)सन २०१५ ते २०२५ या दहा वर्षांमध्ये इयत्ता ५ वी नवोदय, इयत्ता ५ वी व ८ वी स्कॉलरशिप परीक्षा, तसेच शासकीय NMMS परीक्षेत

अनेक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत (Merit List) स्थान मिळविले.6) शिक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या इस्त्रो/नासा परीक्षेत यश मिळवून विद्यार्थ्यांना इस्त्रो नासाला जाण्याची संधी मिळाली. (२०२३/२४). 7) शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड मार्फत निपुण महाराष्ट्र अंतर्गत शाळेच्या नावाने मिशन जरेवाडी उपक्रम संपूर्ण जिल्ह्यातील शाळेमध्ये राबविण्यात आला. (२०२४/२५).

शाळेस प्राप्त पुरस्कार:- 1) ग्राम अभियान कार्यक्रम तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक व प्रमाणपत्र. (१९९६/९७) 2)साने गुरुजी स्वच्छ सुंदर प्राथमिक शाळा स्पर्धा तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार दहा हजार रुपये व प्रमाणपत्र (२००६/०७) 3)महाराष्ट्र शासन सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम वरिष्ठ प्राथमिक पाचवी ते सातवी साठी जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र (२००८/०९) 4)महाराष्ट्र शासन सार्वजनिक शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम २००८-२००९ 4) साने गुरुजी स्वच्छ सुंदर प्राथमिक शाळा स्पर्धा तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार दहा हजार रुपये व प्रमाणपत्र (२००६/०७) 5) बीड जिल्ह्यातील पहिली आयएसओ मानांकन प्राप्त शाळा प्रमाणपत्र (२०१४/१५) 6)मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक आणि विभाग स्तरावर तृतीय क्रमांकासह 11 लक्ष रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र (२०२३/२४).

2) श्री.रामदास सखाराम थिटे, श्री.छत्रपती संभाजीराजे माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय,जातेगाव



नाविण्यपूर्ण उपक्रम - 1. प्रश्नपेढी तयार करणे 2. आदर्श उत्तर पत्रिकांची पेढी तयार करणे 3. ओव्हरहेड प्रोजेक्टरसाठी पारदर्शिका विषयानुरूप तयार करणे 4. कृतीकारक अध्ययनाला प्रोत्साहन देणे 5. प्रज्ञावंत मुलांसाठी खास वर्ग घेणे 6. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग घेणे 7. रविवार अभ्यासिका चालविणे 8. सुट्टीतील अभ्यासिका चालविणे 9. गृहपाठ संयोजन तक्ते निर्मिती व वापर 10. अध्यापन साहित्य निर्मिती व वापर 11. व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे 12. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुविधा 13. समुपदेशन करणे.

विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे उपक्रम :- 1. हस्तलिखिते 2. वर्ग दर्पण 3. ग्रंथ चर्चा 4. प्रकट वाचन 5. परिसर सर्वेक्षण 6. फक्त निर्मिती व प्रदर्शन 7. सूचनाफलक द्वारा माहिती लेख इत्यादी वितरण 8. वाढदिवस शुभेच्छा पत्रे 9. अभ्यासपूर्वक परीक्षांचे संयोजन 10. प्राविण्य प्राप्त मुलांचे कौतुक करणे 11. पुस्तक पेढी 12. शैक्षणिक सहल 13. नाट्य स्पर्धा 14. क्रीडा स्पर्धा 15. वर्ग सजावट 16. शालेय स्वच्छता 17. व्यक्तिमत्व विकास शिबिरे

शालेय उपक्रम:-1)गणितीय क्रियांशी संबंधित कौशल्ये 2)पोस्टर प्रदर्शन 3)डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण 4) तज्ज्ञाचे करिअर मार्गदर्शन 5)वृक्षारोपण 6) चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

3) श्रीमती.प्राजक्ता प्रकाश कदम,कृष्णाजी चिंतामण आगाशे प्राथमिक विद्यामंदिर, रत्नागिरी



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1) शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन 2) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 3)प्रवेशोत्सव 4) पालक सभा 5) तंज्ज्ञाचे करिअर मार्गदर्शन 6)वृक्षारोपण 7) चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

4) श्रीमती. वैशाली नितीन ठोके,म.न.पा शाळा क्र.86(मुली),पाथर्डी गाव,नाशिक



शाळेतील उल्लेखनीय बाबी –

1) स्थानिक सहभागातून सामाजिक कार्य -GSK, CYDA, SAVE THE CHILDREN सामजिक संस्थांचा सहभाग 2) शैक्षणिक नियोजन-वयानुसार योग्य व नियोजित अभ्यासक्रम वाचन, लेखन, गणन व जीवन कौशल्यावर भर,परीक्षेच्या ताणाऐवजी सातत्यपूर्ण मूल्यमापन3) शिक्षक व्यवस्थापन-नियमित प्रशिक्षण व मार्गदर्शन,न्याय्य कामवाटप व कार्यमूल्यमापन 4) विद्यार्थी काळजी व शिस्त-सकारात्मक शिस्त,भावनिक, सामाजिक व नैतिक विकासाकडे लक्ष 5) भौतिक सुविधा व साधने-सुरक्षित वर्गखोल्या, स्वच्छ स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि मैदाने, पुरेशी अध्ययन अध्यापन साधने व तंत्रज्ञान

6) आरोग्य, सुरक्षितता व स्वच्छता - नियमित आरोग्य तपासणी व प्राथमिक उपचार सुविधा, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षिततेचा सराव, स्वच्छता व आरोग्य शिक्षण 7) पालक व समुदाय सहभाग - पालकांशी नियमित संवाद,पालक - शिक्षक सभा व अभिप्राय व्यवस्था 8) सहशालेय उपक्रम - कला, क्रीडा, संगित व सांस्कृतिक उपक्रम,सर्जनशीलता व संघभावना वाढविण्याच्या संधी, अभ्यास व उपक्रम यांचा समतोल 9) शिष्यवृत्ती परीक्षा यश व नियोजन - शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा सहभाग,जादा तासिका नियोजन, तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन सत्र आयोजन 10) कृती शिक्षणातून गुणवत्तेची कास -एक चित्र अनेक शाळांचे काम करते,कृतीतून अध्यापन

11) कोविड काळात ONLINE शिक्षण-ONLINE शिक्षण आपल्या दारी, ONLINE पालक - शिक्षक संवाद 12) विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना - सांस्कृतिक कार्यक्रम/लेझीम पथक, मैदानी खेळ-सांघिक व वैयक्तिक,स्पेलिंग बी उपक्रम,दप्तरमुक्त शनिवार,सायंकाळी 7 ते 9 T.V. बंद

शाळेस प्राप्त पुरस्कार:- 1) मनपा शाळा क्र. 73 येथे कार्यरत असतांना महानगरपालिका क्षेत्रातील प्रथम ISO शाळा. 2) मनपा शाळा क्र.86 ला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अ व ब वर्ग महानगरपालिका विभागात द्वितीय क्रमाक. 3)महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सांघिक विजेतेपद

5)**श्री.रामभरोसे उइके,शा.प्रा.शाळा,मोरतलाई,विकासखण्ड,खिरकिया,जि.हरदा, मध्यप्रदेश**



शाला स्तर पर शैक्षणिक गतिविधियाँ :- 1) शाला में प्रतिदिन प्रार्थना सभा के अंतर्गत विद्यार्थियों के द्वारा सुविचार एवं कहानियाँ सुनाई जाती है। 2)शाला में शिक्षको द्वारा कक्षा पहली से पांचवी तक दक्षता लाने का प्रयास किया जाता है। 3) योग, प्राणायाम एवं खेल गतिविधियों कराई जाती है। 4) शाला में स्मार्ट टीवी के माध्यम से विद्यार्थियों को शिक्षण गतिविधि कराई जाती है। 5)पालको के संपर्क कर उन्हे प्रोत्साहित किया जाता है। 6) पेड मॉ के नाम, जैसे अभियानो में शामिल करना एवं प्रकृति व पेड़-पौधो से जागरुक करना वृक्षारोपण एक पौधा एक संकल्प 7) शाला में स्टेशनरी का शिक्षको के मार्गदर्शन में विद्यार्थियों द्वारा संचालन किया जाता है, जिससे की विद्यार्थियों को आवश्यक शिक्षण सामग्री प्राप्त होती रहे. 8) त्योहारो का आयोजन बच्चो पालको के उत्साह हेतू शिक्षको द्वारा त्योहारो का आयोजन कर सभी का आत्मविश्वास बढाये जाने हेतु त्योहार मनायें जाते हैं जैसे, जन्मदिवस, धार्मिक त्योहार, राष्ट्रीय त्योहार.9) अधिकारियो द्वारा विद्यालय का भ्रमण अधिकारीयों के द्वारा विद्यालय में बच्चो की शिक्षा की गुणवत्ता शिक्षको के कार्य एवं विद्यालय की स्थिति के बारे में जॉच की जाती है, और अच्छे कार्य की सराहना विद्यालय की प्रगति के लिए सुझाव दिये जाते है।10) **कक्षाओं का संचालन:**-बच्चो को विद्यालय में घर के जैसा माहोल प्रदान करके आसपास के परिवेश से जोडते हुए टीएलएम व समृध्द वातावरण प्रदान कर शिक्षण कार्य किया जाता है जिससे बच्चे सरल तरीके से अपने ज्ञान में वृध्दि कर पाते है। मैं एक नवनियुक्त प्राथमिक शिक्षक हूँ, शुरू में मुझे पढ़ाने मे बहुत कठिनाईयों का अनुभव हुआ क्योंकि आदिवासी क्षेत्र में भाषा की समस्या रहती है। बच्चे आदिवासी भाषा में

बात करते है, जब मैंने बच्चो के साथ बहुभाषीय कक्षाओं का संचालन किया बच्चे मेरी भाषा को आसानी से समझने लगे तुा मुझे भी प्रसन्नता का अनुभव हुआ जब बच्चो से नीचे फर्श पर अल्फाबेट एवं हिन्दी के वर्ण, गिनती इत्यादी लिखकर गतिविधियों कराई जिससे की आसानी से समझने लगे इसी तरह अनेक प्रकार की रोचक एवं आकर्षक चार्ट पोस्टर आदि से विद्यालय का आकर्षक वातावरण निर्मित करवाया।

मिशन अंकुर व एफएलएन द्वारा विद्यालय मे कार्य:- राज्य सरकार के द्वारा चलाए जा रहे मिशन अंकुर व एफएलएन के अंतर्गत कक्षाओं कर संचालन व बच्चो की बुनियादी साक्षरता व संख्याज्ञान को मजबूत करने के लिए गतिविधियों के माध्यम से प्रयास किये जाते है, जिससे बच्चे खेल-खेल में व बाल गीतो के माध्यम से रोचक तरीके से ज्ञान अर्जित करते है।

विद्यालय का गौरव :-विद्यालय में बच्चो द्वारा राज्य स्तरीय ओलंपियाड परीक्षा में चयन और शाला ग्राम पंचायत स्तर पर होने वाले विभिन्न प्रकार की प्रतियोगिताओं में भाग लेकर उत्कृष्ट प्रदर्शन कर पुरष्कार प्राप्त किया जाता है, जिला स्तर पर डाईट द्वारा प्रकाशित पुस्तक क्षितिजा में भी शाला का नाम और शिक्षक रामभरोस उईके का नाम अच्छे कार्य के लिए प्रकाशित किया गया।

विद्यालय की विशेष उपलब्धि:- हमारी शाला की विशेष उपलब्धि यह है कि, शाला में पहले नामांकन बहुत ही कम हो रहे थे नामांकन की संख्या 3,4,5 ही रहती थी किन्तु हम दोनो शिक्षको के द्वारा कक्षा पहली में नामांकन बढ़ाने के लिए शिक्षा की गुणवत्ता में वृध्दि की गई इससे गाँव व अन्य गाँव के लोगो का विश्वास जीतने में सफल हो पाये जनजातिय समुदाय से निरंतर जुड़े रहे उन्हे प्रोत्साहित करते रहे तथा स्कूल की विशेषताए और शाला से मिलने वाली निःशुल्क शिक्षा, मध्यान भोजन मन्यू अनुसार निःशुल्क गणवेश निःशुल्क पुस्तके तथा अधिकारियों का प्रोत्साहन आदि प्रयोग कर इस वर्ष नामांकन की संख्या 8 लड़किया हो साथ ही विगत वर्षों से अधिक है आस-पड़ोस और ग्राम से जुड़े लोगो के रिश्तेदारों ने भी हमारी शाला में दाखिला करवाया क्योकि गांव की जनसंख्या कम होने के कारण यह हमारी सबसे बड़ी उपलब्धि है।

1)गुणवत्ता पूर्ण शिक्षा 2) समुदाय से जुडाय 3)व्यक्तिगत सम्पर्क 4) विभिन्न योजनाओं की जानकारी 5) सीखने के माहौल को बेहतर बनाने के लिए इंटरेक्टिव 6)कक्षाएँ और डिजीटल उपकरणो का उपयोग किया गया। 7)कला, खेल और कौशल निर्माण जैसी सभी गतिविधियों को शामिल किया गया

6) श्री. नामदेव तात्याबा घायतडक,जि.प.प्राथमिक शाळा,वरुर बुद्रुक,ता.वगाव, जि.अहिल्यानगर



शाळेतील उल्लेखनीय बाबी - 1)अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 2) वाचन चळवळ उपक्रम 3)स्वच्छ व शुध्द पिण्याचे पाणी 4) 24 तास विज 5) वाचन विकास 6)अध्ययन क्षमता वाढीसाठी पालक सहभाग 7) लेखन साहित्य वाटप 8) शाळेत नाविण्यपूर्ण संस्कृति निर्माण करणे 9) बालस्नेही विज्ञान क्लब 10)बाल आनंद मेळावा 11) शाळा प्रवेश उत्सव 12)आपत्कालिन परिस्थितीत ग्रामस्थांची मदत

7) **श्री.किशोर मारोतराव चवरे, उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालय व व्यवसाय अभ्यासक्रम, हिंगणघाट, जि.वर्धा**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) रथसप्तमी विशेष सामुहिक सुर्यनमस्कार 2) एक क्षण स्वच्छतेचा उपक्रम 3) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 4) कृतीयुक्त शिक्षण 5) स्काउट गाईड व एन.सी.सी 6) प्रवेशोत्सव 7)अध्ययन क्षमता सुधारण्यासाठी अध्यापनशास्त्रीय नेतृत्व 8) शैक्षणिक संपादणूक पातळी दत्तक सुधार प्रकल्प वर्ग 5 ते 9. 9)अपूर्ण विज्ञान मेळावा 10) इ.10 वी व 12 वी जादा वर्ग 11) शाळेत नाविण्यपूर्ण संस्कृति निर्माण करणे 12) नवोपक्रमात शिक्षकांचा सहभाग 13)विविध खेळामध्ये अनेक विद्यार्थी विभाग,राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी 14) शाळा आणि समुदाय आंतरसंबंध सक्षमीकरण 15) अन्य सहशालेय उपक्रमात सहभाग 16)सी.एस.आर.फंड मधून विविध लाभ 17) पालक कार्यशाळा सप्तशक्ती संमेलन व समाज उपयोगी उपक्रम 18) उत्तम शालेय प्रशासन 19)सर्वांसाठी सुरक्षित वातावरण शालेय इमारतीला पूर्ण शालेय भिंत 20)मुलींसाठी विविध उपक्रम 21) सामाजिक समरसतेचे उपक्रम मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा सहभाग 22) वेगवेगळे स्वच्छतागृह सॅनेटरी नॅपकीन मशीन बर्निंग मशिन

8) **श्रीमती.लता रमेश पाटील,पु.भा.भावे प्राथमिक विद्यालय,कल्याण डोंबिवली मनपा शाळा क्र.66, डोंबिवली (प),जि.ठाणे**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) दि.19.07.2021 रोजी पावसामुळे शाळा पडली असता शिक्षण प्रेमी यांनी दोन लाख रुपये खर्च करुन एका रात्रीत शाळा उभारली 2) सर्वेक्षण करुन 100 टक्के पटनोंदणी केली 3) रविवारी शाळा सुरु ठेवून नवनवीन उपक्रम सुरु केले जसे की कागदाची फुले बनविणे,टोपी तयार करणे,उपचारात्मक वर्ग,चित्रकला 4) साफसफाई करुन जंतुनाशक औषध फवारणी करण्यात आली.5) वर्षातून दोन वेळेस आरोग्य तपासणी 6) व्यायाम व योगासने करुन घेण्यात येतात 7) भारतीय सैनिकांना ग्रिटींग तयार करुन दिवाळी भेट 8) शाळेत स्मार्ट टिव्ही नसल्याने स्वतःचा लॅपटॉप,टॅब, मोबाईल यांचा वापर डिजिटल शिक्षणासाठी करण्यात येतो. 9) नाविन्यपूर्ण अध्यापन पध्दती,बाहुली नाट्य,पर्यावरण शिक्षण,रंगोत्सव, प्रकट वाचन,हावभावयुक्त समजपूर्वक वाचन10) मूल्यशिक्षण अंतर्गत विविध सण व उत्सव साजरे करण्यात येतात विशेषता दिव्यांग विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात येते. 11)समावेशित शिक्षण - 4 विद्यार्थी दिव्यांग असून सदर विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत सामावून घेवून विशेष लक्ष दिले जाते.12)कृतियुक्त पद्ध्ती-विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीने शिकण्याची संधी,स्वयंअध्ययनावर भर,विद्यार्थी प्रगतीवर लक्ष 13) शाळाबाह्य दाखल विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष् देण्यात येते 14) पालक सहभाग - एक पेड मा के नाम, खाद्य मेळावा, माता पालक संघ 15) समाज सहभाग -शाळेच्या गरजा भागविणे,शिक्षण प्रेमी यांची मदत 16) माजी विद्यार्थी संघ 17) विद्यार्थी सुरक्षा -गुड टच बॅड टच,अग्नि शमन ट्रेनिंग,पोलीसांचे मार्गदर्शन,प्रशिक्षण 18) शाळा उन्नतीसाठी लोक सहभाग व माजी विद्यार्थी यांच्यामार्फत एकूण चार लाख पासष्ट हजार एवढा निधी प्राप्त झाला.

नवोपक्रम

1) बाहुलीनाट्याचे प्रयोग 2)पाठ सादरीकरण 3)छाया बाहुली 4)मुकाभिनय 5)कार्यशाळा 6)प्रदर्शन 7)पर्यावरणाचा शाश्वत विकास -खारफूटी वनस्पतीचे महत्व व उपयोग 8)पर्यावरण शिक्षण


9) **श्री.ननावरे नंदकुमार रामराव, श्रीपतराव भोसले माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव,ता.जि.धाराशिव**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) विद्यार्थी केंद्रीत दृष्टिकोन 2)शिकण्याच्या अडचणी ओळखणे 3) वैयक्तिक मार्गदर्शन 4) अध्ययन परिणाम सुधारणा 5)शिक्षकांना Student-Centered Teaching साठी प्रोत्साहन देणे 6) Activity-based learning, Project-based learning वापरणे 7) फक्त पाठांतर न करता समज-आधारित शिक्षणावर भर 8) Activity-based व प्रयोगाधारित शिक्षणावर भर 9) शिक्षकांना विद्यार्थी गटानुसार अध्यापन करण्याचे मार्गदर्शन 10)विद्यार्थ्यांचा गळती दर शून्यावर आला

10) **श्री.दिनेश जयचंद म्हाडगुत,शिवाजी विद्यालय हिरलोक,ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1. शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन
2. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर
3. प्रवेशोत्सव
4. पालक सभा
5. तज्ज्ञाचे करिअर मार्गदर्शन
6. वृक्षरोपण
7. चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

11) **श्री.सतीश मधुकरराव परसेवार,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांगरी,ता.अर्धापूर, जि.नाशिक**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) गुणवत्तापूर्ण शिक्षण 2) स्काउट गाईडच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी 3) मतदान जनजागृती 4) वचनविधी 5) बिन भांड्याचा स्वयंपाक 6) तीन स्काउटची राज्यस्तरावर निवड 7) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 8) अध्ययन अध्यापन सुधारण्यासाठी अध्यापनशास्त्रीय नेतृत्व 9) शाळा आणि समुदाय आंतरसंबंध सक्षमीकरण 10) उत्तम शालेय प्रशासन 11) समता विविधता आणि समावेशन यासाठी उत्तम शालेय नेतृत्व

12) **श्री.विलास शामराव पिंगळे,कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती संचलित टेंबलाईवाडी विद्यालय क्र.33,टेंबलाईवाडी,जि.कोल्हापूर**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

१) विद्यार्थ्यांची इस्त्रो अभ्यासदौऱ्यासाठी निवड

2) पटसंख्यावाढीचा चढता आलेख

3) शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व मिरवणूक

4) आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यश

5) विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धेत यश संपादन केले


6) अत्याधूनिक संगणक लॅब

7) सुसज्ज ग्रंथालय

8) नाविण्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा

9) मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तर द्वितीय क्रमांक

13) **श्री.संतोष मेघवाले,जि.प.प्रा.शाळा,झरी धानगडपाडा क्र.2,ता.तलासरी,जि.पालघर**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) पालक सभा 2) विद्यार्थ्यांसाठी खेळ आणि रेखाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आल्या 3) अभ्यंकर समितीने शाळेस भेट देवून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन दिले 4) शाळेच्या परिसरात रोपे लावून पहिल्या इयत्तेत प्रवेक्षित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले 5) गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणि आर्थिक मदत मिळवली.6) गावात प्रौढ शिक्षण वर्ग सुरु करण्यात आले या वर्गाद्वारे प्रौढांना मूलभूत वाचन आणि लेखन कौशल्ये शिकवली गेली आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला पाठिंबा देण्याच्या महत्वाबाबत मार्गदर्शन केले गेले.7) वस्तीतील विद्यार्थी आणि पालकांसाठी समुपदेशन सत्रे आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले तसेच तज्ज्ञांना बालावून शिक्षणाचे महत्व,नियमित शाळेत हजेरी, जबाबदार पालकत्व आणि सामाजिक विकास याबाबत मार्गदर्शन करण्यात आले 8)मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुकास्तर प्रथम क्रमांक प्राप्त झाला तसेच सन 2024-25 मध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाला 9)शाळेत आवारात अनेक प्रकारच्या भाज्या पिकवल्या जातात शाळेच्या या बागेतून पोष्टिक अन्न उत्पादनावर विशेष भर देण्यात येतो,जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजच्या जेवणात पुरेशी पोषक द्रव्ये मिळतील.

14) **श्री.मरड नरेश देवालया, श्री जयेश्वर विद्या मंदिर,पालघर**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन

2) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर

3) प्रवेशोत्सव

4) पालक सभा

5) तंज्ज्ञाचे करिअर मार्गदर्शन

6) वृक्षरोपण

7) चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

15) श्री.जगदीश बापू इंदलकर,लायन एम.पी.भूता सायन सार्वजनिक शाळा,सायन,मुंबई



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) विद्यार्थ्यांचं यश हे अचानक घडलेलं नाही, ते learning culture तयार झाल्यामुळे घडलं आहे.2) विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी इ-लायब्ररी सुरु केली 3) वाचन मैत्री उपक्रम यात वाचनाचा आनंद,पात्र मुलाखत, सर्जनशील प्रतिसाद कार्य, थीम आधारित पुस्तक कोपरे, नाविन्यपूर्ण व आकर्षक वाचन टेबल, पाठद्वयक्रम वाचन 4) stem and robotics labs एक्सपोजरपासून अनुभवात्मक शिक्षणापर्यंत यात रोबोटिक्स्, कोडिंग,डिझाइन थिंकिंग,सहकार्य,भविष्यातील कौशल्यांसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे 5) पंचकोष फ्रेमवर्क-शरीर,मन, बुध्दी,प्राण आणि आनंद यांचे पोषण 6) खेळ, फिटनेस आणि शारीरिक विकास स्टॅमिना, शिस्त आणि टीमवर्क विकसित करणे 7) कला,संस्कृती आणि सर्जनशीलता, नृत्य स्वराधना शास्त्रीय संगीत प्रकल्प इ.1 ली ते 8 वी, परंपरा, अभिव्यक्ती आणि कल्पनाशक्ती यांचा शोध.8) उमंग एक सिग्नेचर विचार-शाळा उपक्रम, पुस्तकांपलीकडे गुणांपलीकडे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, शिक्षणाचा मजेदार मेळावा, वास्तविक जीवनातील अनुभवात्मक शिक्षण, पंचकोश संरेखित समग्र विकास, निर्णय घेणे, सर्जनशीलता

वाढविणे आणि चिंतन करणे यातून शिकणे 9) शाळांसाठी पुनरावृत्ती योग्य मॉडेल म्हणून उमंग कार्यक्रम हे सिध्द करते की विद्यमान शाळा व्यवस्थेत अर्थपूर्ण बदल शक्य आहे.10) एक सुरक्षित,संवेदनशील आणि समर्थन देणारे शाळेचे वातावरण 11) लोकसहभाग,सी.एस.आर फंडातून शाळेसाठी तीन कोटी पंधरा लाख एवढा मोठा निधी उभा केला 12) विद्यार्थ्यांवर झालेला परिणाम- आत्मविश्वास आणि संवाद, निर्णय घेणे आणि नेतृत्व, जबाबदारी आणि सहानुभूती, आनंददायी,अर्थपूर्ण शिक्षण, परीक्षांपलीकडे जीवन कौशल्ये 13) शिक्षकांत झालेले बदल- व्यावसायिक वाढ,मालकी आणि पुढाकार, सहकार्य,नेतृत्व भूमिका चिंतनशील सराव 14) विविध सरकारी शिष्यवृत्ती कार्यक्रमांमध्ये लक्षणीय यश मिळाले 15)सातत्यपूर्ण शैक्षणिक प्रगती दिसून आली 16)विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यासाठी डिजिटल साक्षरता सत्रे घेण्यात आली 17) संगणक प्रयोगशाळा, GFC लॅब्स, रोबोटिक्स आणि कोडिंग अभ्यासक्रम यांसारख्या प्रगत सुविधा सुरु केल्या, ज्यामुळे तंत्रज्ञानातील उत्कृष्टता वाढली. 18) एन.ई.पी 2020 नुसार कौशल्य आधारित आणि मुल्यकेंद्रित शिक्षणाच्या संरेखित् पध्दती लागू केल्या 19) 21 व्या शतकातील शिक्षण ज्यात रणनीतींवर भर दिला 20) सर्व उपक्रमांसाठी उद्दिष्ट, उद्देश, प्रक्रिया, परिणाम आणि प्रभाव स्पष्टपणे नमूद केले जातात. 21) शिकविण्याच्या प्रभावीपणाचे आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करण्यासाठी नियमित ऑडिट्स केले जातात.

शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) एन.ई.पी 2020, एन.सी.एफ व शालेय गुणवत्तावृध्दी यांची प्रत्यक्ष अंमल समजून घेवून नाविन्यपूर्ण उपक्रम,डिजिटल नेतृत्व समूदाय समभाग यांचा प्रसार करण्यात आला. 2) स्काउट आणि गाइड चळवळ 3) सी टाईप विद्यार्थी बैठक 4) शालेय रजिस्टर जतन आणि संवर्धन 5) PAT चाचणीत प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र नोंद ठेवून गुणांपेक्षा कौशल्य स्तर लक्षात घेतला जातो निकालानुसार शिक्षकांचा शिकवणी सुधार कृती आराखडा तयार केला आहे

17) **श्री. राहुल मोतीसींग ब्राम्हण,जि.प.प्रा.मुलांची शाळा,तळेगाव ठाकूर,तिवसा, जि.अमरावती**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) संचयी नोंदपत्रक

2) मतदान जनजागृती

3) आय.सी.टी लॅब

4) सुंदर शालेय परिसर

5) क्षेत्रभेट

6) पालक सभा

7) नियमित व गुणवत्तापूर्ण अध्यापन

8) शालेय स्तरावर नियोजनबध्द व सातत्यपूर्ण विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन

18) **श्री.राऊत प्रमोद रमेश,श्री यमाई श्रीनिवास विद्यालय राजा भगवंतराव ज्युनिअर कॉलेज,औंध,सातारा**



शाळेतील उल्लेखनीय बाबी

1) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पाठ्यपुस्तकांच्या पलीकडील शिक्षण 2) भविष्यवेधी शिक्षणः तंत्रज्ञान आणि नवोपक्रम नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगतता 3) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 4) शाळेत नाविन्यपूर्ण संस्कृती निर्माण करणे 5) कला, क्रीडा आणि साहित्यातून प्रगती 6) सर्वसमावेशक आणि जोडलेला समुदाय 7) शाळेत सद्यस्थितीत १४७२ पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असून, ग्रंथालय, इंटरनेट आणि संगणक यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. 8) सन १८९८ पासून एका शैक्षणिक पर्वाची सुरवात झालेली असून तेव्हा पासून शाळेत रोज सुर्यनमस्कार घेण्यात येतो.

(सर्वांगीण विकासाचा वारसाः सूर्यनमस्कार) 9) शिक्षणात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांसाठी FlipHTMLS, YouTube चॅनल, आणि Google Classroom सारख्या डिजिटल साथनांचा प्रभावी वापर 10) १२५ पेक्षा जास्त खेळाडू राज्यस्तरावर यशस्वी आंतरराष्ट्रीय आणि राज्य विजेते घडवले 11) पर्यावरण संवर्धनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम 12) शीलः सामाजिक आणि सामुदायिक उपक्रम 13)'मियावाकी जंगल' संकल्पनेतून वृक्षारोपण आणि प्लास्टिकमुक्ततेसाठी 'इको ब्रिक्स' संकलन अभियान.14) विद्यार्थी कल्याणासाठी सामाजिक बांधिलकी तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी 'सायकल बैंक' आणि मुलीसाठी सॅनिटरी पॅड मशीनची उपलब्धता

15) ज्ञानाची परंपरा आणि आजचे यश 50 विद्यार्थी - NMMS परीक्षा यशस्वी, 10 विद्यार्थी - INSPIRE Award विजेते, 27 विद्यार्थी - शिष्यवृत्तीधारक (२ राज्यस्तरीय, २५ जिल्हास्तरीय), 10 विद्यार्थी - सैनिक व नवोदय विद्यालय प्रवेश, 'माझी शाळा - मुख्यमंत्री शाळा' योजनेत 'तालुक्यात दुसरे' स्थान.

16) यशाचे सूत्रः पंचसूत्रीवर आधारित शिक्षणऔंध शिक्षण मंडळाच्या यशाचे गमक एकात्मिक दृष्टिकोनात आहे. ही पंचसूत्री पिढ्यानपिढ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया ठरली आहे. 17)शिक्षण गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधारित ज्ञान,कौशल्य विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणारे व्यावसायिक प्रशिक्षण,कला आणि वाङ्मय: साहित्य, चित्रकला, नाटक यांसारख्या कलांना प्रोत्साहन, क्रीडाः शारीरिक विकासासाठी सूर्यनमस्कार ते विविध क्रीडा स्पर्धा, संस्कारः सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय मूल्यांची जोपासना.

19) **स्पृहा इंदू,चेंबूर एज्युकेशन सोसायटी पूर्व प्राथमिक शाळा,चेंबूर,मुंबई**



शाळेतील उल्लेखनीय बाबी -

1) विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सहभागी वातावरण प्रत्येक मुलाला ऐकले जाते, स्वीकारले जाते असे वातावरण शाळेत निर्माण करण्यात आले

2) शिक्षक सक्षमीकरण व संवेदनशीलता शिक्षकांना समता व समावेशन विषयक प्रशिक्षण, प्रोत्साहन व संधी दिली जाते.

3) वर्गात विविधता ही ताकद म्हणून वापरली जाते. अनुभव संपन्नता वाढवणारे सण, खेळ यांत स्थानिक व विविध संस्कृतींचा समावेश केला जातो.

4) पालक व समुदायाचा सहभाग

5) स्थानिक संसाधनांचा अधिकतम वापर केला जातो.

6) भारतीय खेळ, स्थानिक भाषा, जीवनकौशल्य आधारित उपक्रम, डिजिटल साधनांचा समावेशक वापर केला जातो.

7) अभ्यासक्रम व उपक्रमांत समावेशन खेळ, कला, गाणी, कथा यांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जातो.

20) **Hemant M. Kamat, S.S.Angle Higher Secondary School, Mashem Canacona, Goa**



1) Teachers Comprehensive Logbooks DAILY LESSON LOG 2) Teacher Aid-Audio Visual 3) Palak Melava,Class Meeting with resolutions 4) Signature by parents every Saturday on all the note books 5) NSS camp projects 6) Awareness through Street plays 7) Palak Melava 8)Ex Student- Police Recruitment Training, Teacher Eligibility Training, Staff Selection Commission Training 8) Police Recruitment Training 9)Mentoring 10) Citizen Duty Debate 11) Exploring levels of Government 12)Science Quiz 13) Science Project 14) Agriculture Activities 15) Bhavgeet Singing Competition 16) Kala Academy Competition 17) Poster Competition 18)Patriotic Singing competition 19)Loko**ts**av 2024 20)Marathi Study Tour 21) Economics Study Tour 22) BIT BUZZ Event 23) YRC Activities Stress Management Workshop 24) National Service Scheme 25) Study Tour

21) Mrs. Ujwala Potekar, Govt High School, Kundai, Ponda

1) Sensitisation on Waste Management by students of class IX to class VIII 2) Critical thinking, problem solving, collaboration and team work 3) Digital Literacy 4) Counsellor talk on Social & Emotional Skills 5) school vision"to develop school leaders who transforms schools into inclusive, inspiring & value driven communities that empower every student and strengthen the nation" 6) Library 7) Group Task 8) Science Experiment 9) Cooking without fire for teachers and staff 10) Tithi Bhojan 11) Education Tour 12) Visit at Plant Nursery kundai on Vanmohostav day 13) INSPIRE AWARDS MANAK EXHIBITION & PROJECT COMPETITION 14) Morning Assembly 15) P.T.A MEETING 16) BAZAAR DAY- Community Involvement 17) Rally and Street play on SAVE DOLPHINS 18) SWACHHATA PAKHWADA 19)Unity in Diversity - Program conducted on Independence Day 20) Installation of Student's Council 21) SCHOOL ACHIEVED 100% RESULT FOR ACADEMIC YEAR 2024/25 IN GRADE 10 22) DRAWING COMPETITION,ESSAY & POETRY WRITING COMPETITION, ALL GOA GREETING CARD DESIGN COMPETITION,TALUKA LEVEL SCIENCE QUIZ COMPETITION, AARTI COMPETITION AT PONDA, PAINTING COMPETITION, 23) SCIENCE LAB 24) COMPUTER LAB

22) **Dr.Dipak Wayal ;MES'S NESS Wadia College of Commerce,Pune**

College Leadership and Student Learning



Challengews for Parents, Students, Government, Staff, Competitors

TWO AEDP program - BBARO, BVOC, Student learning along with syllabus, student as aco creator of knowledge,Associations and Clubs,Life skills through Apprenticeship and Internship,Social event

23) डॉ. लोकानंद नवखरे,नवजीवन विद्यालय जमनापूर जिल्हा भंडारा



शाळेच्या उल्लेखनीय बाबी.

नाविन्य,तंत्रज्ञान.गुणवत्तापूर्ण शिक्षण,प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नवोपक्रम ठिणगी पेटवणे,

नाविन्यपूर्ण संस्कृती म्हणजे काय,

नाविन्यपूर्ण संस्कृतीचे आधारस्तंभ,

नाविन्यपूर्ण उपक्रम,परिणाम व उपलब्धी,

शाळा - विचारांची कार्यशाळा +कौशल्यांची प्रयोगशाळा

24) **विलास टकले,राजुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कर्जत तालुका अंबड जि.जालना**



- शाळेत नाविन्यपूर्ण संस्कृती निर्माण करणे,
- वर्तमानपत्र वाचन उपक्रम,
- मी कसा घडलो,
- अभ्यासिका,
- उत्कृष्ट विद्यार्थी निवड उपक्रम,
- गणित विज्ञान मेळावे,
- पर्यावरण पूरक राष्ट्रीय कार्य,
- अध्ययन क्षमता सुधार कार्यक्रम,
- वर्गनिहाय मत पालक मेळावे,
- विविध पुरस्कार

25) **मंगल जगताप जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिलिटरी केंद्र नागठाणे ता.जि. सातारा**



- पायाभूत सुविधा,
- शाळेची मांडणी,
- वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा,
- अटल टिंकरिंग lab,आरोग्य सेवा आणि व्यवस्थापन,स्वच्छता विषयक उपक्रम,
- आपत्ती व्यवस्थापन साठी केलेय विशेष योजना
- पर्यावरण पूरक शाळा,इको क्लब, कचरा व पाणी पुनरवापर,सोलर व्यवस्था,
- मैदानी साहित्य,क्रीडांगण,ICT व्यवस्था परसबाग

26) एस.बी. तोरणमल,जि प आदर्श उच्च प्राथमिक शाळा जळगाव मेटे केंद्र आळंद ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर



- ISO मानांकित शाळा,विभागात प्रथम मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा,
- पटसंख्या वाढ,आदर्श सेंद्रिय परसबाग,कमी जागेत जैविक शेती,
- कोण होणार ज्ञान पती,वादविवाद स्पर्धा,वाचनालय,बचत बँक,
- जपानी भाषेची ओळख,स्व जीवी उपक्रमा अंतर्गत राज्यस्तरावर निवड,
- जिल्हा स्तरीय निपुण उत्सव प्रथम क्रमांक,विविध स्पर्धेत यश,
- तंत्रज्ञान वापर.लोकसहभाग,
- लिंग समभावासाठी शालेय नेतृत्व पालक क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

27) **राहुल गंधारे - जि प उच्च प्रा शा बोर्डा,जिल्हा चंद्रपूर**




- विद्यार्थी मंत्रिमंडळ,
- स्वच्छता हीच सेवा हे मुल्य रुजविले जाते,
- परसबाग,मतदार अभियान,
- विविध दैनंदिन वैज्ञानिक प्रयोगांचा अध्यापनात समावेश,
- क्रीडा व सांस्कृतिक सम्मेलने,
- पर्यावरण पूरक उपक्रम,
- विद्यार्थ्यांना भानी शिक्षणासाठी समुपदेशन.

२८) डॉ. सोनुने एस. एस सहयोगी प्रा. शिक्षणशास्त्र विद्याशाखा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

शालेय व्यवस्थापनाचे पैलू,प्रशासनाचे पैलू,आर्थिक व्यवस्थापन,शालेय रचना व भौतिक सुविधा,मानवी संबंधांचे व्यवस्थापन.शालेय कार्यालयीन व्यवस्थापन,संशोधन विषय ओळख,महत्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या,संशोधन उद्दिष्ट्ये,गृहीतके,कार्यपद्धती निष्कर्ष,शालेय मुख्याध्यापकांसाठी शिफारसी. वरीलप्रमाणे सर्व मुख्याध्यापक व संशोधक यांनी शालेय नेतृत्वा संदर्भात अनेक पैलूंवर सादरीकरण केले.

29) डॉ.पद्मा मोहनराव जाधव,संशोधक, प्राध्यापक,शासकीय अध्यापक महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर



- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय शिक्षण अधिक शाश्वत होण्यासाठी केलेली अपेक्षा,
- भारतीय ज्ञान परंपरेचे संस्कार करणारे शिक्षण
- नाविन्यपूर्ण शैक्षणिक संस्थांची निर्मिती,
- नेतृत्व गुणांच्या विकासावर भर देणाऱ्या कार्य नीतीचा विकास,
- शैक्षणिक संस्थांमध्ये कार्य संस्कृतीचा विकास,
- कार्य संस्कृतीची वैशिष्ट्ये,विद्यार्थी केंद्रित नाविन्यपूर्ण उपक्रमांवर भर,
- तंत्रज्ञान आधारित कौशल्य विकास,
- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी उपक्रम

30) **Dr.Zakiuddin Sohail, Assistant Professor, Marathwada College of Education, Chhatrapati Sambhajinagar**



1. Building a Culture of Innovation in School
2. Innovation concept -
3. Idea, Process, Development, Creativity, Growth, Vision, Inspiration
4. Building A Culture of Innovation in School - Track the impact, engage with
5. Problems, understand problems, incubate new concept and celebrate failure
6. Culture of Innovation in School -Building culture, creativity, experiments,
7. Problem solving
8. Practical examples of innovation
9. Innovative Educational practices by Maharashtra Government
10. Systemic and policy changes
11. The innovative project EMOVOICE DIALOGUE DIARY
12. Share fare activity
13. Collaborative learning method
14. Foundational literacy and numeracy
15. Educational Channels

दिनांक 4 जानेवारी 2025

सर्व सहभागी मुख्याध्यापक आणि संशोधक यांचे सादरीकरण दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पूर्ण झाले त्यानंतर मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली. या तीनही दिवस या चर्चासत्रात सहभागी होत्या. त्यांनी शैक्षणिक नेतृत्व संकल्पना, नेतृत्वाची भूमिका,राष्ट्रीय स्तरावर या संदर्भाने सुरु असणारे कामकाज यावर विस्तृत स्वरुपात मार्गदर्शन केले.



मा.डॉ.चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था यांनी आम्हाला या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय सेमिनार कार्यशाळा आयोजनात मी मागील 2 दिवसापासून सहभागी आहे, या चर्चासत्रात मला अनेक चांगल्या सकारात्मक गोष्टी शिकता आल्या, ते ज्ञान घेवुन मी येथुन जात आहे त्या पुढील कार्यकाळात निश्चीत उपयोगी पडतील असा विश्वास व्यक्त करते.

मी National Institute of Educational Planning and Administration NIEPA नवी दिल्ली अंतर्गत NCSL राष्ट्रीय विद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहे. आज आपल्या समोर NIEPA नवी दिल्ली च्या अनुषंगाने थोडक्यात माहिती सादर करणार आहे. NIEPA नवी दिल्ली अंतर्गत NCSL राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना 2012 मध्ये झाली असून आज पर्यंत कमीत कमी 5 लक्ष विद्यालयाचे नेतृत्व करणा-याना सशक्त् करण्याचे काम केले या संस्थेने केले आहे. तसेय विद्यालयाचे नेतृत्व या अनुषंगाने योग्य

सामग्री-साहित्य निर्माण केली असून सदरचे कार्य विस्तारपुर्वक क्षमतेने देशातील विविध राज्यात व केंद्रशासीत प्रदेशात चार घटकांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

NIEPA नवी दिल्ली या संस्थेची स्थापना 2012 मध्ये झाली. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान सुरू करण्यात आले आहेत. नॅशनल स्कूल लीडरशिप च्या अनुषंगाने वेबसाईटवर माहिती देण्यात आलेली आहे. हा कार्यक्रम प्रत्येक राज्यामध्ये सुरू असून केंद्र शासनाच्या गाईडलाईन नुसार इनपूट मदत व मार्गदर्शन देण्यात येते. संपूर्ण एशियामध्ये निपा नवी दिल्लीतच मर्यादित न ठेवता यांचे केंद्र, शाखा इतर राज्यात ही असावेत या उद्देशाने 30 राज्यांमध्ये केंद्र शाखा निर्माण करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र हे प्रथम फेजपासूनच आमच्या सोबत त्यामुळे अनेक प्रशिक्षण, शालेय नियोजन व्यवस्थापन अनुषंगाने कार्य केले आहे याचाच परिणाम आज तीन दिवसाची कार्यशाळा आयोजनाच्या माध्यमातून होत आहे. आम्ही शैक्षणिक कार्यक्रम, नीती धोरण निश्चित करताना इतर राज्याच्या शैक्षणिक संस्थांची कार्य व मत विचारात घेऊन समन्वयातून नियोजन केले आहे.

NCSL संस्थेचे मिशन उद्धेश असा आहे की शालेय नेतृत्व विकास, व हर बच्चा सिखे. अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे नियोजन येथे करण्यात येते. एक महिना, 24 दिवसाचे कॅपेसिटी बिल्डिंग प्रोग्राम-क्षमता संवर्धन कार्यक्रम तयार करण्यात आहेत. जेव्हा आपण लीडरशिपबद्दल बोलतो तेंव्हा जो लीडर अनेक लीडर घडवू शकतो तोच लीडर, जेव्हा आपण स्कूल लीडरशिपबाबत बोलतो तेव्हा एक व्यक्ती नाही तर तेथील प्रत्येक घटक, प्रत्येक समूह यात सामावलेला असतो, त्यात कोणत्या नेतृत्वाचा विकास होत आहे याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

यात मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, शालेय समिती, समाज, गाव इत्यादीचा त्यात समावेश होतो. यासोबतच आपल्याला छात्र नेतृत्व विकासाला सुद्धा चालना द्यावयाची आहे यासाठी सामाजिक जाणीव, शैक्षणिक बदलाचा स्वीकार शिक्षणाच्या माध्यमातून देणे गरजेचे आहे. तसेच भारत हा माझा देश आहे भारताविषयी प्रेम भावना वृद्धिगत होण्यासाठी सक्षम सुजाण नागरिक घडवण्यासाठी आपल्याला कार्य करावयाचे आहे.

Competency चा अर्थ आपण पाहू या,त्यासाठी अर्थ चार भागात पाहू उदा. गाडी चालवणे ज्ञान, विचार, अभिवृत्ती (ॲटीटयुड) मूल्य हे चार आहेत. चालवणे दक्षता बेसिक, विना प्रॅक्टिस च चांगले चालू

शकाल का ? नाही, ज्ञान (कोशल्य) असूनच चालत नाही तर त्याचा सराव मशीनरी माहितीसह चालवण्याचा सराव महत्वाचा आहे. ॲटीटयुड / टर्नसन मिशन ऑफ व्हॅल्यू म्हणून फाउंडेशनल लिटरसी FLN बाबत आपण जेंव्हा चर्चा करतो मुलामध्ये competency अपेक्षित करतो.

व्होकेशनल ट्रेड करण्यासाठी मुलगा हुशार पाहिजे किंवा नाही ? यापूर्वी मुलगा अभ्यासात सर्वसाधारण असलेला व्होकेशनल ट्रेड कोर्सेस करायचा परंतु आता ते शक्य नाही कारण आता एआय सारखे अत्यंत ऍडव्हान्स टेक्नॉलॉजीचे कोर्सेस आलेले आहेत, बुद्धिमान मुलच अशा कोर्सला प्रवेशीत होतील कारण नवीन वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्याची त्यांच्याकडे क्षमता असली पाहिजे. पूर्वी इयत्ता आठवी पासून कौशल्य विकास अभ्यासक्रम हा ऍक्टिव्हिटी कोर्स म्हणून ओळखल्या जात होता परंतु आता कोकॅरीक्युलम अभ्यासक्रम म्हणून ओळखला जातो. त्यामुळे आपल्याकडूनही अपेक्षा केली जाते मल्टी कॉन्फिडन्स असला पाहिजे, वेगवेगळे विषय शिकवले पाहिजे असे अपेक्षीत आहे. आपण आपल्या मुलांना शिकवताना लेखन, वाचन, भाषण, भाषेवरील प्रभूत्व, आपल्या ज्ञान व मुल्ये एटीट्यूड अँड व्हॅल्यू याचा प्रभाव दिसून येणे आवश्यक आहे.

या संस्थेमार्फत विविध प्रशिक्षणाचे मोड्यूल तयार करून त्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहेत सर्टिफिकेट कोर्सेस सुद्धा डिझाईन केलेले आहेत. हे सर्व आपल्या शालेय नेतृत्व विकासाला चालना देणारे कोर्सेस आहेत.यासाठी महाराष्ट्रातून शिक्षक व मुख्याध्यापक अधिकारी यांनी साधारणतः 30000 लोकांनी रजिस्ट्रेशन केले होते त्यापैकी दहा हजार लोकांनी सर्टिफिकेट कोर्सेस कम्प्लीट केलेले आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक सल्लागार समितीच्या सन 2025-26 च्या धोरणानुसार प्रत्येक मुल शिकले पाहिजे, प्रत्येक शाळा सुंदर झाली पाहिजे विकसीत भारत @2047 चा उद्देश असल्याचे सांगीतले. National Institute of Educational Planning and Administration NIEPA नवी दिल्ली मध्येच नाही तर भारताच्या विविध 31 राज्यात शाखा / संस्था स्थापन करण्यात येत आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात या कार्यालयाची सुरुवात सन 2015-16 या वर्षापासून प्रथम टप्यात करण्यात आली आहे. सदरचे काम आपल्या राज्यात मागील 12 वर्षापासून सुरु आहे. INTER SLA, ONE MONTH CERTIFICATE COURSE ऑन लाईन प्रोग्राम तसेच PSLM कोर्स साठी 30000 रजिस्ट्रेशन केले होते पैकी 10000 लाभार्थीने पुर्ण केले आहे. नेतृत्वातून अनेक नेतृत्व तयार केले गेले तर तेच खरे नेतृत्व आहे.नेतृत्व हे व्यक्ती आधारीत नाही तर सर्व घटकाचा समावेश असलेले नेतृत्व असले पाहिजे, ते सक्षम व लाभदायी ठरते. पाश्चात्य देशात विद्यार्थ्यांचे नेतृत्व रुजत आहे याच धरतीवर भारतात घडले पाहिजे. छात्र नेतृत्व वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत

याचे रोल मॉडेल कसे असावे याचा आढावा घेण्यात येत आहे.समाजाप्रती बालकाप्रती जागृती असली पाहिजे. छात्र नेतृत्वात कोणते नेतृत्व विकसीत होत आहे याचा अंदाज आला पाहिजे.

डॉ चारू मलिक यांनी शालेय नेतृत्व विकासाच्या अनुषंगाने Competency च्या अनुषंगाने सविस्तर पीपीटी द्वारे माहिती सांगीतली. आजचे व्यावसायिक कोर्सेस ॲडव्हान्स आले आहेत. LEARN TO LEARN MOST CONFIDENCY, EXTRA CURRICULAM आपण अनुभवाच्या जोरावर अनेक विषय शिकवू शकता असा विश्वास ज्ञानातून प्राप्त होतो कुंभार घडे घडवतो परंतु एकदाच घडा पसंत नाही पडणार त्यासाठी आपण अनेक घडे पाहतो. शहरात अनेक डॉक्टर सर्जन आहेत परंतु आपण कोणत्याही डॉक्टर सर्जन कडे जात नाही, किंवा सर्जरी करुन घेत नाही त्याचे ज्ञान, अनुभव, सर्जरी निपुणता, कमी मुल्य आकारणी म्हणजेच नैतिक मुल्य जोपासणार हे पहातो. तसेच कोर्ट केस लढायची झाली तर अनेक वकील मंडळी असतात परंतू आपण योग्य, ज्ञानी, चतुर, योग्य समर्पक बाजू मांडणारा निवडतो. तसेच आपण आपल्या पाल्यासाठी शिक्षक निवडताना प्रचंड ज्ञानी, गुणवान, नैतीकमुल्य असलेला इत्यादी सर्वांगीण बाबींचा विचार करुन निवडणार. मुलांमध्ये आत्मविश्वास वाढण्यासाठी आपल्यातही सतत व्यावसायिक क्षमता,विकास, वाढ कशी होईल याचाही विचार केला पाहिजे. या अनुषंगाने प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे आत्मविश्वास वाढविण्यासाठी तसेच पाठ्यक्रमाची रूपरेषा ठरविताना Competency Honesty Values आपण राष्ट्रीय व राज्यस्तरीय दर्जाचे SLA सेमीनार आयोजित करीत आहोत. त्यासाठी गुड गव्हर्नन्स हा पहिला पॅरामिटर असेल, यासाठी पारदर्शकता, फिजीकल एंगेजमेंट, ॲक्टीव्हीटी, अकांउटेंबिलिटी चा विचार करण्यात येईल, ते शिक्षकांमध्ये असेल तर मुलांमध्ये competency येतील, जेवढे मुख्याध्यापकांचे शिक्षकांचे लर्निंग आऊट कम सोर्सेस वाढतील तेवढेच मुलं सक्षम घडतील.

जेव्हा शिक्षकांचे 4 / 5 दिवसाचे ट्रेनिंग मोड्युलचे नियोजन करतो तेव्हा त्या विषय व वर्गाच्या मुलांच्या अनुषंगाने अभ्यासक्रमाचा विचार करतो. काय काय ॲक्टिव्हिटी करायची त्यापेक्षा शिक्षकांचे आऊट लर्निंग सोर्सेस वाढले पाहिजेत. तेव्हाच शिक्षकाची व्यावसायिक ज्ञान वृद्धि होईल मुलाचे शिकणे समृद्ध होईल म्हणूनच संस्था शिक्षण क्षेत्रातील सर्व नेतृत्वाची व्यावसायिक वृद्धी करण्यासाठी प्रयत्न करित आहे.

NIEPA नवी दिल्ली या संस्थेच्या वेब साईट वर अभ्यासाच्या अनुषंगाने माहिती आहे ते आपण पाहू शकता, जे-जे चांगले काम केले आहे, रिसर्च केले आहे, केस स्टडी आहेत त्या वर्षनिहाय उपलब्ध आहेत. तसेच आपल्या या कार्यशाळेतील सर्व व्हिडीओ उपलब्ध करून देण्यासाठी पाठविण्यात यावेत असे आवाहन केले. विविध राज्यात लिडरशिप वर झालेल्या कामाबाबत माहिती व व्हिडीओ उपलब्ध आहेत.

राजस्थान,मध्य प्रदेश व गोव्याची माहिती यात आहे. तसेच यापुढील शालेय नेतृत्व विकासाच्या अनुषंगाने चर्चा सत्र गोवा मध्ये घेण्याचा मानस आहे. असे सांगुन आपण या तीन दिवसीय कार्यशाळेतून घेवुन जात असलेल्या अनुभवाचा, ज्ञानाचा आपल्या शालेय व्यवस्थापनात नक्कीच मदतीचे व मार्गदर्शक ठरतील असा विश्वास व्यक्त् केला शुभेच्छा दिल्या.

यानंतर महाराष्ट्र राज्याचे आयुक्त शिक्षण हे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाही तरी झूम मीटिंग द्वारे त्यांनी उपस्थित सहभागी मुख्याध्यापक,संशोधक यांच्याशी संवाद साधला.



मा. श्री. सचिंद्र प्रतापसिंह,आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्त् कार्यालय, महाराष्ट्र पुणे

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था यांनी आम्हाला या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी मी प्रशासकीय कामाच्या निकडीमुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकलो नाही असे नमूद करुन या कार्यशाळेचे आयोजक तथा मिपा संस्थेचे प्रमुख श्री.प्रकाश मुकुंद, यांच्याकडून थोडक्यात आढावा घेतला तसेच या कार्यशाळेस उपस्थित असलेल्या मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहायक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली, व मुंबई, पुणे, गोवा, राज्यस्थान, येथील निवडक मुख्याध्यापक यांचेशी चर्चा करुन हे चर्चासत्र यशस्वी फलदायी होत असल्याचे आपले मनोगत ऐकुन समाधान व्यक्त केले.



सहभागी मुख्याध्यापक / प्राचार्य धावता आढावा व मार्गदर्शन

आजच्या या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजनाचा उदेश सफल होत असल्याचे या कार्यशाळेत उपस्थित सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी व्यक्त् केले. त्यात त्यांनी,या तीन दिवसाच्या कार्यशाळेत मिळालेले ज्ञान व अनुभव हे अत्यंत अनमोल व आमच्या शालेय व्यवस्थापनात येणा-या प्रत्येक अडचणीवर मिळालेले उत्तर असल्याचे नमूद केले. तसेच आमच्या जीवनातील निराशा, नकारात्मक दुर झाल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आले. हया चर्चासत्रात मिळालेली ज्ञानाची व अनुभवाची शिदोरी आम्ही घेवुन जात आहोत ती इतरांनाही देण्याचा आम्ही निर्धार करित आहोत. तसेच असे राज्य स्तरावरील चर्चासत्र वांरवार आयोजित करुन नेतृत्व विकास असो शैक्षणिक बदल असो शालेय शैक्षणिक नेतृत्व समृध्द करण्यात यावेत. शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चा सत्र ज्या मिपा संस्थेने आयोजित केली त्या संस्थेचे या चर्चा सत्र / कार्यशाळेत ज्या - ज्या मान्यवरांनी मार्गदर्शन व विचाराचे आदान प्रदान केले त्या सर्वांचे आभार असल्याबदल **मनोगत** त्यांनी व्यक्त् केले.



डॉ.ज्योती कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी तथा नोडल अधिकारी,
मिपा संस्था,छत्रपती संभाजीनगर

मिपा संस्थेच्या कामकाजाचे सादरीकरण

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA या संस्थेची स्थापना सन 1994 मध्ये करण्यात आली. या संस्थेने सुरुवातीच्या काळात सक्षम व प्रभावीपणे राज्यभरात प्रशिक्षणे आयोजित केलेली आहेत. अनेक शिक्षक,मुख्याध्यापक व अधिकारी यांचे शैक्षणिक नेतृत्व प्रशिक्षण झाल्याचे दिसून येते. मध्यंतरीच्या काळात मनुष्यबळाअभावी या संस्थेच्या कामकाजावर परिणाम झाला होता, सन 2017 च्या शासन निर्णयानुसार शालेय नेतृत्व विकास अकादमी म्हणून घोषित झाली त्या वेळचे शिक्षण सचिव माननीय नंदकुमार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय नेतृत्व विकासाच्या अनुषंगाने कामकाज सुरु झाले. या संस्थेकडून School Leadership Development Program (SLDP) for HMs,Cluster Heads and BRPs., School Managment and Development Commitee Members (SMDCs) Kendra Pramukh Academic Leadership Programme (KPALP) for Cluster Heads. Educational Leadership Development Programme (ELDP) for DIET Officers, EO, Dy.EOs, BEOs and Extesion officers. Shalasiddhi (National Program on School Standards and Evaluation) Managment of Training,Math,English,Marathi for techers,HMs and Officers of Tribal department., SLA - various Activities, LEAD Programme - Online Training, Implementation of STARS Project, NIPUN Souvenir online publication on the occasion of

Silver Jubilee of इत्यादी शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून याचे लाभार्थी शिक्षकांपासुन ते शिक्षणाधिकारी पर्यंत, शालेय समिती सदस्य ते ग्रामपंचायत सदस्य पंचायत जिल्हा परिषद सदस्या पर्यंतचे लोकप्रतिनिधी संपूर्ण राज्यात आहेत. कोविड काळानंतर LEAD प्रोग्राम सुरु झाला यातून अधिकाऱ्याचे सक्षमीकरण होत राहावे म्हणून सुरुवात झाली. याचा राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनी फायदा घेतला असल्याचे सांगितले. शालेय नेतृत्व सक्षमीकरण अंतर्गत capacity building activity मध्ये २०१८-१९ पासून आत्तापर्यंत आपण हजारो लोकांपर्यत पोहचलो आहोत.

MIEPA या संस्थेचे कार्य आता पर्यन्त चे संचालक व कामकाज अनुषंगाने गेल्या 25 वर्षाचे कार्य दर्शविणारे निपुण नावाने एक पुस्तक प्रकाशित केले आहे ते साईटवर उपलब्ध होणार आहे. स्कूल डेव्हलपमेंट अॅकडमी म्हणून घोषित झाल्यानंतर हे काम साधारण 2019 पासून सुरू झाले आहे. मी सन 2019 पासूनच मी सुद्धा या संस्थेत काम करीत आहे. सन 2020 मध्ये स्टेट लेवल वेबिनार सुरू केला. यामध्ये स्टेट डिग्निटरीचा समावेश केला यात शिक्षक पासून अधिकारी पर्यंत या या सगळ्यांचा सक्षमीकरण होण्यासाठी ज्या 2020 च्या एनईपी मध्ये आवश्यक बाबी सांगितले आहेत त्याबाबत प्रशिक्षण सुरु झाले, धोरणाची अंमलाबजावणी साठी प्रयत्न झाले. या स्टेट वेबिनार माध्यमातून 417472 लक्ष लोकांनी लाभ घेतला, त्यानंतर प्रत्येक DIET ला सूचना देण्यात आल्या, आपल्या जिल्ह्यात NEP 2020 च्या अनुषंगाने जे घटक त्या अनुषंगाने वेबीणार घ्यावेत म्हणून तज्ञ यांची मदत घेण्यात आली त्याचा फायदा जिल्हा स्तरवर दिला आहे, हे सर्व वेबिनार मिपा साईटवर देण्यात आले आहेत. वर्षनिहाय वेबिनार सुरू आहेत.

पेडागौजीकल लीडरशिपसाठी आम्ही 10 लोकांची निवड केली या ठिकाणी प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण झाले, PSLM नावाचा कोर्स आहे तो अनेकांनी केला आहे. हा प्रोग्राम NCSL निपा यांनी तयार केला असून मराठी भाषांतर मिपा संस्थेने केले आहे, याचे भाषांतर वेबसाईट वर आहे. PSLM हा कार्यक्रम 3 डिसेंबर 2020 सुरु झाला.यामध्ये मुख्याध्यापकांचे capacity building चे काम झाले आहे, जे शाळेत उपयोगी होवु शकते असे साहित्य उपलब्ध आहे. अनेक मोडूयल वेबसाईट वर आहेत मोड्युल म्हणजे काय -उस तोड कामगारांच्या मुलांचे स्थलांतर, अनुषंगाने विपरीत परिस्थितीत मुख्याध्यापक शिक्षक यांचे कार्य हे यातून दर्शविण्यात आले आहे असे अनेक व्हीडीओ, यशोगाथा या संस्थेच्या वेबसाईटवर आहेत.आपण या वेबसाईटला भेट दयावी असे आवाहन केले.

मिपा संस्थेकडे मनुष्यबळ अत्यंत कमी आहे.सर्व अॅकडेमिक कामासाठी शालेय नेतृत्व अकादमी च्या कोअर ग्रुपचे सहकार्य घेतले जाते.विशेष आवर्जून सांगावे वाटते की,मिपा कोअर ग्रुप सदस्य श्री ओमप्रकाश शेळके यांचे विशेष सहकार्य नेहमीच असते.वेबिनार तसेच शाळा व्हिडिओ डॉक्युमेंटरी ही कामे त्यांच्या सहकार्याने होत आहेत.

सहभागी सदस्य अनुधावन /FEED BACK OF PARTICIPANT

यानंतर सहभागी सदस्य अनुधावन / FEED BACK OF PARTICIPANT घेण्यात आला,प्रत्येकाला या चर्चासत्रात तुम्ही काय शिकलात याबाबत बोलण्याची संधी देण्यात आली

INTER SLA राज्यस्तरीय चर्चासत्र समारोप व प्रमाणपत्र व TROPHY वितरण


MIEPA-SLA

MAHARASHTRA

Inter-SLA Regional Seminar on School Leadership

CERTIFICATE

This is to certify that Dr./Mr./Mrs./Ms._____

has participated in the **Inter-SLA Regional Seminar on School Leadership** organised by the **School Leadership Academy-Maharashtra (MIEPA-SLA)** in collaboration with the **National Centre for School Leadership (NCSL), NIEPA, New Delhi** held at PACE Center, Nandrabad, Tq.Khultabhad, Dist.Chhatrapati Sambhajinagar from 02nd to 4th January, 2026.


MIEPA-SLA appreciate the scholarly contribution and valuable insights shared during the seminar.

(PRAKASH MUKUND)
Director
MIEPA-SLA
Maharashtra



या चर्चासत्राच्या शेवटच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक सहभागी मुख्याध्यापक,संशोधक यांना प्रमाणपत्र व TROPHY वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,त्यानंतर या मान्यवरांनी खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले.





मा.श्रीम.शैलेजा दराडे, संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण तथा राज्य आंग्लभाषा अध्यापन संस्था, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगर या संस्थेनी आयोजित केलेल्या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्रास उपस्थित सर्व मुख्याध्यापक यांचे स्वागत. आपण आपल्या कार्यात निपुण आहात आयडॉल आहात असे मी मानते. आपल्या समोर असलेल्या अनेक प्रश्नाची उत्तरे या कार्यशाळेतून घेवुन जात आहात. आता परवाच जवळपास 500 आयडॉल शिक्षकांची कार्यशाळा छत्रपती संभाजीनगर मध्ये संपन्न झाली, आज शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्रात मुख्याध्यापक आहात आपण इतरापेक्षा कांही तरी वेगळे आहात म्हणुन तुम्ही येथे आहात. एक उदा दिले की, एक मुलगी लक्षी नावाची ती तीच्या आजी सोबत निसर्गाच्या सानिध्यात होती ती पावसाळा आला की, त्या ठिकाणी असणारे मोरांचे नाचणे सुरु होत असे, पावसाळा गेला की, मोर पण जात असत पण त्या मुलीचा हटट होता की, मोरांना येथुन जाऊ दयायच नाही. मोरांनी ते मान्य केले आणि अट अशी ठेवली की मी येथे राहिन परंतु या मुलींने माझ्यासोबत नाचणे शिकायच आणि ते तस झाल. लक्षी नाचणे शिकली मोर गेला पण जेव्हा पावसाळा येई तेव्हा ती पावसात मनसोक्त् बागडायची नाचायची. तस आज आपली कार्यशाळा येथे संपली तरी आपण येथून जे कार्यशाळेतून अनुभव घेवून जात आहात ते आपल्या सोबत आहे. ती अनमोल ज्ञानाची अनुभवाची शिदोरी सोबत आता कायम आपल्या सोबत आहे. त्याचा उपयोग करुन आपल्या समस्या सोडवाल व शाळेचे शालेय नेतृत्व विकासाच कार्य कराल यासाठी शुभेच्छा देते.



श्रीम.भावना राजनोर, शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्रास उपस्थित सर्व मान्यवरांना सस्नेह नमस्कार! महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA या संस्थेनी आपणास एकत्र आणून प्रत्येक जिल्ह्यात आपली हक्काची माणसं आपल्याला दिली आहेत, या राष्ट्रीय स्तरावर आयोजित चर्चासत्रात सहभागी शाळांतील अनेक चांगल्या बाबी, शैक्षणिक उपक्रम यांची देवाणघेवाण झाली आहे. बेस्ट प्रॅक्टिसेस महाराष्ट्राच्याच नाही तर भारत देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचाव्यात हा हेतू सफल होत असल्याचे याची देही याची डोळा अनुभवताना समाधान असून व आपला परिवार एकमेव अद्वितीय ठरणार आहे याची प्रचिती वाटत आहे. प्रत्येक व्यक्ती जन्मत: लिडर असतो जसे सिंहाला आयळ लावावी लागत नाही तसे लिडर घडवावे लागत नाहीत, आपण ते सिंह आहात असे दिसून आले.

मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या वतीने मी फक्त् या कार्यशाळेच्या उदघाटनास आले होते परंतु येथे आल्यानंतर लक्षात आले की, ही कार्यशाळा अनुभव संपन, शालेय नेतृतवाच्या अनुषंगाने अनेक प्रश्नाची उत्तरे कृतितून सोडविलेल्या मुख्याध्यापकाची असल्याचे जाणवले मी येथून जाण्याचे विसरुन तीनही दिवस रममाण झाले. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या वतीने मी शब्द देते की, मिपाच्या अशा प्रेरणादायी, चैतन्यमयी कार्यक्रमांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कायम आर्थिक सहाय्य करेल. आपण सर्व शिक्षणाच्या वारीचे वारकरी आहोत आपण सर्व एक आहोत ही भावना घेवुन जावु. आपणास पुढील कार्याच्या शुभेच्छा.



श्री.अनिल साबळे, अध्यक्ष, माध्य. व. उच्च माध्य. विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगर, NIEPA नवी दिल्ली व मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, MPSP मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्रास उपस्थित सर्वांचे अभिनंदन, आज आपण या यशस्वी कार्यशाळेच्या समारोपाकडे आलो आहोत.

कमी शब्दात बोलणा-या माणसाचे उदाहरण देवून म्हणाले की, कमी बोलणे म्हणजेच वेळेच भान ठेवून योग्य ती माहिती कमीत कमी शब्दात, कमीत कमी वेळेत मांडता आली पाहिजे या कार्यशाळेत हे लक्षात आले असेलच. या कार्यशाळेत मागील तीन दिवसात झालेल्या कार्यक्रम व चर्चा सत्राच्या अनुषंगाने चर्चा झाली असता असे आवर्जून लक्षात आले की, केंद्र, तालुका, जिल्हास्तरावरील शिक्षण परिषदा किंवा कार्यशाळा होतात त्यापेक्षा नक्कीच वेगळी असल्याचे दिसून आले,आपल्यापैकी खूप मुख्याध्यापकांनी अनेक अडचणीवर मात करता येते याचे कृतितून उत्तर दिलेले आहे ते या कार्यशाळेत स्वंय अनुभव व पीपीटीच्या

माध्यमातून दिवसभर व स्वयंस्फुर्तीने सांयकाळचे सत्रात सुध्दा अनमोल अनुभव विचाराची देवाणघेवाण करुन समृध्द केले आहे.

आम्ही जेव्हा शासकीय व खाजगी संस्थाच्या शाळांना भेटी देतो तेथे वेगवेगळे प्रश्न असतात. परंतु आपण जे काम स्विकारले ते काम कसे आनंददायी करायचे ते आपल्यावर अवलंबून आहे. या कार्यशाळेत आपले सादर केलेले सर्व अनुभव, विचार वास्तव कामकाजात एकमेकांना मार्गदर्शक सहायभुत असल्याचे निदर्शनास आले आहे, ते आपण आपल्या शालेय नेतृत्व विकासाच्या माध्यमातून ते प्रत्यक्ष कृतित उपयोग करावे. या कार्यशाळेत उपस्थितांनी इतरांना सुध्दा प्रेरणा देवुन सहाय्य करुन शाळा व शालेय नेतृत्व विकासासाठी हातभार लावावा ही अपेक्षा आहे.

हया संस्थेला उर्जीत अवस्थेत आणुन महाराष्ट्रात शालेय नेतृत्व विकास नाही तर देशपातळीवर शालेय नेतृत्व करण्यासाठी सक्षम करणारे या संस्थेचे संचालक, श्री. प्रकाश मुकुंद सर, समन्वयक डॉ. ज्योती कुलकर्णी यांचे तसेच त्यांच्या टिमचे विशेष अभिनंदन. या कार्यशाळेत उपस्थित सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांना या कार्यास शुभेच्छा.



मा.श्री.प्रकाश मुकुंद, संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगर.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगर, यांचे मार्फत मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, MPSP मुंबई यांच्या सहाय्याने व मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली या शालेय नेतृत्व विकास राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उदघाटक मा.डॉ. शशीकला वंजारी, मा. कुलगुरु, NEAPA नवी दिल्ली, मा. श्री. कृष्णकुमार पाटील, शिक्षण संचालक, योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे. श्री.अनिल साबळे, अध्यक्ष, माध्य. व. उच्च माध्य. विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर. मा.डॉ. चारुस्मिता मलिक, सहाय्यक प्राध्यापक NCSL, NIEPA नवी दिल्ली हे मान्यवर उपस्थित आहेत त्यांचे प्रथम अभिनंदन व्यक्त् करतो. या तीन दिवशीय कार्यशाळेत उपस्थित असलेल्या महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयाचे प्रातिनिधीक मुख्याध्यापक व राज्यस्थान, गोवा, मध्यप्रदेश येथील उपस्थित मुख्याध्यापक या सर्वांचे स्वागत व अभिनंदन करतो.

आपण सर्वजण या राष्ट्रीय कार्यशाळेत गेल्या तीन दिवसापासून एकमेकांशी संवाद साधत आहोत, एकमेकांचे अनुभव, विचारांचे आदानप्रदान करित आहोत ही प्रक्रीया आता निरंतर होत राहिल. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगरची स्थापना ही सन 1994 मध्ये झाली असून ही संस्था अत्यंत चांगले कार्य करित आली आहे. परंतु मध्यंतरी या संस्थेकडे मनुष्यबळा अभावि कार्यालयात गती मंदावली होती, आजही या संस्थेत डॉ. कुलकर्णी मॅडम, श्री मयुर पखाले, व मी स्वत: एवढेच कार्यरत

आहोत, मागील कांही महिन्यापासून शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर पदाचा कार्यभार माझ्याकडे होता त्यामुळेही फार लक्ष देता आले नाही.

आता या संस्थेच्या कामकाजासाठी पुर्णवेळ उपलब्ध आहे, नक्कीच चांगले प्रयत्न करिन. या संस्था स्थापनेपासून व अगोदरच्या सर्व कार्यरत संचालकांनी संस्थेसाठी कार्य केले आहे ते नक्कीच व्हीजनरी लोक होते, या संस्थेची आवश्यकता का आहे, याची जाणीव होती ती खरोखरच आपणास जाणवत आहे. संस्था माणसे निर्माण करतात उदा. नवोदय ही संस्था आहे ही संस्था कुठला तरी व्हीजनरी -उद्देशाने निर्माण केली ती जपली त्यापासून आता नवोदय विद्यालय निर्माण झाले, ही सुध्दा संस्था आहे ती जपली पाहिजे यातुन अधिका-यांना ज्ञान व प्रेरणा मिळेल, व्यासपीठ उपलब्ध होईल, चांगले नेतृत्व उन्नत होईल, त्यांचा महाराष्ट्राच्या शैक्षणिक उन्नतीला प्रगतीला लाभ होईल हा उद्देश घेवुन ही संस्था त्यावेळेस स्थापन झालेली आहे आणि तो उद्देश आपल्या रुपाने सफल होत आहे म्हणुन येथून मा. मंत्री महोदय, मा. शिक्षण सचिव, मा. आयुक्त शिक्षण यांचेशी संपर्क साधुन मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी, इत्यादी जो स्कुल लिडरशिप चा भाग आहे, यांच्या पर्यंत जाण्याचा प्रयत्न करित आहोत.

शिक्षण क्षेत्रात होणा-या बदलाच्या प्रवाहात त्या रुजवण्याचा प्रयत्नही ही संस्था करित राहिल. या संस्थेच्या कामकाजाची संपुर्ण जबाबदारी डॉ ज्योती कुलकर्णी व श्री. मयुर पखाले यांचेवर असून हेल्पींग हॅन्ड म्हणुन छत्रपती संभाजीनगर शहरातील प्रादेशिक विद्या प्राधिकरण, / राज्य आंग्लभाषा अध्यापन संस्था, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, येथील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मोलाचे असल्याचे आवर्जून नमूद करित असल्याचे सांगीतले.

तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मा. अनिल साबळे साहेब, अध्यक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, छत्रपती संभाजीनगर व श्रीम. भावना राजनोर मॅडम, शिक्षण उपसंचालक, MPSP मुंबई याचे मार्गदर्शन व पुढाकार असल्याचे, तसेच एकंदरीत आपल्या सर्वांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे ही राष्ट्रीय कार्यशाळा यशस्वी संपन्न होत आहे. असेच आपण एकत्र येवून काम करित राहिलो तर असे चांगले कार्य होत राहिल. मी हे का करतो आहे तर माझ्यासाठी इतर लोक काम करित आहेत म्हणुन अशी एकतेची भावना निर्माण होईल व आपण करित असलेल्या कामातून आपली उर्जा वाढवावी ती उर्जा इतरांमध्ये प्रवाहित व्हावी व त्याची उर्जा उत्साह वाढला पाहिजे या उद्देशानेच या कार्यशाळेचे औचित्य आहे, व ते सफल झाले असल्याचे मला नम्रपणे नमूद करावे वाटते. ही कार्यशाळा आमच्या पध्दतीने आयोजीत केली त्यात आपण सहभागी, समरस होवुन या कार्यशाळेचा दर्जा उंचावण्यास हातभार लावला आहे. त्याबदल आपले सर्वांचे आभार.

आभार प्रदर्शन व समारोप



डॉ.ज्योती कुलकर्णी, नोडल अधिकारी SLA मिपा संस्था, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन प्रशासन संस्था, MIEPA छत्रपती संभाजीनगर, या राज्यस्तरीय संस्थेमार्फत आयोजित कार्यशाळा आयोजनास ज्यांचे सहकार्य लाभले आहे त्या सर्वांचे व कार्यशाळेसाठी मंत्री महोदय उपस्थित रहावेत म्हणुन शेवटच्या दिवसापर्यंत उपस्थित राहावेत म्हणुन प्रयत्नशील असणारे ओएसडी श्री. योगेश सोनवणे, शासनाचे प्रतिनिधी मा. श्री. कृष्णकुमार पाटील साहेब, संचालक, योजना महाराष्ट्र राज्य पुणे, मा. अनिल साबळे साहेब, अध्यक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, छत्रपती संभाजीनगर व श्रीम. भावना राजनोर मॅडम, शिक्षण उपसंचालक, MPSP मुंबई, NCSL च्या चारू मलिक व छत्रपती संभाजीनगर येथील सर्व क्षेत्रीय व जिल्हास्तरीय कार्यालयातील कार्यालय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांचे आभार मानते. तसेच आपण सर्वजण सहभागी विविध राज्यातून राज्याच्या विविध जिल्हयातून आलेले मुख्याध्यापक / प्राचार्य, प्राध्यापक यांनी या कार्यशाळेत उपस्थित राहून आपल्या कार्यातील अनुभव, व विचारांची देवाणघेवाण केली केली. या ठिकाणाहुन आपण जे कांही चांगले ते घेवुन जाणार आहात व ते इतरापर्यंत पोहचवणार आहात अशी अपेक्षा व्यक्त करते, व आभार मानते. या कार्यशाळेस ज्यांचा-ज्यांचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य व सहभाग आहे त्या सर्वांचे आभार मानते व ही राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाल्याचे मा. अध्यक्ष यांचे परवानगीने घोषित करते.



MIEPA_SLA YouTube Live उद्घाटन कार्यक्रमाची लिंक

https://youtu.be/pKnoAVoZsY0?si=a4Ui6zCT6JkndfA-

MIEPA SLA CSN MAHARASHTRA

SLA CSN 2026 INTER SLA SEMINAR LINKS

- **MIEPA Official Website**

miepa.ac.in

- **Channel & Playlist**

You tube :-	www.youtube.com/@MIEPASLA
India	
Joined Jan 1, 2020	
15.1K subscribers	
112 videos	
363,052 views	

Youtube Posts Inter SLA Seminar 2 - 4 Jan, 2026

- https://www.youtube.com/post/UgkxTVFjJD0o88cZpFaKJiC0iZGVtlexrc1l

Inter SLA Seminar playlist (Testimonials of Participants)

- https://www.youtube.com/playlist?list=PLbfwsvbjDH-n8gNDeyWjReKAhEkhh7Oyf

Inter SLA Seminar playlist (Testimonials of Dignitaries-Guest)-

- https://youtube.com/playlist?list=PLbfwsvbjDH-nx6HCCkfJwHUzw6nKk94k_&si=kcDU5hx8d06i44m5

PHOTOS and all Material Uploaded Drive link.

- https://drive.google.com/drive/folders/1grBcVlzfCoBZ-bD8T1TSo9nAHj6Bb0Jj?usp=sharing

- MIEPA SLA INTER SLA SEMINAR 2-4 JAN.2026 - Google Drive

PPTs by Participants -

https://drive.google.com/drive/folders/1aR_aICDmCXt755YRTTdTErLONe7_cZQK?usp=sharing

Participants Photos -

https://drive.google.com/drive/folders/1kATl1Zjg_9z8ezg6H7gghHg3b4DS1FWQ?usp=sharing

उद्घाटन कार्यक्रम online Live लिंक (YouTube)


- https://youtube.com/live/17Be_7mzZtA?feature=share


Inter SLA seminar glimpses Video by MIEPA SLA CSN Maharashtra 2-4 Jan 2026 PACE CSN

Inter SLA राज्यस्तरीय चर्चासत्र

प्रशिक्षणार्थी FEED BACK - अनुधावन

या चर्चासत्रात सहभागी मुख्याध्यापक, संशोधक आणि नोडल अधिकारी यांच्या कडून सदर चर्चासत्राच्या अंमलबजावणीतून हेतू साध्यता झाली किंवा नाही हे पडताळून पाहण्यासाठी तसेच पुढे घ्यावयाच्या उपक्रमांच्या गुणवत्तापूर्ण अमलबजावणी साठी गुगल लिंकद्वारे अनुधावन करण्यात आले,त्याचा अहवाल खालीलप्रमाणे






Technical Arrangement (तांत्रिक व्यवस्था)

78 responses




Sitting Arrangement (बैठक व्यवस्था)


78 responses




Food Arrangement (भोजन व्यवस्था)

78 responses




Venue of the seminar (सेमिनार स्थळ - पेस सेंटर)
78 responses
11.5%
87.2%
Best (उत्कृष्ट)
Better (चांगली)
Satisfactory (समाधानकारक)
Improvement needed (सुधारणा आवश्यक)


The theme you like most (Select from the following)
78 responses
अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील तंत्रज्ञान... 34 (43.6%)
शालेय नेतृत्व आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण... 56 (71.8%)
अध्ययन क्षमता सुधारण्यासाठी अध्या... 25 (32.1%)
शाळेत नाविण्यपूर्ण संस्कृती निर्माण... 31 (39.7%)
शाळा आणि समुदाय आंतरसंबंध सक्ष... 38 (48.7%)
उत्तम शालेय प्रशासन - Leading Sc... 38 (48.7%)
लिंग समभावासाठी सक्षम शालेय नेतृ... 18 (23.1%)
समता, विविधता आणि समावेशन या... 24 (30.8%)
0
20
40
60

What did you learn in this seminar?
(सदर सेमिनार मध्ये आपणास काय शिकायला मिळाले)

Positive attitude खूप कांहीं positive एनर्जी to in build confidence
"या सेमिनारच्या माध्यमातून मला नव्या ध्येयवेड्या आणि कर्तृत्ववान लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. डिजिटल क्रांतीच्या (Digitalization) युगात शिक्षणाची आणि कामाची बदलती क्षेत्रे कोणती आहेत, याची सखोल माहिती मिळाली. विशेषतः इतर राज्यातील प्रतिभासंपन्न मुख्याध्यापकांशी चर्चा केल्यामुळे तिथल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची आणि त्यांच्या शासन धोरणांची नवी दृष्टी मिळाली. त्यांच्या अनुभवाचा उपयोग मला माझ्या भविष्यातील वाटचालीसाठी नक्कीच होईल."
इतर सर्व मुख्याध्यापकांनी सदर केलेल्या कामाच्या अनुभवाची माझ्या शाळेत कोणत्या उणिवा आहे याची जाणीव होऊन इराणी केलेल्या कामाची मला माझ्या शाळेत चांगले काम करण्याची मला आवड निर्माण झाली.
NIEPA दिल्ली आणि MIEPA महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सेमिनारचा मुख्य उद्देश शालेय नेतृत्व व शैक्षणिक गुणवत्तेचे बळकटीकरण करण्यासाठी संस्थात्मक क्षमतांचा विकास करणे हा होता. या सेमिनारचे संयुक्तपणे सुनियोजित व सुव्यवस्थित आयोजन करण्यात आले असून, देशातील विविध राज्यांमधून आलेल्या शाळा प्रमुख व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा सक्रिय सहभाग लाभला. सेमिनारदरम्यान आधुनिक शालेय व्यवस्थापन दृष्टिकोन, प्रभावी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, विद्यार्थी-केंद्रित नवोन्मेषी अध्यापन पद्धती, शाळा विकासाच्या दीर्घकालीन योजना, समुदाय सहभागाची प्रेरणादायी व व्यवहार्य उदाहरणे, वेळ व्यवस्थापनाच्या प्रभावी रणनीती तसेच शैक्षणिक प्रशासनात नेतृत्वाची भूमिका यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा व प्रशिक्षण देण्यात आले. विशेषतः NIEPA दिल्लीच्या कार्यपद्धती, संशोधनाधारित धोरणात्मक सूचना, शाळा सुधारणा संदर्भातील मॉडेल्स तसेच प्रत्यक्ष अनुभवांचे आदान-प्रदान करण्यात आले, ज्यामुळे सहभागींस शैक्षणिक नेतृत्व अधिक सक्षम करण्यासाठी नवी दृष्टी प्राप्त झाली. या सेमिनारमधून मिळालेल्या ज्ञान, अनुभव व नवोन्मेषांचा वैयक्तिक तसेच व्यावसायिक आचरणात अवलंब करून ते शाळा स्तरावर प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे, ज्यायोगे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक रोचक, परिणामकारक व विद्यार्थी-केंद्रित होईल आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करता येईल.
प्रत्येक व्यक्तीकडून नवीन कल्पना, नविन्यता, कल्पकता शिकायला मिळाली. नवी कौशल्य नवा शैक्षणिक दृष्टिकोन या सेमिनारमधुन घेऊन जात आहोत.
Best practices... Head Master and his team and resources are very important and school management
सर्वप्रथम मीपाचे या स्तूत्य उपक्रमा करीता मी आभार मानतो. मीपाद्वारे आयोजित या सेमिनारमध्ये मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. या सेमिनारचा फायदा मला माझ्या शाळेत उपक्रम राबविताना व ते अधिक प्रभावी करण्यासाठी झाला. शालेय नेतृत्व सांभाळताना आवश्यक असणारी कौशल्य व गुण अधिक उपचारात्मक करण्याकरिता आवश्यक अशी शिदोरी मला या प्रशिक्षणात मिळाली. मीपाने संपूर्ण महाराष्ट्रातील आपल्या नेतृत्वाने कायापालट घडवून आणणाऱ्या मुख्याध्यापकांना एकत्रीत करून सर्वांना नवीन शिकण्याची संधी मिळवून दिली. हे प्रशिक्षण शाळेच्या, शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उपयोगी ठरणार आहे. या प्रशिक्षणाने महाराष्ट्र, राजस्थान,मध्यप्रदेश व गोवा या राज्यातील मुख्याध्यापक व अधिकारी यांच्या कार्यातून प्रत्येकाला नाविन्यपूर्ण बाबी शिकायला मिळाल्या या प्रशिक्षणाने मला आमच्या शाळेतील उपक्रमात आणखी भर खालून ते मला व माझ्या शाळेत राबवण्यासाठी फायदा झाला. मीपाने असे उपक्रम घ्यायला हवेत यामुळे महाराष्ट्रातील शिक्षणाचा कायापालट होऊ शकतो व आणखी शाळा या

उपक्रमात सहभागी होऊ शकतात. हे सेमिनार जास्त दिवसाचे असायला हवे होते.या सेमिनारणे सर्व सहभागी नेतृत्वाला प्रेरित केले व त्यांच्या कार्यात सातत्य ठेवण्यासाठी मोलाची दिशा दिली. मीपा व सर्व अधिकारी वृंदाचे हार्दिक आभार !
इरादा अनेक हो और सच्ची लगन हो तो हर खडतर रास्ता आसान होता है। यह सिख मिली और ऐसा हौसला मिला जिससे मेरी स्कुल को उड़ान भरणे के लिए उपयुक्त है । और स्कुल के हर छात्रा को एक नई सोच देणे की दृष्टी मिली।
नेतृत्व करण्यासाठी योग्य दिशा मिळाली
विविध शाळांमध्ये असलेले नेतृत्व.. त्यातील नाविन्यपूर्ण कौशल्ये विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण पध्दती.
विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता निर्माण करणे, तसेच नेतृत्व विकासाला चालना मिळेल
स्वयं प्रेरणा, टाकाऊ वस्तु पासून नवीन वस्तू तयार करणे, टीम वर्क
To in build my confidence
शालेय नेतृत्वातील विविध पैलू आणि त्याचा शालेय नेतृत्व करत असताना होणारा फायदा याविषयीची माहिती या सेमिनारच्या माध्यमातून माझ्या शाळेचा गुणवत्ता पूर्ण विकास करण्यासाठी आणि त्यासाठी सक्षम नेतृत्व उभं करण्यासाठी निश्चितच होईल
How best practices can be adopted in my college
शाळा एका QR CODE मध्ये आणणे,डिजिटल करणे आणि ISO करणे
शिक्षक म्हणून आपण आपल्या विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आपण किती प्रकारे काम करू शकतो आपल्यापेक्षा अनेक शिक्षक वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी समोर असताना आपले विद्यार्थ्यांच्या जीवनात गुणवत्ता निर्माण करण्यासाठी अखंडित कार्यरत आहेत हे त्याचं योगदान सर्वसामान्य आणि अती सामान्य कुटुंबातील पालकांना शिक्षणाचे महत्त्व गरज आवश्यकता हे पटवून देत अनेक प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत हे अत्यंत प्रेरणादायी कार्य केवळ mipa आणि निपा ह्या दोन्ही शाळांच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रगती आणि गुणवत्तेची एक असणारी प्रेरणादायी नेतृत्व म्हणून अखंड भारत भर महाराष्ट्र राज्याचा शिक्षण प्रवास देशात गौरविण्यासाठी जात आहे ह्याचा खूप अभिमान वाटतो
नेतृत्वाचे विविध पैलू
स्वयंप्रेरणेने आणि प्रबळ इच्छाशक्तीने माणूस कोणत्याही परिस्थितीत माणूस आपलं ध्येय साध्य करू शकतो
अडचणीवर मात करून पुढे जावे.
नेतृत्व आणि तंत्रज्ञान
Transforming Leadership co ordination of team work
आहे त्या परिस्थितीला जुळवून घेऊन गुणवत्तेच्या ध्यासासाठी झपाटलेले नेतृत्व पाहिले.
कोणत्याही परिस्थिती मध्ये थांबायचे नाही. सकारात्मक दृष्टिकोन
The seminar enhanced my understanding of effective school leadership, community engagement, and collaborative practices. It provided practical insights into strengthening school-community relationships and improving student-centered learning through participative leadership.
For school development Headmasters role is very important. I learn that how to handle the problems.

Where I am and where to go?
नवीन काम करण्याची प्रेरणा, जिद्द, नेतृत्व गुण काय असते. कठीण परिस्थितीत मुलांचा सर्वांगीण विकास कसा करता येतो.
शालेय व्यवस्था
शालेय नेतृत्व विकास चर्चा सत्रातून काम करण्याची नवीन ऊर्जा व विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक विकासा सोबतच भारतीयत्व रुजवण्याची नवीन दिशा.
विदयार्थी हा केंद्रबिंदू आहे आणि शिक्षक पालक व समाज यांनी एकत्रित येऊन विद्यार्थी विकास करू शकतो
When there is will,there is way.
I learned that effective school leadership plays a crucial role in improving the quality of education. The seminar emphasized the importance of visionary leadership, teamwork, and ethical decision making in school administration. I gained insights into how a school leader can motivate teachers, create a positive school culture, and focus on student centered learning. The sessions also highlighted the need for continuous professional development, innovative teaching, learning practices, and the use of technology in school management. Overall, the seminar helped me understand how strong and sensitive leadership can transform a school and contribute to holistic student development.
Lot many things to take away from various respected experience heads of the institution from various state of India who have participated in this seminar which will definitely help me to improve the tone of my school, students and overall my state. I can say that the school leader has to be dynamic, versatile and available for the improvement of learners and institutions. I am thankful to the organiser and my higher authority they made me a part of this seminar thank you
Innovative Practices
कोणत्याही अडचणीवर मात करून शिक्षण चालू ठेवता येत व शिक्षण प्रभावी कसं करावं हे आज शिकायला मिळालं व तळागाळातल्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवू नये
आणखी खूप काम करण्याची प्रेरणा मिळाली.
जिद्द, आत्मविश्वास,मेहनत, सकारात्मकता आणि सहकार्य या जोरावरच अशक्य गोष्टी शक्य होतात हेच या सेमिनार मधून मी शिकलो
उत्कृष्ट नियोजन, ध्येयवेडी माणसे जग बदलू शकतात, व्यासंगी व्यक्तिमत्वांचे विचार
विद्यार्थी गुणवत्ता विकास करताना नेतृत्व महत्वाचे असते. नेतृत्व विकास म्हणजे स्वतः चे नेतृत्व विकसित करताना आपल्या सारखे नेतृत्व गुण आपल्या सहका-्या मध्ये विकसित करणे
मीपा अंतर्गत आयोजित या शाळा नेतृत्व विकास सेमिनारात सहभागी होण्याची संधी मिळणं, हे केवळ एक चर्चासत्र नव्हे तर दृष्टी घडवणारा, विचारांना धार देणारा आणि मनात स्फूल्लिंग चेतवणारा प्रवास ठरला आहे. या सेमिनारमध्ये राज्यातील विविध भागांतून आलेल्या शाळांमधील सहका-्यांना पाहताना एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली ही माणसं तक्रारींसाठी नव्हे, तर परिवर्तनासाठी उभी आहेत. मर्यादा आहेत, अडचणी आहेत, पण तरीही कुठेही खचलेपण नाही; उलट, डोळ्यांत ध्येयाची चमक आहे, आणि मनात “शाळा बदलायचीच” ही जिद्द आहे. येथे आम्हाला असे कल्पक, सृजनशील आणि भविष्यवेधी उपक्रम पाहायला मिळाले,ज्यात शाळा

ही केवळ इमारत न राहता बालकांच्या स्वप्नांची पाळणाघर बनलेली दिसली. कोणी वर्गखोलीत नवोपक्रम राबवत आहे,कोणी बालकांच्या मनोविश्वाला स्पर्श करणारे उपक्रम घडवत आहे, तर कोणी शिक्षक-विद्यार्थी-पालक यांच्यातला दुवा अधिक मजबूत करत आहे.हे सगळं पाहताना मन अभिमानानं भरून आलं. नेतृत्व म्हणजे केवळ पद नाही नेतृत्व म्हणजे जबाबदारी. आणि आज इथे दिसलेली प्रत्येक व्यक्ती ही बालकांच्या भविष्याची जबाबदारी खांद्यावर घेऊन चालणारी आहे. येथून परत जाताना आपण फक्त फाईल्स, टिपणं किंवा प्रमाणपत्र घेऊन जात नाही आहोत, तर एक नवी दृष्टी, नवी ऊर्जा आणि नवा आत्मविश्वास घेऊन जात आहे. ही दृष्टी अशी आहे जी बालकांचं पुढचं शिक्षण अधिक सुकर, आनंददायी आणि अर्थपूर्ण करेल. ही ऊर्जा अशी आहे जी शाळेला परिवर्तनाच्या वाटेवर नेईल. आणि हा आत्मविश्वास असा आहे की आपण बदल घडवू शकतो, आणि तो घडवणारच..! या प्रेरणादायी सेमिनारासाठी आयोजकांचे, मार्गदर्शकांचे आणि प्रत्येक सहभागी सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. आता आपण सज्ज होवू या.. ध्येय डोळ्यांसमोर ठेवून, बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण सारे एकत्र पुढे जाऊया..!
महाराष्ट्र व इतर राज्यातून आलेल्या मुख्याध्यापकांनी सादरीकरण केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचीलमाहिती मिळाली व मीपा या संस्थेचे उत्तम नियोजन कळाले.
या सेमिनारमुळे शालेय नेतृत्व अधिक सक्षम, उत्तरदायी व विद्यार्थी-केंद्रित करण्यासाठी नवे दृष्टिकोन प्राप्त झाले.
सकारात्मक प्रेरणा व नवी ऊर्जा
आव्हानं ओळखून त्यावर मात कधी करायची ह्याची दृष्टी मिळाली.
प्रामाणिकपणे व सकारात्मकतेने काम करणे.
ग्रामीण व शहरी विभागातील उत्कृष्ट कार्याचा अनुभव घेता आला त्यातून प्रेरणा घेऊन मुंबई महानगरीच्या शाळांपर्यंत ही निपा व मीपा रूपी ज्ञानगंगा पोहचविण्याचा प्रयत्न करीन.
Various aspects of school tourism
Better to lead school and administration
सदर सेमिनार मध्ये कितीही वाईट परिस्थिती असली तरी आपले कर्तव्य करीत राहणे याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.
कठिण परिस्थितीतून मार्ग काढत पुढे कसे जावे याबाबत प्रेरणा मिळाली
नेतृत्व म्हणजे काय
प्रत्येक समस्येतून मार्ग निघू शकतो. फक्त जबरदस्त इच्छाशक्ती असावी लागते हे यातुन शिकायला मिळालं.
शाळेत व जिल्हात अनेक शाळाना मार्गदर्शन करण्यासाठी शैक्षणिक माहिती मला मिळाली आहेत निश्चित याचा चागला फायदा घेउन दुसरायला सुधा देता एइल
प्रेरणा प्रोत्साहन शाळा व विद्यार्थी विकास
विद्यालय का संचालन एवम् विधार्थी का विकास कैसे किया जावे
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवावयाचे विविध उपक्रमाची माहिती मिळाली व शालेय नेतृत्वातून त्याचा विकास कसा करावा याची नवीन संकल्पना मिळाली अत्यंत उत्कृष्ट आणि उपयोगीअशी माहिती मिळाली.
More than 100 ideas to improve our teaching learning process
Interaction promotes understanding, by listening others best practices I got many insights for my students

महाराष्ट्र व इतर राज्यातील मुख्याध्यापकांचे नेतृत्व व त्यामुळे शाळेत होणारे सकारात्मक बदल, विद्यार्थी गुणवत्ता वाढ यांची अधिक माहिती मिळाली. शालेय नेतृत्वाचे विविध पैलू हे अतिशय चांगल्या प्रकारे समजले.
नवीन कन्सेप्ट प्रशिक्षण मधून मिळाल्या
Proficiency
शाळेतील विविध उपक्रमांची नांदी बघण्यास मिळाली आणि मी पण माझ्या विद्यार्थ्यांच्या भविष्यात उतरवणार
अडचणी ह्या समस्या नसून, सुवर्णसंधी आहेत. त्याच्यावर योग्य नेतृत्व कार्याने विजय संपादन करण्याचे सामर्थ्य मला या सेमिनार मधून मिळाले.
Try try and get success
कुठल्याही कठीण परिस्थितीवर आत्मविश्वासाने मात केल्यास नक्कीच सकारात्मक बदल घडू शकतो हे यातून शिकायला मिळाले.
अनेक बाबी जे की स्वतः सोबत शाळा व विद्यार्थी विकासासाठी उपयुक्त
New way of Educational leadership and school management
शाळेत परिस्थिती कितीही कठीण असली तरी आपण त्यावर मात करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करू शकतो
It gave me chance to see the real picture of school education. My takeaway from this how the vision and leading leader can execute the best team inorder to achieve success.
School development and student's multi faceted development can be made constant vigilance on the part of school administrators.

Topics recommended for the future seminar

(सुचवा - भविष्यातील चर्चासत्रासाठी विषय)

Tecnology in teaching - learning process
"डिजिटल टूल्सचा प्रत्यक्ष वापर आणि अंमलबजावणी (Practical Implementation of Digital Tools)." "आंतरराज्य शैक्षणिक आदान-प्रदान कार्यक्रम (Inter-state Educational Exchange Programs)." "बदलत्या शैक्षणिक धोरणांनुसार नेतृत्वाचे बदलते स्वरूप."
Digitalization.
शाळेचा गुणवत्ता विकास.... भौतिक सुविधा सादरीकरण नको
अशा प्रकारच्या सेमिनारांमध्ये विषयांवर अधिक सखोल, व्यापक व व्यवहार्य चर्चा होण्यासाठी कार्यक्रमाची कालावधी तीन दिवसांऐवजी पाच दिवसांची करण्यात आल्यास अधिक परिणामकारक लाभ मिळू शकतो. यामुळे शालेय व्यवस्थापन, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, नेतृत्व विकास तसेच शैक्षणिक नवोपक्रम यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी सहभागींना पुरेसा वेळ उपलब्ध होईल. विचारमंथन, अनुभवांची देवाणघेवाण, गटकार्य व प्रादेशिक उदाहरणांचे विश्लेषण अधिक प्रभावीपणे करता येईल, परिणामी सेमिनारची उपयुक्तता व प्रभावशीलता लक्षणीयरीत्या वाढेल. तसेच, आंतरराज्यीय सेमिनारांमध्ये सादरीकरणे राज्याच्या प्रादेशिक भाषेसह राष्ट्रीय भाषा (हिंदी) मध्ये संयुक्तपणे केल्यास विविध राज्यांतील सहभागींमध्ये सुसंवाद, परस्पर समज आणि अनुभवांचे व्यापक आदान-प्रदान साध्य होईल. यामुळे उत्कृष्ट शैक्षणिक उपक्रम व नवाचारांचा राष्ट्रीय स्तरावर प्रसार होऊन सेमिनारचे दूरगामी व देशव्यापी लाभ सुनिश्चित होतील.

To work on students violence
पुन्हा पुन्हा संधी निर्माण कराव्यात.
सेमिनारचे दरवर्षी आयोजन करण्यात यावे.
Duration वाढविणे
शिक्षण प्रणाली व विद्यार्थी शिक्षण
दरवर्षी नेतृत्व / अध्ययन अद्यापन प्रक्रिया / नाविन्य पूर्ण उपक्रम / असे चर्चासत्र नेहमी व्हावे.
शिक्षक व पालक यांच्यातील अंतर संबंध सक्षमीकरण
शालेय नेतृत्व आणि शिक्षणातील नाविन्यपूर्ण पध्दती
शैक्षणिक साहित्य व त्याचा वापर, शिक्षकांसाठी आवश्यक आहे
मुख्याध्यापक व शिक्षक आंतर संबंध
To work on students violence behaviour
सर्वोत्तम शाळांतील नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाण-घेवाण
NEP Implementation
अशाच सेमिनारचे तालुका व जिल्हास्तरावर आयोजन व्हावेत हिच अपेक्षा
जेवढे विषय मांडणी शिक्षणातील प्रेरणादायी नेतृत्व प्रवास ह्यांवर सादरीकरण केले त्यातील सर्व मुद्दे एकतरी करून त्यावर अजून कोणत्या प्रकारच्या गरजा पूर्ण कराव्या लागतील भविष्यात काही शाळेत असे सुंदर उपक्रम न राहता ते सगळ्या शिक्षकांनी विद्यार्थ्या साठी करण्यासाठी पुढाकार घेऊन एक आदर्श गुणवंत यशवंत कीर्तिवान विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक करण्यासाठी घडवता येऊ शकतो असा एक संकलित प्रयोग सर्वांच्या सोबतीने सुरू करण्याचा प्रयत्न होणे अपेक्षित वाटते एवढ सगळे पाहिल्यावर अवघड नाही आणि अशक्य नसते हे नक्की समजल
मुख्याध्यापक सक्षमीकरण
असे नेतृत्व विकासाची व शालेय व्यवस्थापनाची चर्चासत्र जिल्हास्तरावर आयोजित करावीत
उप शिक्षकांना मार्गदर्शन
शाळेमध्ये संस्कृती जोपासणे
Need of Empowering Leaderships
AI तंत्रज्ञान
शासकीय परिपत्रकावर चर्चा
Future seminars may focus on capacity building of school leaders, innovative teaching-learning practices, digital leadership in education, community participation models, and strategies for inclusive and sustainable school development.
How to give every student good education and how make every school good school to develop every school
Educational Gaps in Implementation of NEP
1)आर्थिक स्थिती यावर उपाय योजना.२) ग्रामीण भागातील शाळा आणि त्यांचे शिक्षण ३) ग्रामीण भागातील शिक्षकांच्या समस्या ४) शिक्षकांना ऑनलाईन ऑफलाईन कामातून मुक्त कसे करावे?
Teaching method

Seminar should be done on the burden of works on teacher other than teaching & learning process.
1)Innovative and Visionary School Leadership to meet future educational challenges.2) Integration of Technology and AI in School Management and Teaching, Learning Processes. 3)Teacher Empowerment and Student Centered Inclusive Education for holistic development.
Administrative and since the students in some school are from migrant areas the difficulty is to get documents required for their apar id creation and other documents they are supposed to submit at the time of their admission, so related topics could be taken into consideration
प्रत्येक तालुक्यातून दोन शिक्षकाची निवड करून प्रत्येक शाळेवर पाच दिवस या शिक्षकांनी अशा प्रकारचे प्रशिक्षण विद्यार्थी शिक्षकांना द्यावे
विद्यार्थी आरोग्य,शारीरिक सुदृढता आणि शिक्षण
सहकारी शिक्षकांसाठी सकारात्मक दृष्टिकोन
NEP 2020 and School Leadership
विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी नाविन्यपूर्ण अध्यापण शैली
सादरीकरणासाठी अधिक वेळ द्यावा.
प्रादेशिक भाषा शाळांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची,विद्यार्थी वाढ व विद्यार्थी शाळेत टिकविण्यासंदर्भात भाषा,गणित,विज्ञान ए.आय.विषयांच्या संदर्भात मुख्याध्यापक शिक्षकांचे प्रशिक्षण व्हावेत.
Transformation NEP through Indian Knowledge System
Encourage Leadership
भारतीय पंचकोश विकसन
भविष्यातील आव्हाने व उपाय योजना
कुशल नेतृत्व होण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसनासाठी कार्यशाळा व्हावी.
Discipline
Extra curriculum challenges
तंत्रज्ञान विषयातील प्रशिक्षण
शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक समन्वय कसा असावा याबाबत
हे सेमिनार परत मिळाले पाहिजे.
शैक्षणिक गुणवत्ता विकास
भविष्यात असे सेमिनार विविध विषयावर आयोजित करावे
परत असे सेमिनार आवश्यक आहे आणि सदरिकरणासास वेळ वाढवावा हि विनंती
विद्यार्थी व्यक्तित्व विकास
ग्रामीण भागातील उपलब्ध सामग्री नुसार व नवनवीन तंत्रज्ञान यांची सांगड घालून विद्यार्थ्यांचा विकास
Tools for improve school leadership
Allignment of NEP implementation for schools to improve quality of Education

नवोपक्रम व गुणवत्ता वाढ, अध्ययन अध्यापनात AIL चा वापर, स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य निर्मिती व गुणवत्ता वाढ
अध्ययन निष्पत्ती विद्यार्थी मध्ये रुजवीण्यासाठी काय प्रयत्न करावे
21st century skills in the context of Pedagogical Leadership
स्कील डेवलपमेंन्ट, कौशल्य नेतृत्व वरील
ग्रामीण भागातील दयनीय अवस्थेमध्ये असलेल्या विद्यार्थी विकासासाठी CSR फंड कसा उभारावा?
Interaction with parent and student
शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा.
Best
कार्यानुभव या विषयाशी निगडीत विद्यार्थी विकास प्रशिक्षण
Use of ICT in school Management.
उत्तम शालेय प्रशासन
शालेय अभिलेखे किंवा शिष्यवृत्ती मार्गदर्शन
1.Training of in-service teacher's about 21st century teaching approach. 2. ICT use in school education 3. Value education
School Acountability. The seminar anchor must be bilingual in issuing instruction and summing up the lessons.

Overall feedback about the Seminar
(सेमिनार बाबत एकंदरीत अभिप्राय)

Excellent
सेमिनार "महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश आणि गोवा या चार राज्यांतील शिक्षण क्षेत्रातील ध्येयवेड्या नेतृत्वांना एकाच व्यासपीठावर अनुभवणे, हा माझ्यासाठी अत्यंत समृद्ध करणारा अनुभव होता. या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रामुळे केवळ राज्यांच्या सीमा ओलांडून शैक्षणिक प्रगल्भतेची जाणीव झाली नाही, तर डिजिटल युगातील नव्या क्षेत्रांची आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची मोलाची माहिती मिळाली. इतर राज्यांतील मुख्याध्यापकांचे सादरीकरण आणि त्यांच्या शासनाचे धोरणात्मक निर्णय जाणून घेताना खूप प्रेरणा मिळाली. या सर्वांच्या अनुभवातून मिळालेली ऊर्जा मला माझ्या शाळेत नव्या जोमाने काम करण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल. मिपा (MIPA) आणि NCSL यांनी आयोजित केलेले हे सत्र खरोखरच अप्रतिम होते. आदरणीय प्रकाश मुकुंद साहेब, डॉ. कुलकर्णी मॅडम आणि समस्त मिपा व निपा (NIEPA) टीमचे मी मनस्वी आभार मानतो. चर्चासत्राचा विषय, विषयांची निवड, निवास, भोजन आणि बैठक व्यवस्था यासह प्रत्येक गोष्टीचे नियोजन अगदी 'परफेक्ट' होते. शालेय नेतृत्वावर (School Leadership) आधारित इतके यशस्वी चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल संपूर्ण मिपा टीमचे मनापासून धन्यवाद!"
सेमिनार अत्यंत फलदायी झाला. विषयाची मांडणी आणि वक्त्यांचे मार्गदर्शन खूपच प्रभावी होते. यातून मला बरीच नवीन माहिती मिळाली जी माझ्या पुढील वाटचालीस उपयुक्त ठरेल. अशा प्रकारचे दर्जेदार सेमिनार भविष्यातही आयोजित केले जावेत, ही विनंती. उत्तम नियोजनाबद्दल आयोजकांचे आभार!"
खूपच छान सुंदर प्रभावी अति उत्तम

NIEPA दिल्ली आणि MIEPA महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेमिनार अत्यंत स्तुत्य व प्रेरणादायी ठरला. या सेमिनारचे एकूण नियोजन, समन्वय व अंमलबजावणी उत्कृष्ट होती. विशेषतः ज्योती कुलकर्णी मॅडम व त्यांच्या टीमचे व्यवस्थापन कौशल्य प्रशंसनीय असून ते अनुकरणीय आणि शिकण्यासारखे आहे. सेमिनारदरम्यान सर्व सहभागींसोबत सक्रिय सहभाग साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि प्रत्येकाकडून आपुलकी, सहकार्य व आत्मीयतेचा अनुभव मिळाला. यासाठी सर्व आयोजक, सहभागी व सहकारी टीमचे मनःपूर्वक आभार मानतो. आपणा सर्वांचे प्रेम, मार्गदर्शन व आशीर्वाद सदैव असेच राहो. हेच स्नेह व आशीर्वाद मला माझ्या कार्यस्थळी अधिक निष्ठेने, समर्पणाने व प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सतत प्रेरणा व बळ देत राहतील.
It's very good
सुंदर आणि आदर्श
खुपच अप्रतिम ज्ञानाची शिदोरी देणारे सेमिनार होते.प्रतिकुल परिस्थितीतही शैक्षणिक स्थिती कशी अनुकुल करता येते यांचे धडे या कार्यशाळेद्वारे मिळविले.
खूप सुंदर आयोजन, सकारात्मकता वाढली, नेतृत्व करणारे आदर्श आमच्या समोर आल्याने पुन्हा आम्ही प्रेरित झालो...शाळेत अनेक नेतृत्व तयार होण्यास मदत होईल
सर्वप्रथम मीपाचे व सन्मानिय अधिकाऱ्यांचे आभार ! सेमिनार चे आयोजन उत्कृष्ट होते.या सेमिनारणे सर्वांना नवीन काहीतरी शिकायला मिळाले. त्याचा फायदा प्रत्येकाला झाला.हे प्रशिक्षण पूर्णतः चांगल्या नियोजनाचे प्रतीक होते.माझे मते हे प्रशिक्षण सर्व दृष्टीने प्रभावी व उत्कृष्ट झाले.
माझ्या 30 वर्ष सेवेतील सर्वोत्कृष्ट चर्चासत्र
सेमिनार हे अतिशय उत्कृष्ट नियोजन असलेले होते.अधिकारी यांच्यातील शिस्त,वेळेचे नियोजन व हसतखेळत असलेले वातावरण खूप आवडले.उत्कृष्ठ अशी अनुभवांची शिदोरी मिळाली आहे.त्याचा उपयोग माझी शाळा व तालुक्यातील इतर शाळांच्या प्रगती साठी करण्याची ऊर्जा सेमिनारमध्ये निर्माण झाली आहे.निपा व मिपा सन्माननीय सर्व अधिकारी यांचे खूप खूप धन्यवाद
Other state मधील शाळा अनुभवता आल्या. शिक्षणातील Idea कौशल्य विविधता अनुभवता आल्या. Great Event for us.
सेमिनार एकदम उत्कृष्ट झाला.
Best
Very nice
अनेक नव्या गोष्टी शिकवून जाणारा असा एक आगळावेगळा सेमिनार मला वाटलं
It is way excellent. The same should be replicated to other non performing schools.
शालेय नेतृत्व विकास या सेमिनार मधून खूप खूप चांगले शिकायला मिळाले काही
एक सुंदर मेनू कार्ड ह्याहून सुंदर आनंददायी आरोग्यदायी ताणमुक्त तसेच विद्यार्थ्यांना आपल्या अजून काही देऊ शकतो नवीन विचार संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहेत त्याच सादरीकरण मोबाईल शिवाय कमी वेळ देऊन जास्तीजास्त निर्धारित वेळेपेक्षा जास्त सादरीकरण करण्यासाठी इच्छुक असणारे शिक्षक त्यांचे मनातील असणारा गुणवत कार्य करून सुद्धा मनातील अंधार आदरणीय श्री प्रकाश सर ह्यांच्या नियोजनातील असणारी शिक्षणातील ज्योती तून सगळ्याप्रती भावनिक न होता बोलू या मांडू या व्यक्त होऊ आपल्या राज्यातील विविध प्रकारच्या उपक्रमात नेहमी अग्रेसर असणाऱ्या गुणवत मुख्याध्यापक शिक्षक ह्यांना मी न पाहता सगळ्यांनी पहावे गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून काम करणारे महाराष्ट्र राज्यस्थान गोवा

मध्य प्रदेश या राज्यातील गुणवत शिक्षक ह्यांच्या नेतृत्वाखाली एक एव्हरेस्ट शिखर सर करणारी परिषद म्हणून हिचा उल्लेख करावा असे वाटते उत्तम प्रकारचे भोजन निवास व्यवस्था अप्रतिम नियोजन सगळ्यात महत्त्वाचे तीन दिवसाच्या कार्यशाळेत आदरणीय डॉ चारुशीला मॅडम तसेच विविध अधिकारी ह्यांनी सहज साधलेल्या आपलुकीच्या संवादातून एक अधिकारी आणि शिक्षक ह्यामधील जवळीक विद्यार्थ्यांना घडण्यासाठी धडपड करणाऱ्यांना मला बोलायचं आहे आपण बोलू असे सांगून आजपर्यंत अनेक प्रशिक्षण केली अगदी scert pune पर्यंत पण कधी विसरणार नाही आयुष्यात घालवलेले शिक्षणातील काश्मीर सारखं स्वप्न असणाऱ्या शिक्षणातील प्रेरणादायी उपक्रम संकल्पना सुरू केली त्याचा भाग होण्याचं भाग्य आम्हाला लाभले नक्की आमच्या साठी सोनियाचा दिवस काय ते समजले आभार मानायचे कसे ऋण कसे व्यक्त करावे कृतज्ञता कशी असावी खरेच आपल्या सगळ्यासाठी एक शब्द लाजवाब अप्रतिम आणि अतुलनीय, नक्की पुन्हा पुन्हा असा स्नेह मिळत रहावा आणि आपुलकी प्रेम काय असत हे कोणीही विसरणार नाही
सर्व सत्र उत्तम.. सर्वसादरीकरणं पाहता आली असती तर बरं झालं असतं
उत्कृष्ठ नियोजन आणि परिणामकारकता
सेमिनार उत्कृष्ट झाला
Excellent seminar which is need-based.
खूपच उपयुक्त आणि मार्गदर्शक
उत्कृष्ट प्रशासन,नियोजन, विषयवस्तु,भोजन
The seminar was well-organized, informative, and highly relevant to current educational needs. The sessions were engaging and inspiring, offering valuable ideas that can be practically implemented at the school level.
Energetic, motivational and seminar taught me how to solve problems.
need of the hour
अतिशय उत्कृष्ट सेमिनार न भूतो न भविष्यतो असे....
Best and Helpful for Leadership
सेमिनार अतिशय सुंदर झाला असून, अशा सेमिनार चे आयोजन 5 दिवसांचे करावे. अशा सेमिनार चे आयोजन जिल्हास्तरावर करण्यात यावे..
खूप मोठा अनुभव साठा मिळाला
प्रशिक्षण सकारात्मक,आनंददायी आणि भविष्यकालीन आव्हानांसाठी प्रेरणादायी झाले.
The seminar was very enriching and insightful. Presentations given by all the headmasters provided a valuable opportunity to understand diverse school practices, innovative initiatives, and effective leadership strategies. We learned how different schools address challenges, involve teachers and the community, and focus on student development in unique ways.
It was very enriching and informative which will definitely useful for us as school leaders.
Excellent
कोण कोणत्या पदावर काम करतोय हे विचारात न घेता आपण सर्वजन विकासात्मकबदल घडवणारे पाईक आहोत व विद्यार्थ्यांचा विकास कसा होईल याचे विचार करणारे वारकरी आहोत
Superb..... excellent.....

सकारात्मक विचार एकत्र करून महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगतीबाबत अनमोल मार्गदर्शन मिळाले.नवी दिशा आणि ऊर्जास्रोत घेऊन नव्या उमेदीने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली... धन्यवाद मिपा..
उत्कृष्ट नियोजन, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ध्येया पर्यंत पोचता येते,
उत्कृष्ट नियोजन
सादरीकरणासाठी अधिक वेळ द्यावा...ज्या दिवशी ज्या शाळेचं सादरीकरण आहे त्या दिवशी त्या शाळेतील सर्व शिक्षकांना सहभागी होण्याची संधी द्यावी
मिपा पेस सेंटर,छत्रपती संभाजीनगर या संस्थेने आयोजित केलेले राष्ट्रीय कार्यशाळेचे उत्तम नियोजन हे महाराष्ट्र राज्य व इतर राज्यांनी सुनियोजित,शिस्तबद्ध आयोजनाचे आम्हा सर्वांना दर्शन घडविले.पुढील यशस्वी वाटचालीच्या मिपा संस्थेला,आयोजक,संयोजक यांना हार्दिक शुभेच्छा
एकूणच हा सेमिनार शाळा प्रमुख व शैक्षणिक नेतृत्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त असून भविष्यात अशा अधिक उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा आहे.
एकंदरीत छान सेमिनार
अतिशय प्रेरणादायी, शिस्तबद्ध कार्यक्रम.
काम करणांराचा एककाम करणार्यांचा एक प्रकारे सन्मान झाला.कामाची ओळख देशपातळीवर पोहोचली.
खूपच सुंदर नियोजन.वरिष्ठ स्वत: उपस्थित राहून प्रत्येक बाबीची दखल घेत होतै खर्‍या अर्थाने उत्तम लीडरशीप.
Seminar was tremendous.... We learned lot from it.
सेमिनार अतिशय छान व उपयोगी होते. माझ्या कार्यकर्दीतील सर्वात छान चर्चासत्र मी पाहिले. आयोजकाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार.
उत्कृष्ट सेमिनार.शक्यतोवर सुट्टीच्या कालावधीत आयोजित केल्यास अधिक चांगले होइल.
या सेमिनार मधून भरपूर काही शाळेत घेऊन जात आहे.
खूप छान आयोजन केले. यातुन उपस्थित मुख्याध्यापकांचा आत्मविश्वास वाढला.
सेमिनार चे नियोजन व व्यवस्था खुप चागली आहे
अत्यंत उपयुक्त उत्कृष्ट सेमिनार संपन्न झाले
यह आयोजन प्रत्येक विद्यालय देश भर में होना चाहिए।
मिपा व निपा या दोन्ही वरिष्ठ पातळीवरील यंत्रणेद्वारे राबवलेला उपक्रम अत्यंत उपयुक्त व उत्कृष्ट दर्जाचा आहे.
All is well
सेमिनार अतिशय उत्कृष्टपणे घेण्यात आला.
नियोजन आयोजन उत्कृष्ट होते. मिपा संचालक प्रकाश मुकुंद साहेब व डॉ ज्योती मॅम व टीम यांच्या कार्याला सलाम
So useful for all leaders
खुप काही ह्या मिपा कडून शिकण्यास मिळाले
अप्रतिम, अद्वितीय आणि अविस्मरणीय..
सदरील सेमिनार नवी ऊर्जा देणारे वाटले.
खुप सुंदर व मनाला समाधान देणारे सेमिनार

Over all seminar organization is very useful for school quality management.
आधी करा मग सांगा आणि अजून खूप काही नवीन करायचे आहे
चांगला होता खूप काही शिकायला मिळाले
It was truly an enriching intellectual experience that I thoroughly enjoyed and will certainly incorporate into my teaching career in the future. The seminar was exceptionally well organized, with a thoughtfully chosen theme. Hon. Director of MIEPA, Shri Mukund Sir, along with his dedicated team, deserves sincere appreciation for conceptualizing and conducting such an innovative seminar that effectively brought together educators from both school and higher education. All the dignitaries and officials were inspiring and exemplary, and their insights provided a clear, futuristic vision that deeply motivated the entire audience.

राजस्तरीय चर्चासत्र - वर्तमान पत्रात प्रसिद्ध बातम्या

ePaper
नवराष्ट्र Chh. Sambhaji Nagar | 08 January 2026 | Page 4 | navarashtra.com

शैक्षणिक | विविध मुद्यांवर मंथन, तीन दिवसीय चर्चासत्रात विविध कार्यक्रम

'मिपा'मार्फत राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात!

राष्ट्रीय चर्चासत्रात मान्यवरांचा सहभाग

▶ छत्रपती संभाजीनगर (शहर प्रतिनिधी) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत एनसीएसएल, 'मिपा', नवी दिल्ली यांच्या सूचनांनुसार २०१९ ते २०२५ या कालावधीत विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या अंतर्गत 'इंटर स्टेट शेअरिंग ऑफ प्रॅक्टिस' या उपक्रमानुसार तीन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र पेस सेंटर नांद्राबाद (ता. खुलताबाद) येथे घेण्यात आले.

सर्वप्रथम शहरातील महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी सिम्फनी बँड अंतर्गत राज्यगीत वाद्यासह सादर केले. प्रमुख अतिथी म्हणून 'मिपा', नवी दिल्लीच्या कुलगुरू डॉ.शशिकला वंजारी उपस्थित होत्या. तसेच कृष्णकुमार पाटील



(शिक्षण संचालक -योजना), अनिल साबळे (विभागीय अध्यक्ष, विभागीय शिक्षण मंडळ), भावना राजनोर (उपसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद), कैलास दातखीळ (शिक्षण उपसंचालक) आदींसह शालेय शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी व शिक्षणप्रेमी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

'मिपा'चे उल्लेखनीय कार्य

निपा, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शालेय नेतृत्व केंद्राने २९ शालेय नेतृत्व अकादमी स्थापन केल्या आहेत, जेथे शालेय नेतृत्व क्षेत्राशी संबंधित विविध कामकाज केले जाते. या अंतर्गत आयोजित उपक्रमांची माहिती त्यांच्या राष्ट्रीय पोर्टलमधील स्कूल लीडरशिप अकॅडमी महाराष्ट्राच्या वेबपेजवर प्रकाशित करण्यात आलेली आहे.

संशोधक, प्राध्यापकांनी केले सादरीकरण

प्रास्ताविक मिपाचे संचालक प्रकाश मुकुंद यांनी केले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील मुख्याध्यापक तसेच मध्यप्रदेश, गोवा, राजस्थान येथील मुख्याध्यापक व नोडल अधिकारी, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागातील संशोधक व प्राध्यापक यांची सादरीकरणे व शोधनिबंध सादर होणार असून ज्यातून, राज्य व आंतरराज्य परस्पर संबंध दृढ होणार आहेत असे विवेचन केले. यानंतर डॉ. मलिक यांनी शालेय नेतृत्वाचे पैलू या विषयावर संवाद साधला. कुलगुरु प्रा. वंजारी यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा : विद्यालय नेतृत्व की संभावनाएं' या विषयावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वर विवेचन केले. कृष्णकुमार पाटील यांनी शालेय शिक्षणात विविध योजना व त्यात मुख्याध्यापकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर 'मिपा' संस्थेच्या वेबसाईटचे अनावरण करण्यात आले.

लोकमत



महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेतर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी मान्यवर.

'मिपा' आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ७२ मुख्याध्यापकांचा सहभाग

बाहेर राज्यातील तज्ज्ञांनी सादर केले शोधनिबंध

लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेतर्फे (मिपा) मुख्याध्यापकांसाठी 'शालेय नेतृत्व विकासा'वर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २ ते ४ जानेवारीदरम्यान पार पडले. या चर्चासत्रात देशभरातील तज्ज्ञांनी सहभाग नोंदवल्याची माहिती 'मिपा'चे संचालक प्रकाश मुकुंद यांनी दिली.

खुलताबाद तालुक्यातील पीएसीई केंद्रात आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन एसएनडीटी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. शालेय शिक्षणच्या योजना विभागाचे संचालक कृष्णकुमार पाटील, विभागीय मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, उपसंचालक कैलास दातखीळ, भावना राजनोर, डॉ. शैलजा दराडे, प्राचार्य डॉ. आर. डी. कांबळे, डॉ. योगेश सोनवणे, डॉ. चारूस्मिता मलिक, संयोजक तथा 'मिपा'चे संचालक प्रकाश मुकुंद यांची उपस्थिती होती. राज्यातील ७२ मुख्याध्यापक, मध्य प्रदेश, गोवा, राजस्थान राज्यातील ९ मुख्याध्यापक आणि २ नोडल अधिकाऱ्यांसह उच्च शिक्षण विभागातील ४ संशोधक व प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. समारोपाला विभागीय मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, उपसंचालक भावना राजनोर, डॉ. शैलजा दराडे यांची उपस्थिती होती.

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 5 Jan 07, 2026
Powered by: erelego.com

बडवाईक यांचे राष्ट्रीय चर्चासत्रात प्रतिनिधित्व

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ४ : स्थानिक नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. वंदना बडवाईक यांनी राष्ट्रीय शालेय नेतृत्व विकास चर्चासत्रात नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व केले.

२ ते ४ जानेवारी दरम्यान



डॉ. वंदना बडवाईक

नांद्राबाद, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे हे राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (नीपा), छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने या चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्यात पश्चिम भारतातील महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, गोवा तसेच दीव-दमण व इतर केंद्रशासित प्रदेशांतील १०० निवडक मुख्याध्यापक सहभागी झाले होते,

शाळेचे वैभव राष्ट्रीय पातळीवर नीपापर्यंत सादर करता आले, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, असे डॉ. वंदना बडवाईक म्हणाल्या. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव रमेश बक्षी यांनी हे यश प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त केली. शिक्षण उपसंचालक सावरकर यांनीही डॉ. वंदना बडवाईक यांचे कौतुक केले.

तरुण भारत
Purva Vidarbha | 2026-01-03 | Page- 9
epaper.tarunbharat.net

गडचिरोलीच्या शिक्षकाची उत्तुंग भरारी

मुख्याध्यापक रवींद्र यमसलवारांची 'राष्ट्रीय चर्चासत्रा'साठी निवड

आलापल्ली, २ जानेवारी

नक्षलग्रस्त आणि दुर्गम जिल्हा अशी ओळख पुसून गडचिरोली आता 'शैक्षणिक प्रगतीचा जिल्हा' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. याचेच एक बोलके उदाहरण म्हणजे अहेरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवणीपाठ येथील मुख्याध्यापक रवींद्र रत्नाकर यमसलवार यांची राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रासाठी झालेली निवड होय. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा-) छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने आयोजित 'राष्ट्रीय शालेय नेतृत्व विकास चर्चासत्रा'साठी त्यांची निवड करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



अहेरीसारख्या अत्यंत दुर्गम भागात सोयीसुविधांचा अभाव असतानाही शिक्षक यमसलवार यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर शाळेचे रूप पालटले. तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राबवलेले उपक्रम आता देशभर आदर्श ठरणार आहेत. एका छोट्याशा पाड्यातील शाळा राष्ट्रीय स्तरावर कशी पोहोचू शकते, याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला आहे.

यमसलवार यांच्या या निवडीमुळे संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. शिक्षण विभाग, स्थानिक प्रशासन, विविध शिक्षक संघटना आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. दुर्गम भागातील शिक्षकाची ही भरारी इतर शिक्षकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, अशा भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहेत.

(तभा वृत्तसेवा)

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांसमोर होणार सादरीकरण

या प्रतिष्ठित चर्चासत्राचे स्वरूप अतिशय व्यापक आहे. यामध्ये देशातील विविध राज्यांचे शिक्षण मंत्री, वरिष्ठ सनदी अधिकारी आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या राष्ट्रीय मंचावर यमसलवार यांना आपल्या शिवणीपाठ शाळेत राबवलेले नावीन्यपूर्ण प्रयोग, डिजिटल शिक्षण आणि लोकसहभागातून केलेला शाळेचा कायापालट याचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे.

हा सहकाऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा गौरव : यमसलवार

अतिशय दुर्गम भागात काम करताना तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांच्या जोडीने विद्यार्थ्यांचा विकास साधणे, हेच आमचे ध्येय आहे. राष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही मोठी जबाबदारी असून, हा गौरव माझ्या सर्व विद्यार्थ्यांचा आणि सहकाऱ्यांचा आहे, असे जिप शाळा शिवणीपाठचे मुख्याध्यापक रवींद्र यमसलवार यांनी सांगितले.

Powered by Bharati Web

देशोन्नती

निवासी शाळेतील शिक्षिकेच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर नोंद



अकोला : सामाजिक न्याय विभाग अंतर्गत, बाळापूर तालुक्यातील शेळद येथील मुलींची शासकीय निवासी शाळा येथील प्रभारी मुख्याध्यापिका सीमा राजेश वाठुरकर यांनी नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील निपा व मिपा अंतर्गत आयोजित 'शालेय नेतृत्व विकास' या विषयावर झालेल्या मुख्याध्यापकांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे चर्चासत्रात सहभाग नोंदवून प्रभावी प्रेझेंटेशन सादर केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण व अनुभवाधारित मांडणीचे उपस्थित तज्ज्ञांकडून कौतुक करण्यात आले. त्यात पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, गोवा, दिव दमणसह इतर केंद्रशासित प्रदेशातील १०० मुख्याध्यापकांनी सहभाग नोंदविला. सीमा वाठुरकर यांचे प्राचार्य श्रीमती खडके, प्रा. ससाने, प्रा. प्रवीण चव्हाण, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त वाठ यांनी स्वागत केले.

लोकमत

राज्यस्तरीय चर्चासत्रात दोन शाळांनी केले प्रतिनिधित्व

लोकमत न्यूज नेटवर्क

सेलू : शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे आणि नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खासगी शाळांमधील उत्कृष्ट मुख्याध्यापकांना राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी होण्याची संधी मिळाली. यामध्ये वालूर येथील शांताबाई नखाते आश्रमशाळेतील मुख्याध्यापक शाम मचाले, मानवत तालुक्यातील इरळद जि.प. शाळेतील मुख्याध्यापक डिगांबर भिसे यांनी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेमार्फत विभागीय संचालक प्रकाश मुकुंद यांचे सनियंत्रणात २ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान पेस सेंटर, नांद्राबाद (ता. खुलताबाद) येथे राज्यभरातील ३६ जिल्ह्यांतून निवड झालेल्या ७२ मुख्याध्यापकांचे हे तीन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र झाले. या मुख्याध्यापकांनी शाळेतील भौतिक सुविधा, गुणवत्तापूर्ण उपक्रम व यशोगाथाचे सादरीकरण उल्लेखनीय ठरले.

Hello Parbhani
Page No. 3 Jan 08, 2026
Powered by: erelego.com

राजस्तरीय चर्चासत्र –
विविध News Channel वर प्रसिद्ध बातम्या

https://youtu.be/QDPAKiSnhlA

https://youtu.be/5KJk-p1AKN4

https://youtu.be/5KJk-p1AKN4?si=oyRFoKwgYGpIZaV1

Picture Gallery




PACE
Pradhan Anusuya Center For Education
INTER-ELA SEMINAR
ON SCHOOL
LEADERSHIP DEVELOPMENT


धन्यवाद


FOOD+SAFETY






धन्यवाद


PACE




FOOD SAFETY
PERSONAL HYGIENE
FOOD+SAFETY
CLEAN


GPS Map Camera
Chhatrapati
Sambhajinagar,Maharashtra,India
Khuldabad, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra 431101, India
Lat 19.980941, Long 75.200994
Sunday, 04/01/2026 10:12 AM GMT+05:30
Note : Captured by GPS Map Camera




FOOD+SAFETY







धन्यवाद


ham Arora Center For Education
INTER-SLA SEMINAR
ON SCHOOL
LEADERSHIP DEVELOPMENT
Organized by
MIEPA-SLA
Chhatrapati Sambhajinagar,
in collaboration with
NCSL-NIEPA, New Delhi.


INTER-SLA SEMINAR
ON SCHOOL
LEADERSHIP DEVELOPMENT
02nd to 4th January 2026
Organized by
MIEPA-SLA
Chhatrapati Sambhajinagar,
in collaboration with
NCSL-NIEPA, New Delhi.


FOOD+SAFETY






INTER-SLA SEMINAR ON SCHOOL LEADERSHIP DEVELOPMENT